CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १८९ | पाने १२ | किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# भारतावर वाढला जगाचा विश्वास

## पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

### दशकाचे काम काही वर्षांत साध्य

### प्रत्येक नागरिक विकसित भारत घडवण्यासाठी कटिबद्ध

**नवी दिल्ली, १७ सप्टेंबर**

एखाद्या देशाचा सेमीकंडक्टर उद्योग उभा राहणे ही काही वर्षांची प्रक्रिया नसते. चिप डिझाईनपासून उत्पादन, उपकरणे, साहित्य आणि तपासणीपर्यंत संपूर्ण प्रणाली उभारण्यासाठी अनेक दशकांचा कालावधी लागतो. मात्र, भारताने या क्षेत्रात अवघ्या काही वर्षांत मोठी झेप घेतली. ज्या कामासाठी जगातील अनेक देशांना दोन-तीन दशके लागली, ते भारताने काही वर्षांत साध्य करून दाखवले. जगाचा भारतावर विश्वास वाढला असून, देशातील प्रत्येक नागरिक विकसित भारत घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.



'सेमीकॉन इंडिया-२०२६'च्या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव व इतर मान्यवर. मागे कार्यक्रमाला उपस्थित जगभरातून आलेले व्यावसायिक व उद्योजक

राजधानी दिल्लीतील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे गुरुवारी 'सेमीकॉन इंडिया-२०२६'च्या च्या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन मोदींच्या हस्ते पार पडले. यावेळी ५२ देशांतील ६०० पेक्षा जास्त कंपन्या, गुंतवणूकदार आणि तज्ज्ञ उपस्थित होते. विश्वकर्मा जयंतीच्या शुभेच्छा देताना मोदी म्हणाले, आपल्या परंपरेनुसार, भगवान विश्वकर्मा यांना निर्मिती आणि सृष्टीच्या सामर्थ्याचे प्रतीक मानले जाते आणि योगायोगाने, आजच सेमीकंडक्टर इंडियाचा शुभारंभ होत आहे. एकीकडे आपली शतकानुशतके चालत आलेली उत्पादन परंपरा आणि दुसरीकडे २१ व्या शतकातील तंत्रज्ञान व दूरदृष्टी विकसित भारतासाठी प्रेरणा आहेत. भारतीय कारखान्यांमधून होणारे चिप्सचे उत्पादन जगभरात पोहोचत आहेत. इतक्या कमी वेळात कोणत्याही देशासाठी हे साध्य करणे सोपे नसते, पण भारताने ही कामगिरी काही वर्षात केली. उद्योगपतींच्या सहकार्यामुळे हे साध्य होऊ शकले.

**संकटाच्या काळातही अर्थव्यवस्था सुसाट**

या सप्टेंबरमध्ये भारताचा तिमाही जीडीपी अहवाल प्रसिद्ध झाला आणि या संकटाच्या काळातही भारताने ७.८ टक्के वाढ नोंदवली. भारतीय अर्थव्यवस्था जागतिक संकटाच्या काळात सुसाट आहे. जपानच्या क्रेडिट रेटिंग एजन्सीने भारताच्या रेटिंगमध्ये सुधारणा केली, हे जवळपास ३५ वर्षांनंतर घडले आहे, असे मोदी म्हणाले.

**एक लाख रोजगारनिर्मिती : वैष्णव**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, सेमीकंडक्टर प्रकल्पांमुळे भारतात १० वर्षांत पाच अब्ज डॉलर्सची गुंतवणूक येणार असून, यातून देशात एक लाख नवीन रोजगार निर्माण होणार आहे.

(वृत्तसंस्था)

### ३०.५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे लक्ष्य

सेमीकंडक्टर मिशनच्या पहिल्या टप्प्यात आठ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते, जे दुसऱ्या टप्प्यात वाढवून ३०.५ अब्ज डॉलर्स करण्यात आले. भारतीय कंपन्या आता सेमीकंडक्टरच्या डिझाईनसाठी परदेशी कंपन्यांसोबत भागीदारी करत आहेत.







## विचारपुष्प



एकविचाराने केलेल्या सहकार्यातून विलक्षण शक्तिस्त्रोत निर्माण होतो. शिवाजी महाराजांनी मिर्झा राजा जयसिंगाला लिहिलेल्या पत्रात वाक्य आहे, ''दो हृदय एक होनेपर पहाड भी तोड सकते हैं।''

**– स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# 'थार'ने दुचाकीस्वाराला चिरडण्याचा प्रयत्न

## दोन गटात सलग दोन दिवस झाली हाणामारी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १७ सप्टेंबर-**


अज्ञात कारणावरुन दोन गटात गेले दोन दिवस मारामारी झाल्याची घटना माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथील झिरपे वस्ती येथे घडली. यात थार या चारचाकी वाहनाद्वारे दुचाकीस्वाराला चिरडण्याचा प्रयत्न केला गेला. दरम्यान, सदर दुचाकीस्वार प्रसंगावधान राखत दुचाकीवरुन उडी मारल्याने त्याचा जीव वाचला. याप्रकरणी दोन्ही गटाकडील एकूण १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.



मंगळवार, दि.१५ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास हवालदार आणि देशमुख या दोन गटात हाणामारी झाली होती. यामध्ये चार जण किरकोळ जखमी झाले होते. याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात संबंधित लोकं आले असता गावातील पुढारी व कार्यकर्त्यांनी हस्तक्षेप करून वाद मिटवला होता. बुधवार, दि.१६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता बागले वस्तीजवळ दोन्ही गटात पुन्हा हाणामारी झाली.

यावेळी एम.एच.१२ ई.पी.०३०३ या क्रमांकाच्या थार हे चारचाकी वाहन रिव्हर्स घेत, एम.एच.४५ ए.डब्ल्यू.०९०९ आणि एम.एच.४५ ड्यु.६०७८ या क्रमांकाच्या दुचाकीला धडक देत यातील एका दुचाकीला फरफटत आणले. यावेळी जोरदार दगडफेकही करण्यात आली. दरम्यान, याबाबत ११२ या क्रमांकावर कॉल आल्याने पोलिस घटनास्थळी धाव घेतले. तोवर दोन्ही गटातील लोक तेथून पसार झाले. या घटनेचे चित्रीकरण सोशल मिडीयावर व्हायरल करण्यात आले. दोन्ही गटांनी तक्रार दिले नाही. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी पारस हवालदार, आप्पा आटकळे, अजय हवालदार, अमित देशमुख, अजित देशमुख, समाधान कोल्हे, निलेश देशमुख, रितेश देशमुख, किसन देशमुख, राहुल देशमुख, समाधान देशमुख, प्रतीक पाटील (सर्वजण रा.टेंभुर्णी) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

सोनपावलांनी गौराई आली, सुख-समृध्दी घेऊनी आली...
पान ९ वर




# भारताने अफगाणिस्तानला १२७ धावांनी नमवले

**नवी दिल्ली :** भारताने अफगाणिस्तानविरुद्धचा तिसरा टी-२० सामना १२७ धावांनी नमवित तीन सामन्यांच्या मालिकेत ३-० ने विजय मिळवला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर २२२ धावांचे लक्ष्य गाठताना अफगाणिस्तानचा संघ १४.१ षटकांत ९४ धावांवर सर्वबाद झाला. नितीश कुमार रेड्डी आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले. अक्षर पटेलने दोन, तर जसप्रीत बुमराह, यश ठाकूरने प्रत्येकी एक बळी घेतला.

अभिषेक शर्मा सर्वात जलद शतक करणारा भारतीय खेळाडू ठरला. त्याने ३० चेंडूंमध्ये हा टप्पा गाठत रोहित शर्माचा विक्रम मोडला. रोहितने २०१७ मध्ये इंदूर येथे श्रीलंकेविरुद्ध ३५ चेंडूंमध्ये शतक झळकावले होते. भारताने २० षटकांत ७ गडी गमावून २२१ धावा केल्या. अभिषेकने ३४ चेंडूंमध्ये १०८ धावा केल्या. संजू सॅमसनने ३५ चेंडूंमध्ये ५० धावा केल्या. भारताचे तीन खेळाडू धावबाद झाले.

(सविस्तर वृत्त पान ६वर)


# पोलिस ठाण्यासमोर तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**

एका ३७ वर्षीय तरुणाने चक्क पोलिस ठाण्यासमोर अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेऊन आत्महत्या केल्याची घटना माळशिरस तालुक्यातील नातेपुते पोलिस ठाणे येथे घडली. विनोद पोपट जोरे (रा.गिरीजापती नगर, नातेपुते, ता. माळशिरस) असे त्या तरुणाचे नाव आहे. यात सर्वांग भाजून गंभीर जखमी झाल्याने त्याला नातेपुते येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापुरातील एका खासगी रुग्णालयात दाखल केले होते. याठिकाणी उपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला. त्याने आत्महत्या का केली? याबाबतचे कारण समजू शकले नाही.

# मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित

**बीड :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २० दिवसांपासून सुरू असलेले मनोज जरांगे पाटील यांचे बेमुदत उपोषण स्थगित झाले आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या हा निर्णय घेतला. जरांगे पाटील यांनी सरकारला मागण्या पूर्ण करण्यासाठी ९० दिवसांची मुदत दिली आहे. मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा मुंबईला धडक देण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. सातारा, कोल्हापूर, पुणे आणि औंध संस्थानच्या गॅझेटची अंमलबजावणी करून कुणबी प्रमाणपत्रांसाठी तीन महिन्यांत सुधारित शासन निर्णय काढणे, शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख मराठा-कुणबी नोंदी कमी केल्या जाणार नाहीत, यासह इतर मागण्यांचा सुधारित आदेश काढला जाईल.






## महत्वाचे...



## अनिल काळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**बार्शी, दि. १७ सप्टेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो) येथील उपक्रमशील, कार्यतत्पर,शाळेच्या सर्वांगीण विकासात कायम अग्रेसर राहून तालुक्यात गुणवत्तेत आघाडीवर असणाऱ्या शाळेचे मुख्याध्यापक अनिल काळे यांना ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचा सन २०२६ चा राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त सुवर्णा पवार खंडागळे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर चरणसिंग रजपूत (पोलीस उपनिरीक्षक सोलापूर), अनिल बनसोडे (प्रशासनाधिकारी बार्शी नगरपालिका), अमृत नाना राऊत (माऊली उद्योग समूह), नंदकुमार खंदारे(अभियांत्रिकी सल्लागार उद्योजक पुणे), गोविंद तापडिया, नंदकुमार बरगे, हेमंत शिंदे, राहुल वाणी (अध्यक्ष), संतोष शेळगावकर, अजय तिवारी (सचिव), माणकोजी ताकभाते (खजिनदार) उपस्थित होते.



## ओझोन वायु जीवनाचा आधार : प्रा. डॉ. दीपक सकटे

**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

ओझोन वायु हा आपल्या जीवनाची संरक्षक छत्री आहे. अल्ट्राव्हायलेट सूर्यकिरणे शोषून घेऊन सजीवांना होणाऱ्या रोगांपासून व जागतिक तापमानवाढ रोखणारा महत्त्वाचा ओझोन वायू असल्याने तो जीवनाचा आधार असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथील संगणक शास्त्र संकुलाच्या संख्याशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. दिपक सकटे केले. ते वसुंधरा कला महाविद्यालयातील भूगोल विभाग व सामाजिक शास्त्रे मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. दिगंबर झोंबाडे, प्रा. डॉ. शिवाजी मस्के, प्रा. डॉ. बापू राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भूगोल विभागाने आंतरराष्ट्रीय प्रश्नमंजूषा , भित्तीपत्रक , ओझोन क्षय या विषयावर विद्यार्थ्यांनी पुस्तिका प्रकाशित केली. याप्रसंगी विद्यार्थी भूगोल व सामाजिक शास्त्र मंडळातील सदस्यांचे सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व संयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. बापू राऊत तर पाहुण्यांचा परिचय प्रा. अनिता पवार आभार श्रद्धा राऊत व सूत्रसंचालन वैष्णवी चव्हाण हिने केले.



## वालचंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतून वृक्षारोपणाचा संदेश

**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या नवीन ४८२ एकर परिसरामध्ये वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी श्रमदानातून वृक्षारोपण करून पर्यावरणाप्रती आपुलकी व जबाबदारी जोपासली. विद्यापीठाचे कुलगुरू आदरणीय प्रा. डॉ प्रकाश महानवर व राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित एकदिवसीय साखळी शिबिरामध्ये वालचंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकाकाने विद्यापीठातील ४८२ एकर परिसरामध्ये विविध झाडांचे वृक्षारोपण केले. यामध्ये फणस, संत्री, इडलिंबू, आवळा, आंबा तसेच इतर औषध उपयोगी असणाऱ्या अशा एकूण २४० रोपांचे रोपण करण्यात आले. उपक्रम यशस्वी होण्यामध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय वडेर, डॉ. अमोल शिंदे व डॉ पद्मावती पाटील यांनी योगदान दिले या यशस्वी उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## मतदार यादीच्या पुर्ननिरीक्षणसाठी मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन

**पंढरपूर, दि. १७ सप्टेंबर-**

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांची, विशेषतः नवमतदार, महिला व दिव्यांग नागरिकांची शंभर टक्के नोंदणी पूर्ण व्हावी, यासाठी प्रशासनामार्फत मतदारसंघात विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन केल्याचे मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले. मोहिमेअंतर्गत पंढरपूर विधानसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्रांवर दिनांक १९,२०,२६ आणि २७ सप्टेंबर या चार दिवसांच्या कालावधीत १० ते ६ पर्यंत विशेष नोंदणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. शिबिरांच्या वेळी सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी आपापल्या केंद्रांवर उपस्थित राहून नागरिकांकडून मतदार नोंदणी, माहितीतील दुरुस्ती तसेच नावे वगळण्याचे अर्ज भरून घेण्याचे निर्देश दिले आहेत. नव्याने मतदार नोंदणीसाठी दि. ०१ ऑक्टोंबर रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांसाठी नमुना क्र. ६ हा अर्ज करता येईल. मतदार यादीतील चुकीची अथवा मयत, स्थलांतरीत मतदारांची नोंद वगळण्यासाठी नमुना क्र. ७ हा अर्ज करता येईल. तसेच मतदारयादीमधील चुकीच्या नोंदी बदलण्यासाठी नमुना क्र. ८ हा अर्ज करता येईल.

# केंद्र सरकारने जाहीर केलेल्या 'यूपीआय' व्यापारी व्यवहाराच्या निर्णयावर पुनर्विचार व्हावा

### सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अर्थमंत्र्यांना पत्र



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर च्यावतीने २ हजार पेक्षा जास्त किमतीच्या UPI व्यापारी व्यवहारांवर ०.४% एमडीआर (मर्चंट डिस्काउंट रेट) लागू करण्याच्या निर्णयाचा केंद्र सरकारने पुनर्विचार करावा यासाठी सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना निवेदन दिले.

२,००० पेक्षा जास्त रकमेच्या 'व्यक्ती-ते-व्यापारी' युपीआय व्यवहारांवर ०.४% मर्चंट डिस्काउंट रेट लागू करण्याच्या निर्णयाची समीक्षा करण्याची विनंती केली आहे. हा नियम १५ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होणार आहे.

राजू राठी यांनी 'व्यक्ती-ते-व्यक्ती' व्यवहार आणि २,००० पर्यंतचे व्यापारी युपीआय व्यवहार शुल्कमुक्त ठेवण्याच्या सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. मात्र, त्याच वेळी त्यांनी चिंता व्यक्त केली आहे की, व्यापाऱ्यांवर वारंवार पडणारा हा अतिरिक्त व्यवहारांचा खर्च डिजिटल पेमेंट व्यवस्थेला बाधा आणू शकतो, ज्या व्यवस्थेने भारताला जगात डिजिटल पेमेंट क्षेत्रात अग्रस्थानी नेले आहे.

याबाबत अध्यक्ष राजू राठी म्हणाले की, युपीआय ही भारताच्या डिजिटल क्षेत्रातील सर्वात मोठ्या यशोगाथांपैकी एक आहे. छोट्या दुकानदारांपासून ते मोठ्या व्यावसायिक प्रतिष्ठानांपर्यंत, देशातील व्यापारी वर्गाने या डिजिटल क्रांतीला यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. याची आकडेवारीच याचे यश दर्शवते. एकट्या जुलै २०२६ मध्ये युपीआयद्वारे सुमारे २,३६६ कोटी व्यवहार झाले, ज्यांचे एकूण मूल्य सुमारे २९.८८ लाख कोटी होते. यावरून हे स्पष्ट होते की डिजिटल पेमेंट आज भारतीय अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग बनले आहे. सध्याच्या कठीण परिस्थितीत २,००० पेक्षा जास्त रकमेच्या व्यापारी युपीआय पेमेंटवर अतिरिक्त ०.४% एमडीआर लावण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

आजच्या काळात २,००० ही कोणत्याही दृष्टीने मोठी व्यावसायिक रक्कम मानता येणार नाही. कपडे, औषधे, इलेक्ट्रिकल वस्तू, स्पेअर पार्ट्स, ग्राहक उपयोगी वस्तू यांसह अनेक दैनंदिन खरेदी सहजपणे २,००० पेक्षा जास्त रकमेची होते.

डिजिटल पेमेंट स्वीकारणारा व्यापारी आधीच पारदर्शक आणि औपचारिक अर्थव्यवस्थेला बळकट करण्यात आपले योगदान देत आहे. अशा वर्तनाला प्रोत्साहन दिले पाहिजे. यामुळे एमडीआरच्या माध्यमातून व्यापारी आणि एमएसएमई वर टाकला जाऊ नये, अशी विनंती सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण केली आहे.



## समय सारोपक साधना शिबीर शिंगवी भवन येथे प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

परमपूज्य पट्टाचार्य विशुद्ध सागर महाराज यांचे परमशिष्य, उपनयन संस्कार प्रणेता, प्राचीन तीर्थ जिर्णोद्धारक श्रमणमुनी १०८ श्री सुप्रभ सागर महाराज, १०८ प्रणत सागर, क्षुल्लक १०५ विप्रज्ञ सागर महाराज, बा. ब्र . साकेत भैया यांच्या प्रेरणेने ४०० भारत भरातून आलेल्या दिगंबर जैन श्रावकांचे समय सारोपक साधना संस्कार शिबीर दहा दिवसाचे सुरू झाले.

शिंगवी भवानी येथे भव्य मंडप आकर्षक स्टेज मंदिर दोन एलसीडी स्क्रीन संगीतकार पंडित उत्कृष्ट भोजन निवास व्यवस्था शिबिरार्थींना सोवळे आणि किट, शास्त्र देण्यात आले आहे. श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट आणि पावस योग समिती यांनी उत्कृष्ट व्यवस्था केली आहे. दहा दिवस पुरुष धोती दुपट्ट्यामध्ये आणि महिला साडी मध्ये राहणे अनिवार्य आहे, शिबिराच्या पहिल्याच दिवशी वसमत गावावरून आलेले गंगाधर महाजन (७३) शिबिरामुळे दिनचर्येमुळे माझे आठ दिवसात ब्लॉकेजेस कमी झाले असे सांगितले.

## चतुरबाई श्राविका विद्यालय व बालमंदिर इमारतीचा नूतनीकरण उद्घाटन सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक विद्यालय व बालमंदिर, सोलापूर' या ऐतिहासिक आणि नामांकित शिक्षण संस्थेला ११४ वर्षे पूर्ण झाली. वास्तूचा नूतनीकरण उद्घाटन सोहळा पार पडला.




शतकोत्तर वाटचाल करत असलेल्या या संस्थेने दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच काळाची पावले ओळखून आपल्या पायाभूत सुविधांचे आधुनिक रूपरेषेत नूतनीकरण केले. सुंदर इमारतीत प्रशस्त, आकर्षक बेंचसह पंखे व मोठ्या खिडक्यासह उत्तम वायूविजन, भरपूर प्रकाशासह वर्गखोल्यांची निर्मिती करून प्रत्येक वर्गात 'स्मार्टबोर्ड'ची सुविधा उपलब्ध करून दिली. अशा या नूतनीकृत इमारतीचे उद्धाटन प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते तसेच श्राविका संस्थेचे सचिव यतिन शहा, विश्वस्त अंजली शहा, करण शहा व देवई शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या नव्या इमारतीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, प्रत्येक मजल्यावर स्वच्छता व सुरक्षिततेचे भान ठेवून तयार केलेले विद्यार्थी व शिक्षकांसाठीचे स्वतंत्र स्वच्छतागृह आणि सुरक्षित क्रीडांगण. शासकीय धोरणांची तंतोतंत अंमलबजावणी करत या सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रारंभी मुख्याध्यापिका राखी देशमाने यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष यतीन शहा यांनी यावेळी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रगती गांधी, प्रास्ताविक मुख्याध्यापिका राखी देशमाने, पाहुण्यांचा परिचय सुप्रिया सगरशेट्टी तर आभार कीर्ती माने यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रदीप ढेरे, रोहन शहा, अरिहंत माणिकशेट्टी व सुरज व्हसाळे या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## दरमहा ५ तारखेपूर्वी वेतन द्या

### ७व्या वेतन आयोगानुसार अर्जित रजेचे रोखीकरण द्या; सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

सोलापूर विभागातील अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजेचे रोखीकरण ७व्या वेतन आयोगानुसार त्वरित लागू करावे आणि दरमहा ५ तारखेपूर्वी वेतन नियमितपणे अदा करावे, अशी ठाम मागणी सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनच्या वतीने करण्यात आली आहे

यासंदर्भात सोलापूर विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांना युनियनच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी विद्यापीठ सिनेट सदस्य अजितकुमार संगवे, युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, सरचिटणीस राजेंद्र गिडडे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर, संतोष थाटकर, वाल्मीक झुंजारराव आदी उपस्थित होते.



**..तर संबंधित महाविद्यालयाचे वेतन प्रलंबित?**

या संदर्भात सहसंचालक डॉ. जाधव यांनी युनियनला आश्वासन दिले की, सर्व महाविद्यालयानी आपली वेतन देयके दर महिन्याच्या १७ तारखेपर्यंत सादर करावीत. जी महाविद्यालये याची कार्यवाही करणार नाहीत, त्यांचे वेतन पाच तारखेच्या आत होणार नाही. ते पुढील टप्प्यात होईल. तसेच अर्जित रजेच्या रोखीकरणासंदर्भात परिपत्रक काढण्यात आले असून याचे प्रस्ताव प्राप्त होताच याची बिलेही त्वरित काढण्यात येतील, असेही आश्वासन त्यांनी दिले

## करमाळ्यामध्ये तीन दिवस नामवंतांची व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१७ सप्टेंबर-**

करमाळा येथील सर्वोदय प्रतिष्ठानने याहीवर्षी गणेशोत्सवानिमित्त बौद्धिक व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत व्याख्यात्यांचा समावेश आहे. दि. १९ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर असे सलग तीन दिवस ही व्याख्यानमाला येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या विजयश्री सभागृहात रोज सायंकाळी सहा वाजता होणार आहे. व्याख्यानमालेमध्ये शनिवार दि. १९ सप्टेंबरोजी मुंबई येथील कवी, चित्रपट कथालेखक अरविंद जगताप यांचे गोष्ट छोटी डोंगराएवढी या विषयावर, तर रविवार दि. २० सप्टेंबर रोजी पुणे येथील लेखक देवा झिंजाड यांचे 'एक भाकर तीन चुली' या विषयावर आणि सोमवार दि. २१ सप्टेंबर रोजी माजलगाव येथील साहित्यिक प्रभाकर साळेगावकर यांचे 'क्रिएटिव्हिटी टू पॉझिटिव्हिटी' या विषयांवर व्याख्यान होणार आहे.

करमाळ्यातील सर्व विद्यार्थी, पालक व रसिकांनी या व्याख्यानांचा लाभ घ्यावा असे आवाहन सर्वोदय प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक चव्हाण व सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## गणेशोत्सवाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी शासनाची मोहीम

### जिल्ह्यातील गणेश मंडळांनी सहभागी व्हावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

महाराष्ट्राची वैभवशाली सांस्कृतिक ओळख असलेल्या गणेशोत्सवाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने व्यापक जनजागृती आणि प्रचार मोहीम राबवण्यात येत आहे.

या उत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून दर्जा देण्यात आला असून, युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मानांकन मिळवून देण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.



गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून आध्यात्मिक, सामाजिक आणि उद्योजकतेला चालना देणारी एक मोठी लोकचळवळ आहे. या अनुषंगाने महाराष्ट्राची कला, संस्कृती, हस्तकला आणि 'सॉफ्ट पॉवर'चा प्रसार करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने वर्षभर विविध उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. गणेशोत्सवाशी संबंधित ऐतिहासिक वारसा, घरगुती उत्सव, सजावट आणि खाद्यपरंपरा यांचे दस्तऐवजीकरण करून ते Baa.org या संकेतस्थळावर उपलब्ध केले जाणार आहे. 'घरोघरी बाप्पा' उपक्रमात नागरिकांचा सहभागसार्वजनिक मंडळांसोबतच नागरिकांनी आपल्या घरगुती गणेशोत्सवाची माहिती इर्शरि.िस वर नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणी करणाऱ्यांना शासनाचे अधिकृत 'Digital Cultural Preserver Certificate' दिले जाईल. तसेच स्थानिक कलाकार, कारागीर आणि लोककलावंतांच्या कौशल्याचेही दस्तऐवजीकरण केले जाईल. जिल्हा नोडल अधिकाऱ्यांची नियुक्तीमोहिमेच्या प्रभावी समन्वयासाठी प्रत्येक जिल्ह्यात वरिष्ठ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच या उपक्रमाचा नियमित आढावा घेण्यासाठी दरमहा आणि साप्ताहिक प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळांनी आणि नागरिकांनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दक्षिण तालुका दुष्काळ जाहीर करा

### पंचायत समितीच्या मासिक सभेत केला ठराव

### 'उमेद'च्या महिला बचत गटांना ३८ लाखांचे धनादेश वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

दोन महिन्यापेक्षा अधिक कालावधी पावसाने ओढ दिल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यात पाणीटंचाई आणि चारा टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करण्याचा ठराव पंचायत समितीच्या मासिक सर्वसाधारण सभेत करण्यात आला. शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सदस्यांनी केली.

पंचायत समिती सभापती संदीप टेळे यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीची सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी पंचायत समिती सदस्य बलवान गोतसुर्वे, मळिसद्ध मुगळे, पंचप्पा धनशेट्टी, सदस्या अंबिका पाटील, शिल्पा बिराजदार, प्रियंका खुबसंगे, अंबिका दुपारगुडे तसेच गटविकास अधिकारी मनोज राऊत, सहायक गटविकास अधिकारी सनी चव्हाण उपस्थित होते.



यावेळी तालुक्यातील वीज वितरण, जीवन प्राधिकरण, आदिवासी प्रकल्प, आर.बी.एस.के., लघु पाटबंधारे, बांधकाम, शिक्षण, कृषी, उमेद, ग्रामपंचायत, घरकुल, समाजकल्याण, संजय गांधी निराधार योजना आणि पाणीपुरवठा आदी विविध विभागांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत 'उमेद' महिला बचत गटातील लाभार्थींना बँक कर्ज, समुदाय गुंतवणूक निधी व वैयक्तिक व्यवसाय कर्ज अशा विविध माध्यमातून एकूण ३८ लाख रुपयांच्या निधीची मंजुरीपत्रे देण्यात आली.

ही मंजुरीपत्रे पंचायत समिती सभापती संदीप टेळे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, पंचायत समिती गटनेते बलवान गोतसुर्वे, मळिसद्ध मुगळे, पंचप्पा धनशेट्टी, सदस्या अंबिका पाटील, अंबिका दुपारगुडे, प्रियंका कुबसंगे, शिल्पा बिराजदार यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. यावेळी सहायक गटविकास अधिकारी सनी चव्हाण, प्रशासनाधिकारी अविनाश गोडसे कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनीषा वास्ते, कनिष्ठ सहाय्यक जिलानी अंसारी उपस्थित होते.

**तात्काळ दुष्काळ जाहीर करा**

दक्षिण सोलापूर तालुक्यात दोन महिन्यापेक्षा अधिक दिवस पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे तालुक्यातील उडीद, मटकी, बाजरी, मका, भुईमूग, सोयाबीन यासारखी पिके करपून चालली आहेत. ओलाव्याअभावी पिके जळून जात आहे. शिवाय उसासह फळबागांना कडक उन्हामुळे पाणी देणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे सरकारने तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करावे .

**- संदीप टेळे, सभापती, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर**



## सुलेर जवळगे ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी प्रेमदास पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील सुलेर जवळगे ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रेमदास पवार यांनी बुधवारी पदभार स्वीकारला.

गेल्या सहा महिन्यांपासून ग्राम पंचायतीचा प्रशासकीय कारभार तत्कालीन सरपंचांकडे होता. ही मुदत पूर्ण झाल्यानंतर ग्रामविकास विभागाच्या निर्णयानुसार मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर शासनाचे प्रतिनिधी म्हणून प्रशासक नियुक्त करण्यात येत आहेत. त्यानुसार सुलेर जवळगे ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी प्रेमदास पवार यांची नियुक्ती करण्यात आली.

पदभार स्वीकारल्यानंतर प्रेमदास पवार यांचा माजी सरपंच सुरेश अर्जुन, सोसायटीचे चेअरमन रविकांत बगले, माजी उपसरपंच नागनाथ पाटील, सुरेश चव्हाण आणि ग्रामविकास अधिकारी बसवराज झुंजा यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी युवा नेते नागराज स्वामी, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य श्रीशैल नाव्ही, लक्ष्मण कोळी, जेट्टप्पा घोडके, मल्लिकार्जुन कोळी, रमेश कासवीद, अप्पाराव चव्हाण, मोहसीन मुल्ला उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### हेमकुंड साहिबमध्ये पहिली हिमवृष्टी

**चमोली :** श्री हेमकुंड साहिब या शिखांच्या पवित्र तीर्थक्षेत्रात मोसमातील पहिल्या हिमवृष्टीमुळे नवचैतन्य संचारले आहे. गुरुवारी सकाळी पावसासोबतच हिमवृष्टी झाली. बर्फाच्या पांढऱ्या चादरीत आच्छादलेले हेमकुंड साहिबचे मनमोहक दृश्य भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. हिमवृष्टीमुळे हेमकुंड साहिब येथे दाखल झालेले शिख भाविक अत्यंत उत्साही होते. भाविकांनी गुरुद्वारात वंदन केले आणि मोसमातील पहिल्या हिमवृष्टीचा आनंद लुटला. भाविकांनी सांगितले की, हेमकुंड साहिबसारख्या पवित्र तीर्थक्षेत्राला भेट देण्यासोबतच पहिली हिमवृष्टी पाहण्याची संधी मिळणे हा एक विशेष अनुभव आहे. बर्फाच्छादित शिखरे आणि गुरुद्वारा परिसराचे दृश्य भाविकांना आकर्षित करत आहे. पाऊस थांबल्यानंतर हेमकुंड साहिबच्या यात्रेलाही गती मिळाली आहे. सध्या दररोज अंदाजे १,५०० ते १,८०० भाविक हेमकुंड साहिब येथे येत आहेत. हेमकुंड साहिबसोबतच, मोठ्या संख्येने पर्यटक 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'लाही भेट देत आहेत. १६ सप्टेंबरपर्यंत सुमारे ३,२६,८२८ भाविकांनी हेमकुंड साहिब येथे दर्शन घेतले आहे.



नवी दिल्लीतील हॉटेल ताजमध्ये झालेल्या एका व्यावसायिक कार्यक्रमात अभिनेत्री तमन्ना भाटिया

### वीज कोसळून सहा ठार, चार जखमी


**छ. संभाजीनगर :** मराठवाड्यातील काही जिल्ह्यात गुरुवारी वादळी पावसाने जोरदार हजेरी लावली. अशातच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड आणि सिल्लोड तालुक्यात शेतात वीज कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला, तर चार जखमी आहे. मृतकांमध्ये पती-पत्नीचा समावेश आहे. कन्नड येथे चार, तर सिल्लोडमध्ये वीज कोसळून दोघांचा मृत्यू झाला. आजूबाजूला असलेल्या लोकांनी याची माहिती पोलिसांना दिली. जखमींना उपचारासाठी तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सहा जणांना मृत घोषित केले, तर चार जणांवर उपचार सुरू आहे. जिल्ह्यातील या दोन घटनांमुळे हळहळ व्यक्त होत असून, वादळी पावसादरम्यान नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### तलावात बुडून सहा मुलांचा मृत्यू

**संगारेड्डी :** तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील पेड्डाकंजेर्ला गावात गणपती विसर्जन करताना तलावातील पाण्याचा अंदाज न आल्याने सहा मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. बाप्पाला निरोप देण्यासाठी गेलेल्या या लहान मुलांचा अचानक तोल गेल्याने ती खोल पाण्यात बुडाली. पेड्डाकंजेर्ला गावातील काही मुले बाप्पाच्या मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी नेरेडू चेरुवू तलावावर गेली होती. विसर्जनादरम्यान ही मुले पाण्यात उतरली. विसर्जन करत असताना ती नकळत खोल पाण्यात गेली आणि बुडू लागली. मुलांना पोहता येत नव्हते. खोल पाण्याचा अंदाज न आल्याने आणि पाण्याचा लोट जास्त असल्यामुळे ते स्वतःला वाचवू शकले नाहीत, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. ही दुर्घटना घडताच उपस्थितांनीत्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला.

# शंभर टक्के शुल्काचे विधेयक पारित

## भारत-चीनवर टॅरिफ आकारण्याचा ट्रम्प यांना अधिकार



**वॉशिंग्टन, १७ सप्टेंबर**

रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क आकारण्यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना अधिकार देणारे विधेयक अमेरिकेच्या 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज'मध्ये (काँग्रेस) बहुमताने पारित झाले. या विधेयकामुळे भारत आणि चीनसारख्या रशियन तेलाच्या मोठ्या खरेदीदारांवर संभाव्य शुल्काचा धोका निर्माण झाला आहे. आता राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना भारत आणि चीनसह रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंतचे टॅरिफ आकारण्याचा अधिकार मिळणार आहे.

काँग्रेसमध्ये २६२ खासदारांनी बाजूने आणि १५९ जणांनी विरोधात मतदान केले. ६१ पानांचे हे विधेयक आता राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्वाक्षरीसाठी पाठवण्यात आले आहे. हे विधेयक गेल्या महिन्यांत अमेरिकेच्या सिनेटमध्येही ८६-११ मतांनी मंजूर झाले होते. याचे नाव 'लिंडसे ओ. ग्रॅहम रशिया आणि इराण निर्बंध कायदा २०२६' असे आहे. हे नाव सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांच्या सन्मानार्थ ठेवण्यात आले. विधेयकाचे मुख्य लक्ष्य रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या प्रमुख देशांवर आर्थिक दबाव आणून रशियाचा ऊर्जा महसूल कमी करणे आहे. या विधेयकामुळे राष्ट्राध्यक्षांना रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांच्या उत्पादनांवर शंभर टक्क्यापर्यंत टॅरिफ आकारण्याचा अधिकार मिळेल, चीन आणि भारतासारख्या देशांवरही याचा परिणाम होऊ शकतो.

**डेमोक्रॅटिक खासदारांचा विरोध**

डेमोक्रॅटिक खासदारांनी विधेयकाला विरोध करताना म्हटले की, या विधेयकामुळे राष्ट्राध्यक्षांना अमर्याद अधिकार मिळणार असून, याचा गैरवापर होऊ शकतो. भारतावर शुल्क आकारणे अमेरिकेला परवडणार नाही. तेल आणि वायू खरेदीसाठी पर्याय उपलब्ध करणे गरजेचे आहे. यासाठी संबंधित देशांना पुरेसा वेळ द्यायला हवा. शुल्काचे अधिकार मिळाल्याने राष्ट्राध्यक्ष या देशांवर दबाव आणू शकतात. (वृत्तसंस्था)

### १४० कोटी भारतीयांच्या ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य

अमेरिकन काँग्रेसने रशिया आणि इराणवर कठोर निर्बंध लादणारे विधेयक मंजूर केल्याच्या पृष्ठभूमीवर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी आपली भूमिका स्पष्ट करत म्हटले की, १४० कोटी भारतीयांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहे. अमेरिकेने शुल्क आकारल्यास याचा द्विपक्षीय संबंधांवर परिणाम होऊ शकतो. विविध स्त्रोतांकडून ऊर्जा मिळवून आणि बदलत्या बाजारपेठेच्या परिस्थितीशी जुळवून घेऊन भारत तेल खरेदी सुरू ठेवेल.

### विधेयकाचा परिणाम

- राष्ट्राध्यक्षांना रशियाकडून तेल, वायू खरेदी करणाऱ्या देशांवर शुल्क आकारण्याचा अधिकार मिळेल
- भारत आणि चीनने रशियन तेल खरेदी करणे सुरूच ठेवल्यास त्यांच्यावर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क आकारले जाईल
- विधेयक रशियन सरकारी अधिकारी, अब्जाधीश, त्यांच्या कुटुंबातील काही सदस्य आणि रशियन वित्तीय संस्थांनाही लक्ष्य करते
- इराणच्या शस्त्रास्त्र आणि ऊर्जा क्षेत्रावर निर्बंध लादण्याचा अधिकार राष्ट्रामध्यक्षांना मिळणार आहे

## विदर्भातील अष्टविनायक

# 'अष्टादशभुजा विनायक' रामटेकमध्ये विराजमान

### प्राचीन दगडी वास्तुकलेचा अद्भूत नमुना

**अशोक सारंगपुरे**



**रामटेक, १७ सप्टेंबर**

प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रामटेक येथील ऐतिहासिक गड मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर वसलेले श्री अष्टादशभुजा गणपती मंदिर सध्या सुरू असलेल्या दहा दिवसांच्या गणेशोत्सवामुळे संपूर्ण विदर्भाचे केंद्रबिंदू ठरले आहे. विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक असलेल्या या जागृत देवस्थानात बाप्पांची तब्बल १८ हातांची (अष्टादशभजा) डाव्या सोंडेची अत्यंत दुर्मिळ मूर्ती प्रस्थापित आहे. हिंदू पौराणिक परंपरेनुसार भारतात अशी अष्टादशभुजा मूर्ती अतिशय दुर्मिळ मानली जाते. बाप्पांच्या प्रत्येक हातात विविध आयुधे व शुभ चिन्हे शोभून दिसत असून, हे रूप डोळ्यांत साठवण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

गणेशोत्सवाच्या पृष्ठभूमीवर या प्राचीन दगडी वास्तुकलेच्या मंदिरात कडक धार्मिक शिस्तीत विधिवत पूजा-अर्चा सुरू आहे. अथर्वशीर्ष पठण, महाभिषेक आणि विशेष महाआरतीमुळे संपूर्ण रामटेक परिसर भक्तिमय झाला आहे.

राम मंदिराच्या दर्शनापूर्वी किंवा नंतर या दुर्मिळ बाप्पांचे दर्शन घेणे परंपरा बनली आहे. पुरातत्त्व आणि इतिहासाच्या अभ्यासकांसाठीही हे ठिकाण आकर्षण ठरत आहे.

### प्रवास मार्ग व दळणवळण (प्रवाशांसाठी माहिती )

- **मार्ग (नागपूर ते रामटेक)** : नागपूरहून थेट राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ आणि मनसर-रामटेक मार्गाने जाता येते.
- **अंतर** : नागपूरपासून रामटेकचे अंतर अंदाजे ४५ ते ५० किलोमीटर आहे.
- **वेळ** : खाजगी वाहन किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या बसने साधारणपणे १ ते १.५ तासात पोहोचता येते.
- **विशेष सुविधा** : गणेशोत्सवादरम्यान नागपूरवरून रामटेकसाठी विशेष बस. गडाच्या पायथ्याशीच मंदिर असल्याने सहज दर्शन शक्य होते.

# हिंदी भाषेबाबत दृष्टिकोन बदला

**चेन्नई, १७ सप्टेंबर**

संघराज्यीय रचनेत केंद्र सरकार आणि राज्यांमध्ये सहकार्य आवश्यक आहे. केंद्राने समवर्ती सूचीअंतर्गत एखादे धोरण आणले आणि प्रत्येक राज्याने ते स्वीकारण्यास नकार दिला, तर संघराज्यीय प्रणाली कशी कार्य करेल, असा प्रश्न उपस्थित करत हिंदीबाबत तुम्हाला तुमचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे, असे खडे बोल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी तामिळनाडू सरकारला सुनावले.

न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांच्या न्यायासनाने तामिळनाडूच्या भूमीवर हिंदी शिकवली जाणार नाही, असे होऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. १५ डिसेंबर २०२५ रोजी, न्यायालयाने तामिळनाडू सरकारला राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नवोदय विद्यालये स्थापन करण्यासाठी आवश्यक जमीन निश्चित करण्याचा निर्देश दिला होता. न्यायालयाने यासाठी सहा आठवड्यांचा कालावधी दिला होता.

तामिळनाडूचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील जयदीप गुप्ता यांनी सांगितले की, राज्याने सर्वोच्च न्यायालयाचा आदेश मागे घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. यावर न्यायासनाने स्पष्ट केले की, ते १५ डिसेंबरचा आदेश रद्द करणार नाही. तथापि, राज्य सरकारला जमीन निश्चित करण्यासाठी सरकारला तीन महिन्यांचा कालावधी मिळेल.

**त्रिभाषा धोरणाला सरकारचा विरोध**

तामिळनाडू सरकारने राज्यात नवोदय विद्यालयांच्या स्थापनेला प्रामुख्याने या शाळांमध्ये लागू केलेल्या त्रिभाषा धोरणाच्या अभ्यासक्रमामुळे विरोध केला आहे. सुनावणीदरम्यान, न्यायासनाने राज्याच्या वकिलाला सांगितले की, जर राज्याचा दावा असेल की तामिळनाडूच्या जमिनीवर हिंदी शिकवली जाते म्हणून त्यांना नवोदय विद्यालय नको आहेत, तर त्यांनी आधी आपली भूमिका बदलावी. जयदीप गुप्ता यांनी उत्तर दिले की, तामिळनाडू सरकारचा हिंदी शिकवण्यास अजिबात विरोध नाही.

**भाषा धोरणाचा प्रश्न संवादातून सोडवा**

केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के. एम. नटराज यांनी सांगितले की, तामिळनाडू सरकारची प्राथमिक गरज जमीन उपलब्ध करून देणे आहे. केंद्र सरकार इतर सर्व व्यवस्थांची काळजी घेईल. त्यामुळे राज्य सरकारवर कोणताही भार पडणार नाही. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकार या दोघांनाही संवाद साधून भाषा धोरणाचा प्रश्न संयुक्तपणे सोडवावा, असा निर्देश दिला. (वृत्तसंस्था)

# मणिपूर मदत शिबिरांमधील मृत्यू धक्कादायक

## सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य सचिवांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा निर्देश

**नवी दिल्ली, १७ सप्टेंबर**

मणिपूरच्या मदत शिबिरांमधील ३० पेक्षा जास्त मृत्यू, विशेषतः अनैसर्गिक मृत्यूंबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. न्यायालयाने मुख्य सचिवांकडून प्रतिज्ञापत्र मागवले असून, सर्व अनैसर्गिक मृत्यूंची एफआयआर दाखल करण्याचा, तपासाला गती देण्याचा आणि मदत शिबिरांमध्ये राहणाऱ्या विस्थापित लोकांची सुरक्षा व सन्मान सुनिश्चित करण्याचा निर्देश राज्य सरकारला दिला आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्या. जॉयमाल्या बागची व न्या. व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या तीन सदस्यीय न्यायासनाने मदत शिबिरांमधील मृत्यूंबाबत न्या. गीता मित्तल समितीने माहिती देऊनही कोणतीही ठोस कारवाई का केली नाही, असा प्रश्न राज्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारला. ३४ पैकी केवळ २० प्रकरणांमध्येच शवविच्छेदन का करण्यात आले, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला.



**भरपाईबाबतही प्रश्न उपस्थित**

न्यायासनाने पुढे म्हटले की, मदत शिबिरांमध्ये राहणाऱ्या अंतर्गत विस्थापित व्यक्तींच्या अनैसर्गिक मृत्यूंसाठी केवळ २०,००० ते ३०,००० रुपयांची भरपाई का देण्यात आली, याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने द्यावे. मणिपूर राज्य विधी सेवा प्राधिकरणाला या प्रकरणी स्वतंत्र सद्यःस्थिती अहवाल दाखल करावा.

सर्व अनैसर्गिक मृत्यूंच्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदवले जावेत, असा निर्देश सरन्यायाधीशांनी मणिपूर राज्य कायदा प्राधिकरणाला दिला आहे.

**विशेष सत्र न्यायालयांत लवकरच सुनावणी**

न्या. गीता मित्तल समिती आणि एका आयएएस अधिकाऱ्याच्या अहवालांचा विचार करून न्यायासनाने हा आदेश जारी केला. या अहवालांनुसार मणिपूरमधील मदत शिबिरांमध्ये ३० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला होता. यापैकी एक मृत्यू लैंगिक अत्याचारानंतर झाल्याचेही वृत्त आहे. मणिपूरमधील २०२३ च्या वांशिक हिंसाचाराशी संबंधित सीबीआय आणि एनआयए प्रकरणांची केवळ सुनावणी करण्यासाठी स्थापन केलेली दोन विशेष सत्र न्यायालये लवकरच त्यांच्या खटल्यांची सुनावणी पूर्ण करतील, अशी आशा सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

# वीज पडून शेतकरी दाम्पत्यासह पाच ठार

**छ. संभाजीनगर, १७ सप्टेंबर**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गुरुवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस झाला. यादरम्यान, वीज पडून घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू झाला तर चार जण गंभीर जखमी झालेत. यात सिल्लोड येथील शेतकरी दाम्पत्याचा समावेश आहे. दरम्यान, जालन्यासह मराठवाड्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला.

त्यातच, संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड तालुक्यातील दहिगाव येथे वादळी पावसादरम्यान शेतातील झोपडीत आसरा घेतलेल्या पती-पत्नीवर काळाने घाला घातला. झोपडीवर वीज कोसळल्याने पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. तसेच कन्नड तालुक्यातील पिशोर येथेही वीज पडली. या घटनेत तीन महिलांचा मृत्यू झाला असून, दोन महिला आणि एक पुरुष गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या दोन घटनांमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. (वृत्तसंस्था)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नरेंद्र मोदी यांचे मेहसाणा जिल्ह्यातील मूळ गाव वडनगर येथील शर्मिष्ठा तलावावर धार्मिक विधी केले

# वाहनाचा विमा नसेल, तर पेट्रोल-डिझेल नाही

### पेट्रोल पंपावरच नंबरप्लेट स्कॅन होणार

**नवी दिल्ली, १७ सप्टेंबर**

सर्वोच्च न्यायालयाच्या 'विमा नाही, तर इंधन नाही' या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी 'इन्शुरन्स रेग्युलेटरी अँण्ड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया' (आयआरडीएआय) लवकरच एका नव्या प्रणालीची चाचणी घेणार आहे. या अंतर्गत ऑटोमेटेड नंबर प्लेट रिकग्निशन प्रणालीद्वारे वाहनांच्या नोंदणी क्रमांकांची पडताळणी 'इन्शुरन्स इन्फॉर्मेशन ब्युरो' आणि 'वाहन' पोर्टलवरील तपशीलाशी जोडली जाणार आहे. नंबरप्लेट स्कॅन करून वाहनाचा विमा तपासला जाणार असून, विमा नसल्यास वाहनधारकाला इंधन मिळणार नाही.

आयआरडीएआय देशातील काही निवडक शहरांमध्ये या प्रणालीची चाचणी घेणार असून, अद्याप शहरांची नावे निश्चित झालेली नाहीत. या प्रस्तावित यंत्रणेमुळे भविष्यात पेट्रोल किंवा डिझेल पंपांवर वैध थर्ड-पार्टी मोटर विमा नसलेल्या वाहनांना इंधन देणे बंद करणे शक्य होईल. जर ही चाचणी यशस्वी ठरली, तर विम्याविना धावणारी लाखो वाहने अधिकृत विमा बाजाराच्या कक्षेत येणार असल्याची माहिती आयआरडीएआयच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. वाहन क्रमांकावरून विम्याची स्थिती तपासता यावे, असे तंत्रज्ञान आणि डेटा प्रणाली तयार करणे हे आयआरडीएआयचे उद्दिष्ट आहे.

यासाठी एएनपीआर कॅमेराचा वापर केला जाणार आहे. कॅमेऱ्यांनी टिपलेला वाहन क्रमांक हा 'कॉमन आयडेंटिफायर' म्हणून वापरला जाईल. आयआरडीएआयने यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाला माहिती दिली आहे. महामार्ग, टोल नाके आणि शहरातील रस्त्यांवर बसवलेल्या एएनपीआर कॅमेऱ्यांच्या माध्यमातून विमा नसलेली वाहने ओळखण्यात येईल आणि याचा तपशील संबंधित पेट्रोलपंप संचालकांना देण्यात येणार आहे.

**५६ टक्के वाहनांचा विमा नाही**

सर्वोच्च न्यायालयाच्या आकडेवारीनुसार, देशातील ३०.४८ कोटी नोंदणीकृत वाहनांपैकी तब्बल १६.५४ कोटी वाहनांकडे (जवळपास ५६ टक्के) वैध विमा नाही. सक्तीच्या थर्ड-पार्टी विम्याच्या नियमांचे तंतोतंत पालन व्हावे आणि रस्त्यावरील सुरक्षेसाठी उपलब्ध डेटाबेसचा प्रभावी वापर करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. विमा नसल्याचे आढळलेल्या वाहनांबाबत पेट्रोल पंपांवर कोणती प्रक्रिया राबवायची, याचीही चाचणी घेतली जाईल. (वृत्तसंस्था)

### सर्वोच्च न्यायालयाचा काय होता निर्देश?

सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑगस्ट रोजी दिलेल्या निकालात आयआरडीएआयला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या सल्लामसलतीने वैध वाहन विम्याची स्थिती आणि इंधन पुरवठा यांचा संबंध जोडणारी प्रायोगिक व्यवस्था विकसित करण्याचा निर्देश दिला होता. या यंत्रणेत एएनपीआर कॅमेऱ्यांच्या मदतीने विमा नसलेली किंवा नोंदणी नसलेली वाहने ओळखली जाऊ शकतात.

# नासाच्या अंतराळयानाने शोधले चंद्रावर नवीन विवर


## ७२८ फूट रुंद, १४१ फुटांपर्यंत खोल, उल्कापातामुळे तयार झाल्याची शक्यता

**केप कॅनॅव्हेरल, १६ सप्टेंबर**

अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या अंतराळयानाने चंद्रावर ७२८ फूट रुंद, १४१ फुटांपर्यंत खोल विवर शोधण्यात यश मिळवले आहे. अंतराळयानाने पाठवलेल्या छायाचित्राच्या आधारे शास्त्रज्ञांनी विवराचा तपशील जाहीर केला. रोमन कोलोसियमपेक्षा मोठे असलेले विवर दोन वर्षांपूर्वी झालेल्या एका शक्तिशाली धडकेचा परिणाम असल्याची शक्यता आहे. अलिकडच्या काळात मोठ्या उल्कापातामुळे चंद्रावर विवर तयार झाल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

अशा प्रकारची मोठी घटना दर १३२ वर्षांतून एकदाच घडते, असे संशोधकांनी म्हटले आहे. नासा चंद्रावर अंतराळवीरांसाठी तळ उभारण्याच्या तयारीत असताना विवराचा शोध लागला आहे. नासाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, लुनार रिकॉनिसन्स ऑर्बिटरने चंद्राच्या पृष्ठभागावर विवर शोधले, जे एका लघुग्रहाच्या अथवा धूमकेतूच्या आदळल्यामुळे तयार झाल्याची शक्यता आहे. चंद्रावर झालेल्या या आघाताचे निरीक्षण पृथ्वीवरील आणि अवकाशातील दुर्बिणींना प्रत्यक्ष वेळेत करता आले नाही. अंतराळयानाने तपशीलवार छायाचित्रे गोळा केली, त्यानंतर विवराची माहिती समोर आली.

ह्यूस्टनच्या लुनार अँण्ड प्लॅनेटरी इन्स्टिट्यूटचे माजी संचालक यांनी सांगितले की, दहा वर्षांपूर्वी एलआरओने शोधलेल्या मागील विक्रमी विवराच्या तुलनेत हे तिप्पट मोठे आहे. (वृत्तसंस्था)



### १०० किलोमीटरपेक्षा जास्त भाग व्यापला

चंद्राच्या पृष्ठभागावर झालेल्या धडकेमुळे विवराने १०० किलोमीटरपेक्षा जास्त भाग व्यापला आहे. नवीन विवराभोवती ७ किलोमीटर रुंदीचा एक थंड भाग आढळून आला आहे, जो चंद्राच्या वरच्या मातीतील ढिसाळपणाशी सुसंगत आहे. नासाच्या अंतराळयानाने आतापर्यंत शोधलेल्या असंख्य विवराच्या निरीक्षणातून दिसून येते की, चंद्राच्या पृष्ठभागावरील मातीचा थर बाहेर फेकला गेल्याने मोठे ढिगारे तयार होत आहे. ही प्रक्रिया पूर्वीपेक्षा अधिक वेगवान असून, याचा शोध शास्त्रज्ञ घेत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# दिला इशारा, जाता जाता!

हवामान बदल किंवा वातावरणातील बदल तसेच ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्या यापुढे दिवसेंदिवस तीव्र होत जाणार असून त्यामुळे संभाव्य आपत्तींशी सामना करण्याचे मोठे आव्हान जगासमोर राहणार आहे हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आपत्ती ओढवल्यानंतर आक्रोश करत केवळ बचावासाठी धडपडत राहण्याऐवजी आपत्तींचा फटका अधिकाधिक सौम्य कसा करता येईल, आपत्तींमुळे होणाऱ्या जीवित किंवा वित्तहानीचे प्रमाण कमीत कमी कसे राखता येईल यासाठी अधिकाधिक प्रयत्न करण्यातच खरा समंजसपणा आहे, हेदेखील आता ओळखले पाहिजे. अशा आपत्तींनी आजवर जगाच्या कानाकोपऱ्यात अनेकांच्या जगण्यावर असंख्य ओरखडे ओढले. ज्यांना नैसर्गिक आपत्ती म्हटले जाते, अशा संकटांनी असंख्य जिवांचा घास घेतला, घाम गाळून उभ्या केलेल्या विकासचिन्हांची वाताहत करून टाकली आणि अशा संकटांसमोर हतबलपणे हात टेकण्याखेरीज आपण काहीही करू शकत नाही याची जाणीवही या आपत्तींनी करून दिली. काही वेळा, समस्या हा दैनंदिन जगण्याचाच भाग होऊन जातो. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या किंवा हिमालयात उगम पावलेल्या नद्यांच्या तीरावर वसलेल्या असंख्य लहानमोठ्या गावांना तर आपत्तींना तोंड देण्याची सदैव तयारी ठेवावी लागते. नैसर्गिक आपत्ती म्हणून अशा संकटांना दूषणे देण्यापेक्षा या आपत्तींच्या उत्पत्तीमधील आपल्या पापाचा वाटा किती आणि त्याच्या फटक्यातून होणारी आपल्या पापाची परतफेड किती याचा लेखाजोखा गांभीर्याने मांडण्याची वेळ आता आली आहे.

त्याचा पहिला इशारा यंदाच्या मान्सूनच्या पावसाने दिला. या आठवडाभरात मान्सूनच्या पावसाचा परतीचा प्रवास सुरू होणार असल्याचे हवामान खात्याने जाहीर केले आहे. त्यामुळे, नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याच्या दिवसांत मान्सूनच्या वाऱ्यांनी पावसाची जी काही वाताहत करून टाकली, त्याच्या परिणामांचे चटके आता सुरू होणार आहेत यात शंका नाही. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाळा अनियमित आणि अपुरा असेल असे भाकीत पावसाळ्याआधीच वर्तविले गेले होते. अपुऱ्या पावसाने ते खरे करून दाखविले. त्यामुळे, पुढच्या पावसाळ्यापर्यंतच्या काळात अपुऱ्या पावसाच्या परिणामांना तोंड देण्याची सज्जता करणे आता क्रमप्राप्त ठरणार आहे. येत्या काळात पाणीटंचाईचा प्रश्न अधिक तीव्र होणार आहे. नद्या, कालवे, धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा नसल्याने, पाणीटंचाईचे फटके दैनंदिन जनजीवनाबरोबरच शेती, उद्योगक्षेत्रासही बसणार असल्याने त्याचे थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम घरोघरी सोसावे लागण्याची चिन्हे उमटवूनच पावसाळ्याच्या परतीच्या प्रवासाची वाट धरली आहे. त्यामुळे, मान्सूनची माघार ही केवळ हवामानशास्त्रीय घडामोड राहिली नसून ती देशातील पाणीटंचाई, अन्नधान्याचे उत्पादन, अर्थकारण आणि समाजजीवनावर दूरगामी परिणाम करणारी ठरणार आहे. यंदा पावसाने सुरुवातीपासूनच हुलकावणी दिली. देशाच्या अनेक राज्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस नोंदविला गेल्याने, पाणीसाठ्याचे स्रोत पुरते भरले नाहीत.

सुदैवाने, महाराष्ट्राला या संभाव्य संकटाची जाणीव असल्याचे दिसते, ही समाधानाची बाब आहे. मुळात या संकटाकडे नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहिले जात असले, तरी त्याचे संपूर्ण खापर केवळ निसर्गावर फोडणे हा निसर्गावरील अन्याय ठरणार आहे. निसर्ग कोपतो, नद्या रौद्ररूप धारण करतात, आकाश फाटल्यागत पाऊस कोसळतो किंवा कायमची दडी मारतो, उन्हाळा अंग भाजून काढतो, कडाक्याची थंडी जीवघेणी ठरते, दुष्काळात जमिनीला भेगा पडतात, तेव्हा आपण नैसर्गिक आपत्ती म्हणून त्याकडे पाहत हतबल होत असलो, तरी गेल्या काही दशकांतील अशा आपत्तींचा इतिहास पाहता या समजुतीला बराचसा छेद मिळत असून निसर्गाच्या वाटेवर विकासाच्या नावाखाली निर्माण केले गेलेले अनेक अडथळेच या आपत्तींना अधिक उग्र करत असल्याचे या इतिहासावरून स्पष्ट झाले आहे. सुमारे बारा वर्षांपूर्वी उत्तराखंडवर प्रलयाच्या रूपाने कोसळलेल्या आपत्तीने वास्तवाचे भान तेव्हाच करून दिले होते. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या तेव्हाच्या अहवालानुसार या आपत्तींचे मूळ नैसर्गिक असले तरी मानवी हस्तक्षेपामुळे आपत्तींचे रूप अधिक उग्र झाले आणि असुरक्षितता अनेक पटींनी वाढली असे स्पष्ट झाले होते. सुमारे आठ वर्षांपूर्वी केरळमधील महापुरामुळे भूस्खलनाच्या साडेतीनशे घटना घडल्या, सुमारे ५० लाखांहून अधिक लोकसंख्येला या संकटाचा फटका बसला, सुमारे साडेचारशे लोकांचा मृत्यू ओढवला, तेव्हाच्या अनेक अहवालांतही, केवळ नैसर्गिक आपत्तींवर याचा ठपका ठेवलेला नव्हता. आपत्ती व्यवस्थापन, जलसंपदा व्यवस्थापन, जलस्रोतांचे नियोजन, या सर्वांचा आपत्तींच्या तीव्रतेशी संबंध असतो, ते नेपाळमधील प्रलयानेही दाखवून दिले आहे. भारतात तर आपत्तींना आमंत्रण देणाऱ्या बेफिकिरीचा सुळसुळाट दिसतो. महाराष्ट्रात आजवरच्या अनुभवातून पाणलोट क्षेत्रविकास, जलसंधारण, भूजलाचे पुनर्भरण, पीक पद्धती आणि शेतीचे नियोजन यांचे महत्त्व वारंवार अधोरेखित झाले आहे. पाऊस किती पडावा हे आपल्या हातात नसेल, तर पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन कसे करावे, किती पाणी जमिनीत मुरवावे, किती पाण्याचा वापर शेतीसाठी करावा, किती पाणी उद्योगांकरिता वापरावे आणि किती पाणी पिण्याकरिता राखून ठेवावे याचे निर्णय घ्यावे लागणार आहेत. आता अपुऱ्या पावसाने तीच वेळ आणली आहे. मान्सून तर न बरसताच माघारी निघाला असल्याने, आता संकटाकडे पाहत राहण्यापेक्षा संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांना सुरुवात करावीच लागणार आहे.

राज्याच्या दुष्काळप्रवण भागांतील पुढच्या पिढ्यांना दुष्काळ पाहावा लागू नये याकरिता महाराष्ट्रात फडणवीस सरकारने उचललेली काही ठोस पावले यादृष्टीने दिलासादायक म्हणावी लागतील. कृष्णा खोऱ्यातील पाणी फ्लड मिटिगेशनच्या माध्यमातून भीमा खोऱ्यातून मराठवाड्यात आणण्याच्या राज्य सरकारच्या योजनेला जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. या योजनेच्या माध्यमातून सुमारे ३० टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध झाले की मराठवाड्याच्या दुष्काळाचे चटके कमी होऊ शकतात. याशिवाय उल्हास खोऱ्यातून गोदावरीच्या खोऱ्यात पाणी आणण्याची योजना कार्यान्वित झाली की मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होऊ शकतो असा सरकारचा विश्वास आहे. सरकारची इच्छाशक्ती, योग्य नियोजन आणि निधीचा पुरेसा पुरवठा या उपाययोजनांच्या त्रिसूत्री प्रामाणिकपणे एकत्र आणल्या तर परिस्थितीचे चटके सहन करण्याची शक्ती येऊ शकते, हे महाराष्ट्राच्या या योजनांतून दिसते. त्यामुळे, मान्सूनच्या माघारीपाठोपाठ समोर उभ्या राहणाऱ्या संभाव्य संकटांना आता केवळ एकतर्फी आक्रमणाची संधी मिळणार नाही. त्याला तोंड देण्यासाठी समोर उपाययोजनांचे सैन्य सज्ज असेल, तर सामाजिक आत्मविश्वासही वाढतो. दुष्काळ ही केवळ पाऊस कमी पडण्यामुळे निर्माण होणारी कथा नाही. गेल्या ५० वर्षांच्या अभ्यासानुसार, देशातील ७५ टक्क्यांहून अधिक जिल्हे आणि साठ कोटींहून अधिक लोकसंख्या हवामानविषयक घडामोडींच्या सावटाखाली वावरत आहे. अनेक भागांतील पारंपरिक दुष्काळग्रस्त भागांत महापूर, अतिवृष्टीची संकटे दिसू लागली आहेत, तर पूरप्रवण क्षेत्रे दुष्काळग्रस्त होताना दिसू लागली आहेत. यासाठी केवळ निसर्ग जबाबदार नाही. या बदलांची जबाबदारी माणसांसही घ्यावी लागेल. म्हणून, आपत्ती येण्याआधीच त्यावर मात करण्याची तयारी हाच उपाय ठरतो. त्यासाठी नियोजन करावे लागेल. परतीच्या पावसाने जाता जाता हा इशारा दिला आहे. ■

## अर्थविशेष

ॲड. हितेश पारसे

# कर नियोजन वर्षाच्या सुरुवातीपासूनच

भारतीय करव्यवस्थेत १ एप्रिल २०२६ पासून एक महत्त्वपूर्ण बदल झाला आहे. गेल्या अनेक दशकांपासून लागू असलेला आयकर अधिनियम, १९६१ याची जागा आयकर अधिनियम, २०२५ याने घेतली आहे. नवीन कायद्याचा मुख्य उद्देश करदात्यांसाठी करकायदा अधिक सुटसुटीत, स्पष्ट आणि समजण्यास सुलभ करणे हा आहे. मात्र सामान्य करदात्याच्या दृष्टीने खरा प्रश्न असा आहे की, "कायदा बदलला, पण माझ्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये मी नेमके काय बदल करायला हवेत?"

हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण नवीन कायदा म्हणजे केवळ जुन्या कलमांच्या क्रमांकांमध्ये झालेला बदल नाही. करदात्याने आपल्या उत्पन्नाचे, गुंतवणुकीचे, मालमत्तेचे, आर्थिक व्यवहारांचे आणि कर भरण्याचे नियोजन अधिक शिस्तबद्ध पद्धतीने करण्याची ही योग्य वेळ आहे.

**कर वर्षाची नवी संकल्पना :** जुन्या आयकर कायद्यात 'मागील वर्ष' आणि 'आकलन वर्ष' या दोन वेगवेगळ्या संकल्पनांमुळे सामान्य करदात्यांना अनेकदा संभ्रम निर्माण होत असे. नवीन आयकर कायद्यात 'कर वर्ष' ही तुलनेने सोपी संकल्पना स्वीकारण्यात आली आहे. १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत मिळणारे उत्पन्न हे कर वर्ष २०२६-२७ शी संबंधित असेल. मात्र येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील उत्पन्नासाठी २०२६ मध्ये दाखल होणारे विवरणपत्र जुन्या आयकर कायद्यानुसार असेल; तर १ एप्रिल २०२६ नंतर सुरू होणाऱ्या कालावधीसाठी नवीन आयकर कायदा लागू होईल. त्यामुळे संक्रमणाच्या काळात करदात्याने जुना आणि नवीन कायदा यामधील फरक समजून घेणे आवश्यक आहे.

**१. कर नियोजनाची पद्धत बदला :** भारतात अनेक करदाते आर्थिक वर्ष संपण्याच्या काही दिवस आधी करबचतीच्या गुंतवणुकीचा विचार करतात. मार्च महिना आला की विमा, गुंतवणूक, कर्जाची परतफेड किंवा इतर करबचतीचे पर्याय शोधले जातात. ही पद्धत आता बदलण्याची गरज आहे. कर नियोजन म्हणजे केवळ कर वाचविणे नव्हे. कर नियोजनामध्ये – उत्पन्नाचे नियोजन, गुंतवणुकीचे नियोजन, मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन, भांडवली नफ्याचे नियोजन, व्यवसायातील खर्चाचे नियोजन, आगाऊ कराचे नियोजन, कुटुंबातील मालमत्ता हस्तांतरणाचे नियोजन, कर्ज व व्याजाचे नियोजन, या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. व्यवहार झाल्यानंतर कराचा विचार करण्यापेक्षा व्यवहार करण्यापूर्वी कराचा परिणाम समजून घेणे अधिक योग्य आहे. विशेषतः मालमत्ता विक्री, मोठी गुंतवणूक, व्यवसायातील पुनर्रचना, भागीदारीतील बदल किंवा कुटुंबातील मालमत्ता हस्तांतरण अशा व्यवहारांपूर्वी करसल्ला फायदेशीर ठरू शकते.

**२. वार्षिक माहिती विवरणाकडे दुर्लक्ष करू नका :** आज आयकर विभागाकडे करदात्याच्या आर्थिक व्यवहारांची मोठ्या प्रमाणावर माहिती उपलब्ध होते. बँक व्यवहार, व्याज, लाभांश, समभागांची खरेदी-विक्री, सामूहिक गुंतवणूक योजना, मालमत्ता व्यवहार, करकपात, करसंकलन आणि इतर अनेक आर्थिक व्यवहारांची माहिती विविध माध्यमांतून आयकर विभागापर्यंत पोहोचते. त्यामुळे करदात्याने आपले वार्षिक माहिती विवरण (एआयएस) आणि करदात्याची माहिती सारांश (टीआयएस) नियमितपणे तपासणे आवश्यक आहे. केवळ विवरणपत्र भरताना एकदा माहिती तपासण्याची पद्धत बदलून वर्षभरातील आर्थिक व्यवहारांची वेळोवेळी पडताळणी करणे अधिक योग्य ठरेल.

**उदाहरणार्थ** – बँकेने व्याज जमा केले आहे, पण करदात्याने ते उत्पन्नात दाखविले नाही; - समभाग किंवा सामूहिक गुंतवणूक योजना विकली आहे, पण त्यातून झालेल्या नफ्याचा विचार केला नाही; - मालमत्तेचा व्यवहार झाला आहे, पण त्याचा करपरिणाम तपासला नाही; - करकपात झाली आहे, पण संबंधित उत्पन्नाचा योग्य ताळमेळ घातला नाही. - अशा विसंगती भविष्यात आयकर विभागाकडून विचारणा होण्याचे कारण बनू शकतात.

**३. "माझा कर शून्य आहे" म्हणजे "माझी जबाबदारी शून्य आहे" असे नाही :** अनेक करदात्यांमध्ये असा गैरसमज असतो की, कर देय नसल्यास विवरणपत्र किंवा इतर अनुपालनाकडे लक्ष देण्याची गरज नाही. प्रत्यक्षात कर देयता आणि कर अनुपालन या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. कर भरावा लागत नसला तरी परिस्थितीनुसार उत्पन्नाची योग्य माहिती देणे, आवश्यक असल्यास विवरणपत्र दाखल करणे, करकपातीची माहिती तपासणे, मोठ्या आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे जतन करणे आणि आयकर विभागाकडून आलेल्या सूचनांना वेळेत उत्तर देणे महत्त्वाचे असते. म्हणून "कर नाही" याचा अर्थ "करविषयक जबाबदारी नाही" असा होत नाही.

**४. प्रत्येक करदात्याने स्वतःची वार्षिक करफाईल तयार करावी :** आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून प्रत्येक करदात्याने स्वतःची एक स्वतंत्र वार्षिक करफाईल ठेवणे अत्यंत उपयुक्त ठरेल. या फाईलमध्ये खालील कागदपत्रे जतन करता येतील - आयकर विवरणपत्राची प्रत, उत्पन्नाची गणना, वार्षिक माहिती विवरण, करदात्याची माहिती सारांश, करकपात प्रमाणपत्रे, बँक खात्यांचे विवरण, व्याज प्रमाणपत्रे, गुंतवणुकीची कागदपत्रे, समभाग आणि सामूहिक गुंतवणूक योजनांची विवरणपत्रे, मालमत्ता खरेदी-विक्रीची कागदपत्रे, गृहकर्जाची कागदपत्रे, भांडवली नफ्याची गणना, परदेशात पाठविलेल्या पैशांशी संबंधित कागदपत्रे, आगाऊ कर भरल्याच्या पावत्या, आयकर विभागाकडून प्राप्त झालेली पत्रे व सूचना आज ही कागदपत्रे डिजिटल स्वरूपात सुरक्षित ठेवणे अधिक सोपे झाले आहे. याचा सर्वांत मोठा फायदा असा की, पुढील वर्षी विवरणपत्र तयार करताना सर्व माहिती सहज उपलब्ध होते आणि भविष्यात आयकर विभागाकडून विचारणा झाल्यास योग्य कागदपत्रांसह उत्तर देता येते.

**५. मालमत्ता व्यवहारांमध्ये करनियोजनाला सर्वाधिक महत्त्व :** घर, सदनिका, जमीन, व्यावसायिक मालमत्ता किंवा पुनर्विकासातील हक्कांची खरेदी-विक्री करताना केवळ व्यवहाराची किंमत पाहणे पुरेसे नाही. मालमत्ता विकण्यापूर्वी खालील प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे - मालमत्ता कधी खरेदी केली? खरेदीची किंमत किती होती? विक्रीची किंमत किती आहे? भांडवली नफा किती होईल? मालमत्तेचे मुद्रांक मूल्य किती आहे? मालमत्ता विक्रीवर करकपात लागू आहे का? मालमत्ता वारशाने मिळाली असल्यास पूर्वीची किंमत कशी निश्चित होईल? मालमत्तेवर केलेल्या सुधारणा किंवा इतर खर्चाचा कराच्या दृष्टीने विचार करता येईल का? मालमत्ता व्यवहारात अनेकदा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर कराचा विचार केला जातो. मात्र योग्य पद्धत अशी असावी - प्रथम करनियोजन, नंतर व्यवहार, त्यानंतर योग्य कागदपत्रे. ही पद्धत स्वीकारल्यास अनावश्यक करभार किंवा भविष्यातील वाद टाळण्यास मदत होऊ शकते.

**६. करकपातीच्या नियमांकडे व्यवसायांनी विशेष लक्ष द्यावे :** व्यावसायिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था आणि इतर व्यवसायांमध्ये करकपात हा नियमित अनुपालनाचा भाग आहे. नवीन आयकर कायदा लागू झाल्यामुळे लेखा प्रणाली, वेतन प्रणाली, देयक प्रणाली आणि करकपातीशी संबंधित नोंदी यांचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. **(पूर्वार्ध)** ■

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# बंडखोर हुथींची गोष्ट!

लाल समुद्रात सध्या हुथी बंडखोरांचा हैदोस आहे. बाब अल-मंदाब सामुद्रधुनीतून जाणाऱ्या सौदीच्या तेलजहाजांवर हल्ला करणारे, सौदीचे कथित मित्रराष्ट्र पाकिस्तान आणि तुर्कीएसाठी डोकेदुखी ठरलेले हे हुथी बंडखोर कोण आहेत? मध्यपूर्वेच्या गुंतागुंतीच्या राजकारणात हुथींसारखा बंडखोर गट महत्त्वाचा का आहे? येमेन, हुथी चळवळ, झैदी समुदाय आणि एकूणच टोळ्यांच्या प्रभावातून बाहेर पडू न शकलेल्या इस्लामिक देशांमधील या संघर्षाचा वेध घेऊ.

आज एकमेकांच्या जीवावर उठलेल्या या दोन पक्षांचे एकेकाळी गळ्यात गळे होते. येमेनचा भौगोलिक प्रदेश आणि जमाती, प्रादेशिक व वांशिक युतींच्या गुंतागुंतीमुळे बाह्य आक्रमकाला तिथे पाय रोवणे अशक्य होते आणि आजही आहे. येमेनमधील अल्पसंख्यक झैदी समुदाय शतकानुशतके त्या देशात प्रमुख शक्ती राहिला आहे. इस्लामच्या शिया पंथात, झैदींना सर्वात वेगळे आणि उदारमतवादी मानले जाते. झैदी हे पाचवे इमाम, इमाम झैद इब्न अली यांचे अनुसरण करतात. धार्मिक श्रद्धा आणि प्रथांच्या बाबतीत, झैदींना सुन्नी इस्लामच्या हनफी आणि शफी पंथांच्या जवळचे मानले जाते. ओटोमन साम्राज्याचा भाग असलेल्या येमेनला पहिल्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य मिळाले आणि त्याचे पहिले शासक झैदी समुदायाचे प्रमुख इमाम याह्या होते. इमाम याह्या यांनी उत्तर येमेनच्या सुन्नीबहुल आदिवासी भागांवर आपल्या राज्याचा विस्तार केला पण, येमेनला जगापासून अलिप्त ठेवले. दरम्यान, सौदी अरेबियाचे संस्थापक इब्न सौद सत्ता विस्तार करत होते. आधुनिक सौदी अरेबियाच्या स्थापनेनंतर अवघ्या दोन वर्षांनी, १९३४ मध्ये सौदी अरेबिया आणि येमेन यांच्यात लहानसं युद्ध झाल्याची नोंद आहे. या युद्धात सौदी अरेबियाने असिर आणि नजरान हे प्रदेश ताब्यात घेतले. झैदी आणि इमाम याह्या हे प्रदेश ऐतिहासिक येमेनचा भाग मानत होते. या लहानशा वाटणाऱ्या युद्धातून, वादाची विषपल्लवी रुजली. काळ बदलला पण परस्परांविषयीचा तिरस्कार कायम आणि जमिनीच्या मालकी हक्काचा प्रश्न अनिर्णीतच राहिला. याह्या यांच्या मृत्यूनंतर, इमाम अहमद यांनी सोव्हिएत युनियन आणि चीनसोबत राजनैतिक संबंध स्थापले. ६० च्या दशकात अरब जगतात सत्तापालट आणि क्रांतीच्या लाटा उसळल्या. इजिप्तचे लष्करी हुकूमशहा गमाल अब्देल नासेर यांनी रेडिओ व्हॉईस ऑफ द अरबसच्या माध्यमातून संपूर्ण अरब जगात राजेशाहीविरोधात आंदोलन पेटवले. १९६२ मध्ये, येमेनचे इमाम अहमद यांचे निधन होऊन त्यांचा मुलगा इमाम बद्र गादीवर बसला. पण, आठवड्याभरात इजिप्शियन नासेरच्या प्रभावाखाली असलेल्या येमेनी लष्कराने उठाव करून येमेनला प्रजासत्ताक घोषित केले. यानंतर येमेनमध्ये शह-काटशहाचा पट मांडला गेला. झैदी इमाम आणि त्यांचे समर्थक पळून गेले. या झैदी शिया इमामांना कोणी मदत केली? सौदी अरेबियाच्या सुन्नी राजघराण्याने, जे स्वतःला वहाबी इस्लामचा बालेकिल्ला मानत होते, झैदी इमामांच्या संरक्षणासाठी आपला खजिना उघडला. सौदीने येमेनला गृहयुद्धाचे रणांगण बनवले. येमेनी लढवय्यांनी इजिप्शियन सैनिकांना, दुर्गम पर्वतरांगांमध्ये अगदी पिसाळलं. हे युद्ध नासेरसाठी 'इजिप्तचे व्हिएतनाम' ठरले. यावेळी सौदीने झैदींना भरपूर निधी, शस्त्रे आणि परदेशी भाडोत्री सैनिक पुरवले. इजिप्तला नामोहरम करताना त्यांनी एका दहशतवादी संघटनेला जन्म दिला. ७० च्या दशकात आजच्या हुथींचे पूर्वज आणि सौदी अरेबिया इजिप्तच्या सैन्याविरुद्ध एकाच झेंड्याखाली लढत होते. दरम्यान, उत्तर येमेनच्या सादा प्रदेशात, हुसेन बदरेद्दीन अल-हुथी यांच्या नेतृत्वाखाली झैदींनी एका धार्मिक आणि राजकीय चळवळीला आकार दिला. नेत्याच्या नावाने या गटाला हुथी म्हटले गेले. हुथींनी आरोप केला की, येमेनी सरकार सौदी अरेबियाच्या पाठिंब्याने येमेनमध्ये कट्टर वहाबी आणि सलाफी विचारसरणीचा प्रसार करून झैदी अस्मितेला धोका निर्माण करत आहे. २००९ दरम्यान, राष्ट्राध्यक्ष सालेह यांचे सरकार आणि उत्तर सीमेवरील हुथी बंडखोरांमध्ये सहा युद्धे झालीत. या सर्व युद्धांमध्ये सौदी अरेबियाने सालेह सरकारला पाठिंबा दिला. २००९ मधील सहाव्या युद्धात सौदी अरेबियाचे सैन्य थेट लढाईत उतरले. सौदी सैन्याने हुथींच्या ठिकाणांवर हल्ला केला, परंतु येमेनच्या खडकाळ पर्वतांमध्ये हुथींच्या गनिमी युद्धासमोर त्यांना मोठे नुकसान झाले. इराक, सीरिया, लिबिया आणि अलिकडील इराण युद्धाने हे सिद्ध केले आहे की, केवळ हवाई हल्ल्यांनी कधीही निर्णायक विजय मिळवता येत नाही. जेव्हा एखाद्या देशाने येमेनवर दबाव आणण्याचा किंवा हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेथील लोक आपले मतभेद विसरून बाह्य शत्रूविरुद्ध एकजूट दाखवतात. राजकारणात कोणीही कायमचे मित्र किंवा शत्रू नसतात हा मूलमंत्र देणारी सौदी अरेबिया आणि हुथींची ही कहाणी! ■

९२२३७००२७७

## डिजिटल जनजागृती

सीए अभय सगदेव

# वैयक्तिक माहिती चोरीला गेली तर?

एका संध्याकाळी एका छोट्या दवाखान्याला कळते की, त्याच्या अपाईंटमेंट कॉम्प्युटरमध्ये मॅलवेअर शिरले आहे. रुग्णांची नावे, मोबाईल क्रमांक आणि प्रिस्क्रिप्शन रेकॉर्ड्स उघड होण्याची शक्यता आहे. दुसऱ्या ठिकाणी, शाळेतील एक कर्मचारी विद्यार्थ्यांची माहिती असलेली स्प्रेडशीट चुकीच्या ई-मेलवर पाठवतो. आणखी एका ठिकाणी, ऑनलाईन शॉपिंग वेबसाईटवरील ग्राहकांच्या खात्यांमध्ये अनधिकृत प्रवेश होतो. या घटना वेगवेगळ्या वाटतात; पण त्या एकच प्रश्न निर्माण करतात : वैयक्तिक माहिती धोक्यात आली तर काय होते?

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ अर्थात डीपीडीपी ॲक्टमध्ये पर्सनल डेटा ब्रीच ही संज्ञा वापरली आहे. पर्सनल डेटा ब्रीच म्हणजे वैयक्तिक माहितीची अनधिकृत प्रक्रिया किंवा वैयक्तिक माहितीचे अपघाती उघड होणे, संपादन, शेअर करणे, वापर, बदल, नाश किंवा माहितीपर्यंतचा प्रवेश गमावणे, ज्यामुळे तिची कॉन्फिडेन्शिअलिटी, इंटेग्रिटी किंवा ॲव्हॅबिलिटी धोक्यात येते. ही व्याख्या व्यापक आहे. ब्रीच म्हणजे केवळ हॅकिंग नव्हे; त्यामध्ये अपघाती डिस्क्लोजर, अनधिकृत शेअरिंग, माहितीचा नाश किंवा माहितीपर्यंतचा प्रवेश गमावणे यांचाही समावेश होऊ शकतो. हे अधिक चांगले समजण्यासाठी तीन शब्द लक्षात ठेवूया. कॉन्फिडेन्शिअलिटी म्हणजे वैयक्तिक माहिती अनधिकृत व्यक्तींनी पाहू किंवा वापरू नये. इंटेग्रिटी म्हणजे माहिती चुकीच्या पद्धतीने बदलली किंवा खराब झाली नसावी. ॲव्हॅबिलिटी म्हणजे अधिकृत व्यक्तींना गरज असताना माहिती उपलब्ध असावी. पर्सनल डेटा ब्रीच या तीनपैकी एक किंवा अधिक बाबींवर परिणाम करू शकतो.

उदाहरणार्थ, रुग्णालयातील रुग्णांची यादी बाहेर गेली, तर कॉन्फिडेन्शिअलिटी प्रभावित होते. विद्यार्थ्यांचे गुण अनधिकृत प्रवेशामुळे चुकीचे बदलले गेले, तर इंटेग्रिटी प्रभावित होते. रॅन्समवेअर अटॅकमुळे डायग्नोस्टिक सेंटरला स्वतःचे पेशंट रिपोर्ट उघडता येत नसतील, तर ॲव्हॅबिलिटी प्रभावित होते. या प्रत्येक परिस्थितीत डेटा प्रिंसिपल म्हणजे ज्या व्यक्तीशी वैयक्तिक माहिती संबंधित आहे ती व्यक्ती, हिला हानी होऊ शकते.



डीपीडीपी ॲक्ट डेटा फिड्युशिअरीवर वैयक्तिक माहितीचे संरक्षण करण्याची जबाबदारी टाकतो. डेटा फिड्युशिअरी म्हणजे वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशा प्रकारे प्रक्रिया करायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था. साध्या भाषेत, एखादी संस्था 'डेटा प्रोटेक्शन हे आमच्या कॉम्प्युटर व्हेंडरचे काम आहे' असे म्हणून जबाबदारी टाळू शकत नाही. जर ती वैयक्तिक माहिती गोळा करते किंवा नियंत्रित करते, तर तिने त्या माहितीचे संरक्षण करण्यासाठी वाजवी सुरक्षा उपाय केले पाहिजेत.

डीपीडीपी रुल्स, २०२५ मध्ये अशा सुरक्षा उपायांची उदाहरणे दिली आहेत. यामध्ये इन्क्रिप्शन किंवा मास्किंगसारखे योग्य संरक्षण, ॲक्सेस कंट्रोल, लॉग्स आणि मॉनिटरिंगद्वारे ॲक्सेसची व्हिजिबिलिटी, डेटा बॅकअप्स, कन्टिन्युइटी मेजर्स, डेटा प्रोसेसर्स सहभागी असतील तर करारातील सुरक्षा उपाय आणि योग्य तांत्रिक व संस्थात्मक उपाय यांचा समावेश होतो. संस्थेचा आकार आणि स्वरूप यानुसार नेमके उपाय बदलू शकतात; परंतु काहीच न करणे जबाबदार वर्तन ठरू शकत नाही. पर्सनल डेटा ब्रीच झाल्यास डेटा फिड्युशिअरीवर संवाद साधण्याच्या जबाबदाऱ्या येतात. त्याने प्रभावित प्रत्येक डेटा प्रिंसिपलला विनाविलंब, स्पष्ट आणि सोप्या भाषेत माहिती दिली पाहिजे. या संप्रेषणात ब्रीचचे स्वरूप, संभाव्य परिणाम, धोका कमी करण्यासाठी घेतली जाणारी पावले, प्रभावित व्यक्तीने स्वतःसाठी घ्यावयाची सेफ्टी स्टेप्स आणि प्रश्नांना उत्तर देऊ शकणाऱ्या व्यक्तीचा संपर्क तपशील दिला पाहिजे.

डेटा फिड्युशिअरीने डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियालाही सूचना दिली पाहिजे. रुल्सनुसार बोर्डला उपलब्ध माहितीच्या आधारे विनाविलंब प्रारंभिक सूचना द्यावी लागते आणि नंतर निश्चित वेळेमध्ये अधिक सविस्तर सूचना द्यावी लागते. यामुळे ब्रीचेच शांतपणे दडपल्या जात नाहीत आणि गंभीर डेटा प्रोटेक्शन फेल्युअर्सबाबत नियामक पातळीवरही माहिती उपलब्ध राहते. एखाद्या नागरिकाने ब्रीच नोटीस मिळाल्यानंतर काय करावे? प्रथम ती नोटीस काळजीपूर्वक वाचा. पासवर्ड उघड झाले असण्याची शक्यता असेल, तर ते तत्काळ बदला. बँकिंग किंवा पेमेंट डेटा संबंधित असेल, तर व्यवहारांवर लक्ष ठेवा. ओळखपत्र प्रभावित असतील, तर गैरवापराबाबत सावध राहा. ब्रीच रिलेटेड सपोर्टच्या नावाखाली आलेल्या संशयास्पद मेसेजेसमधील लिंक्सवर क्लिक करणे टाळा. खरी ब्रीच नोटीस तुम्हाला व्यावहारिक सुरक्षा पावले स्पष्ट करून देणारी असावी.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी**


तुम्हाला असा मेसेज येतो की, तुमच्या अकाऊंट डिटेल्स डेटा ब्रीचमध्ये उघड झाल्या असण्याची शक्यता आहे. घाबरू नका; पण दुर्लक्षही करू नका. पासवर्ड बदला, उपलब्ध असल्यास टू फॅक्टर ऑथेंटिकेशन सुरू करा, अकाऊंटवर लक्ष ठेवा आणि संशयास्पद लिंक्सऐवजी संस्थेच्या ऑफिशिअल वेबसाईट किंवा फोन नंबरद्वारे संपर्क करा.

**तुम्हाला माहिती आहे का?**

पर्सनल डेटा ब्रीचमध्ये डेलिबरेट हॅकिंगबरोबरच ॲक्सिडेंटल डिस्क्लोजरचाही समावेश होऊ शकतो. वैयक्तिक माहिती असलेली फाईल चुकीच्या व्यक्तीला पाठवली गेली आणि त्यामुळे कॉन्फिडेन्शिअलिटी धोक्यात आली, तर तेही ब्रीच ठरू शकते. ■

sagdeo1@gmail.com

### भव्य मूर्तीपेक्षा सुरक्षित गणेशोत्सव महत्त्वाचा



अलिकडेच दोन ठिकाणी गणेशमूर्ती पडून त्यातून हानी झाल्याच्या घटना समोर आल्या. अशा घटना केवळ अपघात म्हणून विसरून जाण्यापेक्षा त्यातून आपण काही शिकण्याची गरज आहे. मूर्ती जितकी भव्य आणि उंच, तितकी तिची उभारणी, वाहतूक, प्रतिष्ठापना आणि सुरक्षितता यांची जबाबदारीही अधिक वाढते.

गणरायाला उंच आसनावर बसवणे ही श्रद्धा असू शकते; मात्र त्या उंचीमुळे जर सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असेल, तर आपण विचार करायला हवा. ईश्वराला नेमके काय हवे आहे, याचा विचार केवळ मनात करून उपयोग नाही; तो विचार आपल्या कृतीत उतरला पाहिजे. श्री गणेशाला बुद्धी आणि विवेकाची देवता मानले जाते. त्यामुळे गणेशोत्सवात विवेकाचा वापर करणे, सुरक्षिततेला प्राधान्य देणे आणि अनाठायी उंचीच्या स्पर्धेतून बाहेर पडणे, हीच गणरायाच्या शिकवणीला साजेशी कृती ठरेल.

'मूर्ती उंच असावी' यापेक्षा 'उत्सव सुरक्षित असावा',
'देखावा भव्य असावा' यापेक्षा 'विचार भव्य असावेत'
आणि 'स्पर्धा मोठी असावी' यापेक्षा 'भक्ती आणि संस्कार मोठे असावेत',

हा विचार आपण स्वीकारण्याची वेळ आली आहे.

गणेशोत्सव हा आनंदाचा, श्रद्धेचा आणि मांगल्याचा उत्सव आहे. त्यामुळे कोणत्याही भक्ताला, कार्यकर्त्याला किंवा नागरिकाला हानी पोहोचेल अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, याची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### ज्येष्ठा गौरी पूजन, स्त्रियांचे स्वातंत्र्य आणि माहेरपण

महाराष्ट्रात भाद्रपद महिन्यात गणेशोत्सवादरम्यान महालक्ष्मी म्हणजेच ज्येष्ठा आणि कनिष्ठा या दोन गौरींचे आगमन होते. या सणाचे महाराष्ट्रीयन संस्कृतीत खूप मोठे स्थान आहे. अध्यात्मात महालक्ष्मी हे आदिशक्तीचे (प्रकृतीचे) रूप मानले जाते. 'ज्येष्ठा' ही समृद्धी, स्थैर्य आणि ज्ञानाचे प्रतिनिधित्व करते, तर 'कनिष्ठा' ही क्रियाशक्ती व उत्पत्तीचे प्रतीक आहे. या दोन्ही शक्ती एकत्र आल्याशिवाय घरात किंवा आयुष्यात परिपूर्णता येत नाही. हा सण प्रामुख्याने स्त्रियांचा सण म्हणून उत्साहाने साजरा केला जातो.

पौराणिक समजुतीनुसार, 'ज्येष्ठा' हिला काही ठिकाणी अलक्ष्मी (दारिद्र्य) मानले गेले आहे, परंतु पूजनाच्या दिवशी तिचे आदरपूर्वक स्वागत करून, तिचे समाधान करून तिला शांत केले जाते. महालक्ष्मीने असुरांचा संहार करून जगाला आणि स्त्रियांना सुखी केले. त्यामुळे या दोन गौरींचे रक्षणकर्त्या आणि सुख-समृद्धी देणाऱ्या देवी म्हणून पूजन केले जाते. हा उत्सव मुख्यत्वे तीन दिवसांचा असतो;

**पहिला दिवस (अनुराधा नक्षत्र) आगमन :** घराच्या उंबरठ्यावरून गौरींच्या पावलांचे ठसे काढून, हळद-कुंकवाने स्वागत करून गौरींचे घरात आगमन केले जाते.

**दुसरा दिवस (ज्येष्ठा नक्षत्र) पूजन व महानैवेद्य :** या दिवशी गौरींची षोडशोपचार पूजा केली जाते. पुरणपोळी, १६ प्रकारच्या भाज्या, मेतकूट, लाडू यांचा महानैवेद्य दाखवला जातो. सायंकाळी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम व जागरण (गाणी, खेळ) होते.

**तिसरा दिवस (मूळ नक्षत्र) विसर्जन :** तिसऱ्या दिवशी उत्तरपूजा करून, नैवेद्य दाखवून गौरींचे थाटामाटात विसर्जन केले जाते. शहरी भागात किंवा काही विशिष्ट घराण्यांमध्ये पितळ, मडके (सुगड), माती किंवा धातूचे मुखवटे वापरून उभ्या गौरी (मानवी रूपात) सजवल्या जातात. तसेच अनेक ठिकाणी नदीकाठचे किंवा शेतातले खडे आणून त्यांची गौरी म्हणून स्थापना केली जाते. तर काही ठिकाणी धान्याच्या ताटांवर गौरींची स्थापना होते. या सणामुळे कुटुंबात आणि समाजात मांगल्याचे, उत्साहाचे व परस्पर स्नेहाचे वातावरण निर्माण होते. पूर्वीच्या काळात स्त्रियांना स्वतःची मते मांडण्याचे किंवा एकत्र येण्याचे स्वातंत्र्य कमी असे. गौरी पूजन हे स्त्रियांसाठी 'माहेरपणाचा सण' समजला जातो. या तीन दिवसांत स्त्रिया एकत्र येतात, गाणी म्हणतात (उदा. गौरीची गाणी, झिम्मा, फुगड्या). जागरण करून रात्रीच्या वेळी आपले सुख-दुःख गाण्यांच्या माध्यमातून व्यक्त करतात. हा एकप्रकारे स्त्रियांच्या मानसिक ताणतणावावर उपाय म्हणून कार्य करतो. गौरी उत्सव हा केवळ एक धार्मिक विधी नसून निसर्गाविषयीची कृतज्ञता, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि कौटुंबिक एकोप्याचा एक महान सांस्कृतिक ठेवा आहे. ■

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### प्रा. डॉ. गणेश काकांडीकर यांना शैक्षणिक प्रशासनातील उत्कृष्ट कार्यासाठी पुरस्कार

**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य संचालक प्रा. डॉ. गणेश म. मा. काकांडीकर यांना शैक्षणिक प्रशासनातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'शैक्षणिक प्रशासक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अभियंता दिनानिमित्त नवी मुंबई येथे विशेष कार्यक्रमात द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, नवी मुंबई स्थानिक केंद्र आणि फादर सी. रॉड्रिग्ज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. डॉ. काकांडीकर हे अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रातील अनुभवी शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि शैक्षणिक प्रशासक असून त्यांना अभियांत्रिकी शिक्षण व प्रशासन क्षेत्रातील २७ वर्षांचा प्रदीर्घ व्यावसायिक अनुभव आहे.



### ओळख इस्लामची पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

शिक्षक व सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात सतत उल्लेखनीय कार्य करणारे सलीम पठाण श्रीरामपूर यांची लिखित व प्रकाशित पुस्तक : 'ओळख इस्लामीची'' या पुस्तकाचा प्रकाशन सार्वजनिक वाचनालयच्या सभागृह मध्ये करण्यात आले. सोलापूरच्या सार्वजनिक वाचनायात झालेल्या बहु -भाषिक काव्य संमेलनात कवी राजेंद्र भोसले, कालीदास चौडेकर, प्रा. नरेंद्र गुंडेली, प्रा वंदना कुलकर्णी, प्रा. सौ धर्माधिकारी, कवी दत्तात्र्य इंगळ, कवी काळे, ज्येष्ठ पत्रकार व कवी अय्यूब अहमद नल्लामंदू, कवी मुबारक शेख यांच्या प्रमुख उपस्थित हा प्रकाशन संपन्न झाला व यांचे कांही प्रती सार्वजनिक वाचनालयाला भेट म्हणून देण्यात आले.




### बाळे ब्रिजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत वृध्द जागीच ठार

**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ७८ वर्षीय वृद्ध व्यक्ती जागीच ठार झाल्याची घटना सोलापूर पुणे महामार्गावर बाळे ब्रिज जवळ आज गुरुवारी सकाळी घडली. वसंत रामा साखरे (वय ७८ वर्ष, रा. डांगे प्लॉट, बाळे, सोलापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. आज गुरुवारी सकाळी ते बाळे ब्रिजजवळून जात असताना त्यांना अज्ञात वाहनाने धडक दिली. यात गंभीर जखमी होऊन ते जागीच मयत झाले.याची माहिती मिळताच फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे हवालदार पीएम पवार हे घटनास्थळी पोहचले. त्यांनी वसंत साखरे यांना येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर मंडळ**
**विद्युत कामे**

वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यातर्फे प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्र.: SUR/TD/T/2026/12R कामाचे नाव :- सोलापूर विभागात ओएचई स्ट्रक्चर्सवर (ड्रॉप आर्म) ल्युमिनस रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह नंबर प्लेट्स बसवणे आणि जुन्या एमएस बाँड्सच्या जागी जीआय बाँड्स बदलणे. (पुनः-आवाहन) अंदाजे किंमत:- रु. 1,64,58,982/- बिड सुरक्षा:- रु. 3,29,200/- पूर्ण करण्याचा कालावधी:- 12 महिने ऑफरची वैधता:- 60 दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:- 12/10/2026 रोजी 15.00 वाजता.

ANJ-30 **वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (टीआरडी)**

**सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा**



### पोलिसात तक्रार का दिली म्हणून सळई व कोयत्याने मारहाण

**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

आमच्या विरोधात पोलिसात तक्रार का दिली म्हणून लोखंडी सळई व कोयत्याने मारहाण करून तिघांना जखमी केल्याची घटना मोहोळ तालुक्यातील अरबळी येथे पाच वाजता घडली. शहनाज आरिफ पटेल(वय ३४ वर्ष) आरिफ बंदुशा पटेल (वय ४३ वर्ष) आणि हयातबी बंदुशा पटेल (वय ७८ वर्ष, तिघे रा. अरबळी) अशी जखमींची नावे आहेत. वरील तिघेजण बुधवारी सायंकाळी घरात असताना शकील पाटील, काशीम पाटील व इतर दोन जण घरात आले आणि तुम्ही पोलिसात आमची तक्रार का दिली असे म्हणून त्यांना सळई व कोयत्याने मारहाण केली. यात जखमी झाल्याने या तिघांना कामती येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी ते स्वतः दाखल झाले.

# परतावा मिळवून देण्याच्या आमिषाने मुख्याध्यापक व शिक्षकांची सव्वा ३५ लाखांची फसवणूक

## 'पीआरओ'वर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

भरघोस परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांसह इतर काही नागरिकांची ३५ लाख २७ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना विजापूर रोडवरील नेहरू नगर येथील पद्मश्री रामसिंग भानावत हायस्कूल अॅन्ड ज्युनियर कॉलेज येथे ऑगस्ट २०२५ ते १४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत घडली.





दरम्यान याप्रकरणी शाळेचे मुख्याध्यापक आग्रेलो ऑस्टिन डीक्रुज (वय ५९, रा. पोस्टल कॉलनी, होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजापूर नाका पोलीस ठाण्यात शाळेचा पीआरओ राजू रामचंद्र बुटले याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४) तसेच एमपीआयडी कायदा कलम ३ आणि ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी सह संबंधित भानावत शाळेतील शिक्षक आणि इतर नागरिकांनी वरील आरोपीच्या सांगण्यावर विश्वास ठेवून शेअर मार्केटमधील गुंतवणुकीसाठी लाखो रुपये दिले. ही रक्कम ऑनलाईन व रोख स्वरूपात आरोपीकडे सुपूर्द करण्यात आली होती. काही कालावधीनंतर जेव्हा शिक्षक व फिर्यादी यांनी आरोपीकडे गुंतवलेले पैसे आणि त्यावर मिळणाऱ्या परताव्याबाबत विचारणा केली, तेव्हा आरोपीने त्यांना वेगवेगळी कारणे सांगून टाळण्याचा प्रयत्न केला. ''नागपूर येथे माझी वडिलोपार्जित जमीन असून, ती विकून तुमची सर्व रक्कम व्याजासह परत करतो,'' असा बनाव त्याने रचला. त्यानंतर आरोपी २७ जुलै २०२६ रोजी चार दिवसांच्या सुट्टीवर गेला आणि परत आलाच नाही. सुरुवातीला त्याने केवळ फोनवरून लवकरच पैसे परत करतो असे सांगितले, मात्र तो कोणासमोरही आला नाही आणि परतावा देखील दिला नाही. आपली आर्थिक फसवणूक झाल्याची खात्री पटल्यानंतर अखेर पोलिसांत धाव घेतल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल डेरे हे करत आहेत.

# विहिरीत बुडून गुराख्याचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

पाणी पिण्यासाठी विहिरीवर गेलेल्या एका ४७ वर्षीय गुराख्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी शिवारात बुधवारी दुपारी एक वाजता घडली.

शब्बीर हुसेन मुल्ला (वय ४७ वर्ष, सध्या रा. बोरामणी, मूळ रा. कडबगाव )असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे. ते बुधवारी दुपारी बोरामणी हद्दीत रोजच्याप्रमाणे गुरे चरविण्यासाठी रानात गेले होते. तहान लागल्याने ते दावल मलिक दर्गा कडे जाणाऱ्या रोडवरील सिकंदर यांच्या विहिरीवर पाणी पिण्यासाठी गेले होते. पाणी पिताना तोल जाऊन ते पाण्यात पडले आणि बुडाले. ही घटना पाहून शेतातील इतर लोकांनी ही खबर गावकऱ्यांना दिली.



सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे हवालदार एसटी जाधव यांनी सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात आज गुरुवारी सकाळी साडेसात वाजता दाखल केला.

**दुसऱ्या दिवशी मृतदेह आढळला**

गुराखी पाण्यात बुडाल्याचे समजल्यावर गावातील काही तरुणांनी पाण्यात उड्या मारून मुल्ला यांना शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र विहीर फारच अरुंद असल्यामुळे आणि पाणी भरपूर असल्यामुळे त्याचा शोध लागला नाही. त्यानंतर सोलापूरहुन क्रेन मागविण्यात आली. क्रेनलाही संबंधित व्यक्तीचा मृतदेह शोधता आला नाही. त्यानंतर रात्रभर पाण्याच्या दोन मोटारी लावून विहिरीतील पाण्याचा उपसा करण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पहाटेच्या सुमारास शब्बीर मुल्ला यांचा मृतदेह आढळून आला.

**HEALTH DEPARTMENT**
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**TENDER NOTICE - 2026-27**
**CIVIL SURGEON SOLAPUR**
**E Tender for Supply, Installation & Commissioning of Instruments, Medical Equipments, Furniture & CSSD at GH Solapur**

**Tender Reference No. CSS/Med.Store/Instruments, Equipments, Furniture &CSSD/E Tender-07/26-27**

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers, Authorized supplier to participate in the competitive bidding process to Supply, Installation & Commissioning Of Instruments, Medical Equipments, Furniture & CSSD at GH Solapur. For the detailed tender documents, interested bidders should visit
**http://www.maharashtra.gov.in/tenders**
Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 08/10/2026 (04.00 PM)
Civil Surgeon, Solapur

Aryan Creation

**नगर परिषद कार्यालय, तुळजापूर**
**ता. तुळजापूर, जि. धाराशिव**

**जा. क्र. नपतु/पा.पु.वि./२०२६/१८८१ दि. १६/०९/२०२६**

**जाहीर ई-दरपत्रक मागणी (द्वितीय वेळ)**

याद्वारे सर्व व्यावसायिक, नोंदणीकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, तुळजापूर नगरपरिषद मार्फत पाणी पुरवठा विभागाकडील नळदुर्ग ते तुळजापूर १५ कि.मी. लोखंडी पाईपलाईन ज्याचा व्यास ३२३ मी. मी. आहे. ती पाईपलाईन आहे त्या परिस्थितीत ई-दरपत्रक पध्दतीने लिलाव करण्याचे ठरलेले आहे. त्याकरिता प्रथम बाजार भावानुसार भंगारची किंमत कळणे करिता ३२३ MM जाडीच्या MS पाईपलाईनचे प्रती किलो प्रमाणे ऑनलाईन पद्धतीने ई-कोटेशन मागविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपले दर ऑनलाईन पध्दतीने दि. १८/०९/२०२६ ते दि. ३०/०९/२०२६ रोजी साय ०६.०० वा पर्यंत सादर करावेत. तरी त्याचा तपशील https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहावयास मिळतील.

ई-मेल :- tuljapurmc@gmail.com

**सही/-** | **सही/-**
**मुख्याधिकारी** | **अध्यक्ष**
**नगर परिषद तुळजापूर** | **नगर परिषद तुळजापूर**

**खरेदीपूर्व जाहिर नोटीस**

सोलापूरातील तमाम लोकांना विशेषत: **मौजे बाळे, तालुका उत्तर सोलापूर, जि. सोलापूर** येथील लोकांना व वितीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवादीतील **मौजे बाळे** येथील **सर्व्हे नं. १/३/४/ब/२ पैकी प्लॉट नं. १, क्षेत्र १११ चौ.मी. (चौरस मीटर), नगर न.भू.क्र. १०१४/ब** असे आहे. सदर जागेवर तळमजल्यावरील ६७.९९ चौ.मी. व पहिल्या मजल्यावरील ६७.९९ चौ.मी. असे एकुण **१३५.९८ चौ.मी.** चे बांधकाम आर.सी.सी. पद्धतीने केलेले आहे.

सदर मिळकत **श्रीमती इंदुमती श्रीकांत पवार, रा. होटगी स्टेशन फताटेवाडी,** सोलापूर यांच्या मालकीची असून, सदर मिळकत **श्री. विश्वजीत विकास सांगोलकर, रा. ता. बार्शी, जि. सोलापूर** यांना विक्री करण्याचा व्यवहार करण्यात येत आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद जागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, टाच, जप्ती, मृत्युपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क असल्यास अथवा सदर जागेबाबत कोणाचेही, कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्रीशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुदील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली.
**तारीख: १७/०९/२०२६**

**ॲड. कृष्णा विजय बाबरे**
बी.एस्सी. एल.एल.बी. एल.एल.एम.
मो. नं. ९१६८०१३३३३
१२, जय मल्हार नगर, बाळे, सोलापूर
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**जाहीर प्रसिध्दीकरण**
सी.एम.ए. ३७/२०२६
नि. ७

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**गड्डेप्पा यलण्णा उर्फ यलप्पा शिवशरण - अर्जदार**
**विरुध्द**
**हुचप्पा यलप्पा शिवशरण वगैरे - सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदाराने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात मयत सातव्वा यलप्पा शिवशरण ही दि. ०७/०६/१९९१ यांचे पश्चात कायदेशीर वारसदार या नात्याने मयत सातव्वा यलप्पा शिवशरण यांच्या नावे मौजे शावळ येथील शेतजमीन गट नं. १६३ या मिळकतीवर वारस नोंद होऊन मिळणेकामी मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक १६/१०/२०२६ रोजी मे.कोर्टात स्वत: अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दि. १६/०९/२०२६

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** | (कोर्टाचा शिक्का) | **सही/-** **सह. अधीक्षक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**

District Collectorate, Solapur
Municipal Council Administration Dept. / DBCC
Phone: 0217-2620133| Email: dposolapur@gmail.com
*** NOTICE INVITING EXPRESSION OF INTEREST (EOI) ***

O.N./ Ref. No.: DBCC/SOLAPUR/CBG/2026/01

Expressions of Interest (EOI) are invited from eligible developers, tech providers, FPOs, cooperatives, and entrepreneurs to develop Compressed Bio-Gas (CBG) projects in Solapur District under the Maharashtra State CBG Policy, 2026. Eligible projects may receive VGF support (up to ₹75 Lakh/TPD, max ₹15 Crore), lease land, and SGST reimbursement. Submit EOI proposals by 12/10/2026 up to 5:00 PM. Detailed documents and terms are available at the District Collector's office and on official website.

Address: Member Secretary, District Compressed Bio-Gas Coordination Committee (DBCC) & District Collectorate, Sidheshwar Peth, Solapur, Maharashtra - 413001

**Sd/-**
**District Collector & District Magistrate, Solapur**
**Chairperson, District Compressed Bio-Gas Coordination Committee (DBCC)**

रजि. नं. एस.यु.आर./पी.आर.आर./आर.एस.आर./(आर) १०६८/ दि. १७/०१/१९९०

**यशवंतभाऊ पाटील ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, भोसे ता. पंढरपूर जि. सोलापूर**
**श्री. जयवंत महादेव गांवधरे**
चेअरमन

जा.क्र. ९२२/२०२६/२० दि. २९/०८/२०२६

**स्थावर मालमत्ता विक्रीची जाहीर निविदा (टेंडर) / लिलाव नोटीस**

यशवंतभाऊ पाटील ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. भोसे ता. पंढरपूर जि.सोलापूर या पतसंस्थेच्या भोसे ता. पंढरपूर येथील गट नं. ४५८ क्षेत्र ० हेक्टर ४६ आर, खुली जागा हि मालमत्ता असून सदर मालमत्तेचा संस्थेच्या वापरासाठी उपयोग होत नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे १४४-७ अ अन्वये पतसंस्थेच्या स्वतःच्या वापरासाठी आवश्यक नसेल, अशा संपादित केलेल्या स्थावर मालमत्तेची ७ वर्षाच्या आत विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरची ''जे आहे, जशी आहे, जिथे आहे'' त्या स्थितीत खुल्या पद्धतीने निविदा (टेंडर) मागवून विक्री करण्याचे ठरवले आहे.

**१. मालमत्तेचा तपशील :-**

| गावं | मालमत्तेचे वर्णन | वाजवी (राखीव किंमत) | शेरा |
|---|---|---|---|
| भोसे ता. पंढरपूर | गट नं. ४५८ क्षेत्र ० हे. ४६ आर, खुली जागा | रुपये १,०३,५०,०००/- | |

**२. टेंडर व लिलावाचे वेळापत्रक :-**
- टेंडर फॉर्म विक्री व स्विकारण्याची मुदत : दि. २९.०८.२०२६ ते दि. २०.०९.२०२६.
- टेंडर फॉर्म फी : रु. १००/- (न परतावा)
- बयाणा रक्कम : राखीव किंमतीच्या १% रक्कम RTGS/DD द्वारे जोडणे अनिवार्य.
- टेंडर उघडणे व जाहीर लिलाव : दि. २१.०९.२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, संस्थेच्या मुख्य कार्यालयात.

**३. मुख्य अटी व शर्ती :**
१) सर्वोच्च बोलीदाराला लिलाव मंजूर झाल्या क्षणी २५% रक्कम तात्काळ आणि उर्वरित ७५% रक्कम पुढील०७ दिवसांच्या आत संस्थेच्या बँक खात्यात जमा करावी लागेल. २) कोणतेही कारण न देता आलेले टेंडर मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार संस्थेच्या मा. संचालक मंडळाकडे सुरक्षित राहील. ३) सविस्तर अटी, शर्ती व टेंडर फॉर्म संस्थेच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध आहेत.

**स्थळ : भोसे, ता. पंढरपूर**
**दिनांक : २९.०८.२०२६**

**संचालक मंडळाच्या आदेशान्वये,**
**सचिव चेअरमन**
**यशवंतभाऊ पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. भोसे. ता.पंढरपूर**

**प्रकटपत्र**
**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम २१ (५) अन्वये दैनिक वृत्तपत्र व संकेतस्थळावर प्रसिद्धी करावयाची**
**सर्वसाधारण नोटीस**

याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, दिनांक २१ ते २७ मे, २०२६ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१, असाधारण, पुणे विभागीय पुरवणी मध्ये पृष्ठ क्र. ३ ते ५ तसेच स्थानिक वृत्तपत्र ''दै. पुण्यनगरी'' मध्ये दिनांक- १३/०५/२०२६ व ''दै. शिवनिर्णय'' मध्ये दिनांक १३/०५/२०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या स्वाक्षरीने जाहीर केलेल्या जा.क्र.२०२६/भूसंपादन/कार्या-१/एस.आर. ०४/२०१७/आरआर- १४४९ दिनांक- ०८/०५/२०२६ च्या कलम १९ ची अधिसुचने प्रमाणे मौजे बार्शी, ता. बार्शी येथील सोबत नमूद अनुसूची मध्ये दर्शविलेल्या जमिनीचे, निर्दिष्ट केलेले क्षेत्र व त्यावर बाधीत होणाऱ्या इतर बाबी इत्यादी भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या तरतुदीनुसार, बार्शी उपसा सिंचन योजना टप्पा क्र. २ उजवा कालवा कि.मी. सा.क्र. ७/०० ते १०/०० या सार्वजनिक प्रयोजनासाठी शासनाद्वारे ताब्यात घेण्याचे ठरले आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम २१(१) अन्वये भूमि वर सोयीस्कर ठिकाणी प्रसिद्धी करावयाची सर्वसाधारण नोटीस दिनांक ३०/०६/२०२६ रोजी तलाठी कार्यालय चे नोटीस बोर्डावर डकवून प्रसिद्धी देण्यात आलेली आहे. तदनंतर उक्त अधिनियमाच्या कलम २१(४) अन्वये व्यक्तिगत नोटीस बजावणी केले असून लेखी म्हणणे सादर करणेकामी दिनांक- २९/०७/२०२६, ३१/०७/२०२६, १२/०८/२०२६, १९/०८/२०२६ इत्यादी तारेखला सुनावणी घेऊन पुरेशी संधी देण्यात आलेली होती. तथापि, खाली नमूद अनुसूची मधील गटातील काही हितसंबंधीत व्यक्ती अद्यापपर्यंत सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत. अश्या वेळी उक्त अधिनियमाच्या कलम २१(५) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार सर्व हितसंबंधी व्यक्ती स्वतः अथवा प्रतिनिधी अथवा अभियात्ता मार्फत सुनावणी उपस्थित राहू शकले नाही अश्या व्यक्तींना त्यांचे माहिती असलेल्या शेवटचे पत्त्यावर किंवा दोन राष्ट्रीय दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच शासकीय संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी अशी तरतूद नमूद आहे.

सबब, उक्त अधिनियमाच्या कलम २१(५) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार याद्वारे खाली नमूद अनुसूची मध्ये नमूद मिळकतीतील सर्व हितसंबंधीत व्यक्तींना कळविण्यात येते की, सदर मिळकती मध्ये असणाऱ्या त्यांच्या हितसंबंधांचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी व हितसंबंधापोटी मागणी करावयाच्या नुकसान भरपाई रक्कम आणि त्याचे तपशील देण्यासाठी तसेच कलम २० अन्वये करण्यात आलेल्या चिन्हांकनास हरकत असल्यास त्या नमूद करण्यासाठी तहसिल कार्यालय बार्शी येथे तहसिलदार बार्शी यांचे दालनात दिनांक- २३/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष व्यक्तीशः किंवा योग्य त्या मुखत्यारामार्फत उपस्थित राहून आपल्या निवेदनाच्या लेखी सादर कराव्यात यावे. तद्नंतर कोणतेही लेखी हरकत विचारात घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**गावाचे नांव- बार्शी (ग्रामीण), तालुका- बार्शी, जिल्हा- सोलापूर**

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १००५ पै. | ०.०१.८३ |
| २ | १००६ पै. | ०.०८.९३ |
| ३ | १००७ पै. | ०.१२.७७ |
| ४ | १०१३ पै. | ०.१२.०६ |
| ५ | १०१६ पै. | ०.०८.८७ |
| ६ | १०१७ पै. | ०.०५.८७ |
| ७ | १०१८ पै. | ०.४१.७२ |
| ८ | १०५१ पै. | ०.०२.८० |
| ९ | १०५२ पै. | ०.२९.७० |
| १० | १०५३ पै. | ०.२४.९४ |
| ११ | १०५७ पै. | ०.०६.८८ |
| १२ | १०५८ पै. | ०.०३.३५ |
| १३ | १०६० पै. | ०.०५.२६ |
| १४ | १०६१ पै. | ०.७४.७५ |
| १५ | १०६२ पै. | ०.०७.०४ |
| १६ | ११९७ पै. | १.२६.५२ |
| १७ | १२०३ पै. | ०.७७.४५ |
| १८ | १२१० पै. | ०.१६.९७ |
| १९ | १२०६ पै. | ०.४९.३० |
| २० | १२४५ पै. | ०.२३.२५ |
| २१ | १२४६ पै. | ०.०९.४७ |
| २२ | १२९७/१ पै. | ०.२२.२० |

जा.क्र.२०२६/उविअक्र.१/एस.आर.०४/२०१७ सोलापूर / कावि-१३६५
उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १,
सोलापूर यांचे कार्यालय
पत्ता- जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सिद्धेश्वर पेठ, सोलापूर-४१३००१
दिनांक- ११/०९/२०२६

(शिक्का)

**सही/-**
**(सदाशिव पडदुणे)**
**उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/१३४/२०२६-२७

## महत्त्वाचे

### भंडारा तलवारबाजी संघाची सोनेरी कामगिरी

**भंडारा :** अमरावती येथे झालेल्या मुला-मुलींच्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत भंडारा जिल्ह्यातील 'खेला इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रा'च्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करीत ४ सुवर्ण आणि ९ कांस्य पदकांची कमाई करीत जिल्ह्याला सांघिक तृतीय पारितोषिक मिळाले. अमरावती येथे ११ ते १३ सप्टेंबरदरम्यान १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंनी विविध प्रकारांत प्रभावी कामगिरी करीत ४ सुवर्ण आणि ९ कांस्यपदक पटकावले. मुलांच्या संघात शौर्य बानते, श्रेयस कुरणजेकर, आरव नागदेवे, साकल्य कापगते, आयुध कोकाटे, जोरेश खान, आदर्श कडव आणि निरव किरपान यांनी सहभाग घेतला. मुलींच्या संघात प्राजक्ता गाढवे, वैभवी संगीतराव, प्राथवी हुमणे, ईशू गभणे, शाशवी जुरमुरे, प्रिशी शहारे, ऐश्वरी बोकाडे, आरोही इंगोले यांनी सहभाग नोंदविला. विजेत्या खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, जिल्हा क्रीडा अधिकारी लेकुळवाळे आणि 'खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रा'चे प्रशिक्षक सौरभ तोमर यांना दिले आहे.

### ज्युडो प्रशिक्षक समुपदेशन सत्रांत सहभागी होणार

**नवी दिल्ली :** भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) भोपाळ येथील प्रादेशिक केंद्राने, त्यांच्या राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रात कार्यरत असलेल्या दोन ज्युडो प्रशिक्षिकांना, त्यांच्या व्यावसायिक वर्तणूक व कार्यस्थळावरील शिस्तीशी संबंधित समस्यांवर तोडगा काढण्यासाठी क्रीडा मानसशास्त्रज्ञासोबत समुपदेशन सत्रांना उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. वरिष्ठ प्रशिक्षक रुची औदिच्य व सहायक प्रशिक्षक गीतांजली पवार यांना पुढील सूचना मिळेपर्यंत समुपदेशन सत्रांना उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे, असे साई एनसीओई भोपाळच्या सहायक संचालकांनी म्हटले आहे.

# अभिषेकची 30 चेंडूंत विक्रमी शतकी खेळी

**सर्वांत जलद टी-२० शतक ठोकण्याचा रोहित शर्माचा विक्रम मोडला**

**नवी दिल्ली, १७ सप्टेंबर**

अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात भारतीय फलंदाज अभिषेक शर्माने गुरुवारी माजी कर्णधार रोहित शर्माला मागे टाकत केवळ ३० चेंडूंत सर्वात जलद टी-२० आंतरराष्ट्रीय शतक ठोकले.

डावखुऱ्या सलामीवीराने आपल्या वादळी खेळीत १० षट्कार व ९ चौकार लगावत रोहितचा विक्रम मोडला; रोहितने डिसेंबर २०१७ मध्ये श्रीलंकेविरुद्ध ३५ चेंडूंत शतक केले होते.

३१७.६४ च्या जबरदस्त स्ट्राईक-रेटसह धावा करताना, अभिषेक अखेरीस ३४ चेंडूंत १०८ धावांवर बाद झाला; त्याच्या खेळीत एकूण ११ षट्कार व ९ चौकारांचा समावेश आहे. कोणत्याही फलंदाजाकडून कसोटी खेळणाऱ्या देशाविरुद्ध केलेले हे सर्वात जलद शतक ठरले आणि त्याने भारतीय डावाच्या नवव्या षटकात एक धाव घेऊन आपले शतक पूर्ण केले.

३० चेंडूंत शतक पूर्ण केल्यामुळे, अभिषेकची ही खेळी आता सर्वात जलद टी-२० आंतरराष्ट्रीय शतकांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आली आहे.

एस्टोनियाच्या साहिल चौहानने जून २०२४ मध्ये सायप्रस विरुद्ध केवळ २७ चेंडूंत सर्वात जलद शतक ठोकले होते, तर तुर्कीच्या मुहम्मद फहादने जुलै २०२५ मध्ये बल्गेरियाविरुद्ध केवळ २९ चेंडूंत शतक पूर्ण केले होते. ही खेळी अभिषेकच्या टी-२० क्रिकेटमधील तिसरे शतक ठरले; याआधी त्याने टी-२० क्रिकेटमध्ये १२ अर्धशतकेही झळकावली आहेत.



सुरुवात काहीशी संथ झाली होती, यात डावखुऱ्या फलंदाजाने पहिल्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर आपला पहिला चौकार मारला होता. त्यानंतर मात्र अभिषेकने आक्रमक पवित्रा घेतला.

दुसऱ्या षटकात अझमतुल्ला ओमरझाईविरुद्ध दोन षट्कार व एक चौकार मारून त्याने आपला सूर गवसला; त्यानंतर फजलहक फारुकीविरुद्ध त्याने आक्रमक फलंदाजी करत तिसऱ्या षटकातील पहिल्या चार चेंडूंवर दोन षट्कार व दोन चौकार लगावले.

पाचव्या षटकात केवळ १६ व्या चेंडूवर आपले अर्धशतक पूर्ण करणाऱ्या अभिषेकने २२ चेंडूंत ७६ धावांपर्यंत मजल मारली आणि पॉवरप्लेच्या समाप्तीपर्यंत भारताला १०० धावांचा टप्पा ओलांडून दिला.

१० व्या षटकातील दुसऱ्या-शेवटच्या चेंडूवर रशीद खानच्या गोलंदाजीवर चेंडू बॅटच्या कडेला लागून यष्टिरक्षकाकडे गेल्याने अभिषेकच्या आक्रमक खेळीचा अंत झाला.

२६ वर्षीय अभिषेकने २०२४ मधील आपल्या पदार्पणाच्या मालिकेत झिम्बाब्वेविरुद्ध पहिले टी-२० आंतरराष्ट्रीय शतक झळकावले होते; मात्र गुरुवारपूर्वी, त्याने खेळलेल्या चेंडूंच्या संख्येचा विचार करता सर्वात जलद शतक हे मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर इंग्लंडविरुद्ध केले होते.

इंग्लंडविरुद्ध ५४ चेंडूंत १३५ धावांची खेळी करताना अभिषेकने ३७ चेंडूंत शतक पूर्ण केले होते; गुरुवारपर्यंत ही कामगिरी भारतासाठी या सर्वात छोट्या प्रकारातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात जलद शतकी खेळी होती. आता भारतीय फलंदाजांच्या या यादीत हे तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात जलद शतक ठरले आहे. (वृत्तसंस्था)

### अफगाणिस्तानसमोर २२२ धावांचे लक्ष्य

अरुण जेटली स्टेडियमवर अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या व अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात अभिषेक शर्माचे विक्रमी शतक व संजू सॅमसनच्या अर्धशतकाच्या बळावर भारताने मर्यादित २० षटकांत ७ बाद २२१ धावा उभारल्या आणि अफगाणिस्तानसमोर विजयासाठी २२२ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. भारताने अफगाणिस्तानविरुद्धची ही तीन सामन्यांची टी-२० मालिका आधीच २-० ने खिशात घातली आहे. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीस पाचारण केले. सलामीवीर संजू सॅमसन व अभिषेक शर्माने ५९ चेंडूंत १४२ धावांची भागीदारी करून भारताला दमदार सुरुवात करून दिली. रशीद खानच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी अभिषेकने ३४ चेंडूंत ९ चौकार व ११ षट्कारांसह १०८ धावांची खेळी केली. सूर गवसलेल्या संजू सॅमसनने ३५ चेंडूत २ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ५० धावांची अर्धशतकी खेळी कली. कर्णधार श्रेयस अय्यर (२९), शिवम दुबे (१४), ईशान किशनने (१०) थोडे फार योगदान देत भारताला २० षटकांत ७ बाद २२१ धावा उभारण्यास मदत केली.




**आशियाई क्रीडा स्पर्धेची जय्यत तयारी** १९ सप्टेंबरपासून प्रारंभ होणाऱ्या २० व्या आयची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी जय्यत तयारी करण्यात आली असून जपानमधील नागोया रेल्वे स्थानकावर खेळाडूंच्या स्वागतासाठी फलक लावण्यात आले आहे

# 'कंटेनर'मधील निवास व्यवस्था आव्हान ठरणार नाही : शरथ

**आशियाई क्रीडा स्पर्धा**

**नवी दिल्ली, १७ सप्टेंबर**

आगामी १९ सप्टेंबरपासून आयची-नागोया येथे सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आयोजकांकडून 'कंटेनर रूम' आणि 'क्रूझ शिप' अशी अनोखी निवास व्यवस्था करण्यात आली आहे, परंतु ही व्यवस्था भारतीय खेळाडूंसाठी विशेष आव्हानात्मक ठरणार नाही, असे भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) खेळाडू आयोगाचे उपाध्यक्ष व या स्पर्धेसाठी भारताचे उपसंघनायक अचंथा शरथ कमल म्हणाले.

या आशिया क्रीडा स्पर्धेत इतर सुमारे १७ हजार सहभागींप्रमाणेच भारताचे ५०१ खेळाडू व २६५ सहाय्यक कर्मचारी कंटेनर-शैलीतील खोल्या, एक क्रूझ शिप आणि हॉटेल्समध्ये राहणार आहेत.

दक्षिण कोरियाच्या संघाने कंटेनर रूम्स खूप लहान असल्याची टीका केली आहे. आशियाई क्रिकेट परिषदेच्या काही सदस्यांनीही उपलब्ध निवास व्यवस्थेच्या गुणवत्तेबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

खेळाडूंप्रमाणे सहाय्यक कर्मचाऱ्यांना भारतीय क्रीडा प्राधिकरणाने (साई) उभारलेल्या तात्पुरत्या कंटेनरमध्ये वातावरणाशी जुळवून घेण्याची संधी मिळाली नव्हती. खेळाडूंना जपानसारखे वातावरण देण्यासाठी, भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या काही शिबिरात कंटेनर उभारण्यात आले होते आणि खेळाडूंना त्यात राहण्याची संधी मिळाली. त्यामुळे खेळाडूंना स्पर्धेदरम्यान कंटेनरमधील निवास व्यवस्था आव्हान ठरणार नाही, मात्र सहाय्यक कर्मचाऱ्यांबाबत चिंता वाटते, असे शरथ कमल म्हणाले.

आम्ही खेळाडूंसाठी सर्वोत्तम वातावरण तयार केले आहे आणि आशा आहे की ते जपानमधील निवास व्यवस्थेशी लवकर जुळवून घेतील. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते चांगली कामगिरी करू शकतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सुमारे ४,००० ते ५,००० खेळाडूंची राहण्याची सोय 'कोस्टा सेरेना' या आलिशान क्रूझ लाइनरवर केली जाईल. याशिवाय २,००० खेळाडू कंटेनरमध्ये राहतील. काही खेळाडूंची राहण्याची सोय व्यावसायिक हॉटेल्समध्येही केली जाईल. (वृत्तसंस्था)

### टेबल टेनिस स्पर्धेत भारत किमान एक पदक जिंकेल

आशियाई क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिस स्पर्धेत भारत किमान एक पदक जिंकेल अशी आशा टेबल टेनिसमधील दिग्गज खेळाडू शरथ यांनी व्यक्त केली. त्यांना मानव ठक्कर व मनुष शाह यांच्या पुरुष दुहेरी जोडीकडून आणि मनुष शाह व दिया चितळे यांच्या मिश्र दुहेरी जोडीकडून खूप अपेक्षा आहेत. या स्पर्धेत टेबल टेनिसमध्ये भारताचे प्रतिनिधित्व पाच पुरुष आणि पाच महिलांचा समावेश असलेल्या १० सदस्यीय संघाद्वारे केले जात आहे. गत आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने महिला दुहेरीमध्ये पदक जिंकले होते व त्याआधी २०१८ मध्ये आपण दोन कांस्य पदके जिंकली होती. मानव व मनुष ही पुरुष दुहेरी जोडी चांगली कामगिरी करत आहे. त्यांना पदक जिंकण्याची चांगली संधी आहे, असे ते म्हणाले. टेबल टेनिस स्पर्धा २० ते २८ सप्टेंबर दरम्यान खेळवली जाईल.

# बांगलादेश उपांत्य फेरीत

**नागोया, १७ सप्टेंबर**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला क्रिकेट प्रकारात बांगलादेशचा संघ मैदानात न उतरताच उपांत्य फेरीत पोहोचला, तर पाकिस्तानला तुलनेने कमकुवत मानल्या जाणाऱ्या थायलंडविरुद्ध कमी धावसंख्येच्या अटीतटीच्या सामन्यात विजयासाठी फार संघर्ष करावा लागला. मैदान ओले असल्यामुळे चीनविरुद्धचा उपांत्यपूर्व सामना रद्द करावा लागल्याने, बांगलादेशने आपल्या उच्च आंतरराष्ट्रीय मानांकनाच्या आधारे पुढील फेरीत प्रवेश केला.



# 'विष्णुपंत कुलकर्णी स्कूल'च्या असद शेखची जिल्हा बद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १७ सप्टेंबर-**

माळशिरस येथे झालेल्या तालुका शालेय बुद्धिबळ स्पर्धे तून विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलच्या असद शेखची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. यामध्ये इंग्लिश स्कूलने विविध वयोगटांतील २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. १९ वर्षांखालील वयोगटात इयत्ता दहावीतील असद याने ही कामिगिरी केली.

असदचे श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. माधव मिरासदार, कार्याध्यक्ष अ‍ॅड. मिलिंद कुलकर्णी, कार्यवाह राम चंद्र दोशी, सहकार्यवाह राजाराम ढाले, संचालक मंडळातील सर्व पदाधिकारी तसेच प्राचार्या अपर्णा इनामदार आदींनी अभिनंदन केले.

# डोंगरीतोड, हरिहर, किपोळे, हडपद प्रथम

**स्व. निर्मलाताई ठोकळ यांच्या पुण्यस्मरणानिमित्त 'निर्मल मॅरेथॉन स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे व इंदिरा ज्ञानवर्धिनी शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, स्व. निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त झालेल्या 'निर्मल मॅरेथॉन स्पर्धेत १४ वर्षे मुले गटात श्रीधर डोंगरीतोड याने, मुली गटात जानवी हरिहर हिने तसेच १७ वर्षे मुले गटात दीपक किपोळे आणि मुली गटात सृष्टी हडपद यांनी प्रथम स्थान पटकावले.

मेकॅनिक चौकातील स्व. स्वा.से. तुळशीदास दादा जाधव यांच्या पुतळ्यापासून या मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत शहरातील विविध



शाळांमधील ५०० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, इंदिरा ज्ञानवर्धिनीचे अध्यक्ष विपिन ठोकळ, डॉ. हिरेमठ, महापालिका क्रीडा अधिकारी नजीर शेख, सचिव शिल्पाताई ठोकळ, संचालक दत्तात्रय गाजरे आणि थलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले

यावेळी मुख्याध्यापक मोहनराव घोडके, मुख्याध्यापक उदय जाधव, सोलापूर शहर-जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव आणि शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील प्रथम क्रमांकास २००१, द्वितीयला १५०१ तर तृतीय क्रमांकास १००१ रुपये रोख बक्षीस, आकर्षक प्रशस्तीपत्रक व स्मृतिचिन्ह देऊन गौरविले.

**विविध गटातील प्रथम तीन**

**१४ वर्षे मुले:** श्रीधर डोंगरीतोड, सौरभ सातपुते, सनी कोळी. **मुली :** जानवी हरिहर, श्रीदेवी कुंडुर, सुहानी साळुंखे आरोही सरवदे. **१७ वर्षे मुले:** दीपक किपोळे, काशिनाथ चव्हाण, विजय आंबेवाले. **मुली :** सृष्टी हडपद, पवित्र नागलगाव, अक्षता गनगोंडा.

# सोलापूर टेनिक्वाईट मुले व मुली निवड चाचणी स्पर्धा उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर -**

सोलापूर मनपा टेनिक्काईट (रिंगटेनिस) असोसिएशन सोलापूर यांच्यावतीने टेनिक्काईट ज्युनियर मुले व मुली शहर निवड चाचणी स्पर्धा शनिवार १९ सप्टेंबर रोजी राजीव गांधी इनडोअर हॉल सात रस्ता येथे दुपारी ३.00 वाजता होणार आहे.

हा निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आधार कार्डची झेरॉक्स व आवश्यक साहित्यसह मैदानावर उपस्थित राहावे खेळाडूची जन्मतारीख १ जानेवारी २00८ नंतरची असावी.

या निवड चाचणी स्पर्धेतून निवडलेला संघ दिनांक २ ते ४ ऑक्टोंबर २०२६ रोजी निगडी (पिंपरी चिंचवड शहर) येथील सौ मीनाताई ठाकरे क्रीडा संकुल यमुना नगर सेक्टर २१ निगडी पुणे या ठिकाणी राज्य स्पर्धेत सहभागी होईल. खेळाडूंनी मैदानावर संघटनेचे स्पर्धाप्रमुख सुहास छंचुरे, (९0२८0७५१५१) अथवा अजित पाटील (९८८१00९२५७) यांच्याशी संपर्क साधावा. या निवड चाचणी स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन शहर संघटनेचे अध्यक्ष मनिष सुरवसे, सचिव भीमराव बाळगे, कोषाध्यक्ष इक्बाल शेख यांनी केले आहे.





# अन्वी गर्जे हिची जिल्हा बुध्दिबळ स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१७ सप्टेंबर-**

यशवंत महाविद्यालय, करमाळा येथे झालेल्या तालुका शालेय बुद्धिबळ स्पर्धेत अन्वी संजय गर्जे हिने उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे तिची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. तिने पाचपैकी चार राऊंडमध्ये विजय मिळवला. अन्वीला तिचे वडील संजय गर्जे तसेच पृथ्वीराज देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. मान्यवरांच्या हस्ते अन्वीचा मेडल घालून सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या.

# खुल्या गटात बार्शीचा शंकर साळुंके अजिंक्य

**स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा**

**विविध वयोगटात हर्षिता, जय, नैतिक व नियान विजेते**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

ग्रँडमास्टर चेस अकॅडमी व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने ''स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक'' यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात अग्रमानांकीत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त बार्शीचा शंकर साळुंके याने स्पर्धेत आठ पैकी आठ गुण प्राप्त करत तर महिला गटात धाराशिवच्या हर्षिता भोसले हिने साडेसहा गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

खुल्या गटात मानांकित पार्थ वलेकर, बार्शीचा मानांकित यशवंत उबाळे, आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी तसेच बार्शीचा प्रसन्न जगदाळे यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय व चौथा क्रमांक पटकाविला. १६ वर्षाखालील गटात जय तुम्मा, १२ वर्षाखालील गटात नैतिक होटकर व ८ वर्षाखालील गटात नियान कंदीकटला यांनी उत्कृष्ट खेळ करत जेतेपद प्राप्त केले. तर ज्येष्ठ खेळाडूत ६५ वर्षीय धाराशिवच्या नंदकुमार सुरु यांनी बाजी मारत अव्वल स्थान मिळविले.

ईरण्णा उपलप मंगल कार्यालय येथे संपन्न



झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ स्पर्धेच्या प्रायोजीका श्रीमती कस्तुरबाई शंकर मस्कले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच नामवंत उद्योजक द्वारकाप्रसाद उपलप, संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, ग्रँडमास्टर चेस अकॅडमीचे सचिव गणेश मस्कले, राष्ट्रीय खेळाडू रोहित पवार, चंद्रशेखर कोरवी, विद्या मस्कले, सरस्वती झंपले, राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी मानले.

विजेत्या खेळाडूंना रोख बक्षिसे, आकर्षक चषक व मेडल्स मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत मुख्य पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे तर त्यांना सहाय्यक म्हणून युवराज पोगुल, प्रशांत पिसे, विजय पंगुडवाले, प्रज्वल कोरे, गौरव माने, अभिषेक राठोड आदींनी यशस्वीरीत्या काम पहिले.

**अंतिम दहा (गुण व बोकोल्स गुणांसह):**

**खुला गट:** शंकर साळुंखे-८, पार्थ वलेकर-७(४१.५), यशवंत उबाळे - ७(३८.५), पवन राठी- ६.५(३७), प्रसन्ना जगदाळे-६.५(३६.५), साईराज घोडके-६.५(३३.५), मल्हार वाघे-६(३८), वेद आगरकर-६(३७), साईराज पाटील-६(३४.५), शार्विल डांगे-६(३१.५)

**महिला:** हर्षिता भोसले-६.५, संजीवनी चव्हाण-६(३७), सृष्टी तोंडले-६(२८.५), श्रेया संदूपटला-५.५, श्रावणी देवनपल्ली-५(३३), फराळ शेख-५(३१.५), आर्वी सदाफुले-५(२८), स्वराली हातवळणे-४.५(४१), उत्कर्ष लोखंडे-४.५(३६), अक्षरा जाधव-४.५(३४.५).

**१६ वर्षे:** जय तुम्मा-६.५(४0), वेदांत मुसळे-६.५(३५), साद सय्यद-६(४0.५), नचिकेत तोंडले-६(३१), नागेश राजमाने-५.५(३९.५), पर्व अग्रवाल-५.५(३५.५), रोहन थोरात-५.५(३५), वेदांत पवार-५.५(३२), थेमजान होरम-५(३५.५), हाऊकिप गिंखोहाओ-५(३३).

**१२ वर्षे:** नैतिक होटकर-६(३८.५), माने देशमुख आर्यन-६(३७), प्रतीक हलमल्ली-६(३६.५), वेदांत पांडेकर-५.५(३२.५), प्रणव मजगे-५.५(३0.५), मयूर स्वामी-५(३५.५), हिमांशू व्हनगावडे-५(३५), श्लोक चौधरी-५(३४), श्लोक सदाफुले-५(३३.५), हार्दिक रजपूत-५(३२).

**८ वर्षे:** नियान कंदीकटला -५.५,कृष्णराज पाताले-५(३५),आयुष बदवने-५(२९), आरुष माने -४.५, ऋषभ पामनानी-४(३४.५), माने देशमुख धनराज-४(३३),ईशा पटवर्धन-४(३0),मिथिलेश होर्टीकर- ४(२८),जय राठी-४(२८),स्वरांजली जाधव-४(२६.५).

**उत्तेजनार्थ:** दुर्व पोळ, अद्विक कुर्डे, वाग्मी भद्रे, आवेश तोलनूर, अवनी कत्ते, अधिरा म्हेत्रे, संस्कृती लव्हाळे, प्रिया पवार, स्वप्निल इंगळे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### गंभीर गुन्हयातील आरोपी येरवडा कारागृहात स्थानबध्द



**मंगळवेढा दि. १७ सप्टेंबर -**

भाळवणी येथील महादेव मारूती इरकर याच्यावर वाळू चोरी, शरीराविषयक गंभीर गुन्हे,अवैध धंदे दाखल असल्याने जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने मंगळवेढा पोलिसांनी त्याला एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्द करुन पुणे येथील येरवडा कारागृहात त्याची रवानगी करण्यात आली. कोल्हापूर विभागाचे विशेष पोलिस महानिरिक्षक रंजनकुमार शर्मा यांच्या आदेशानुसार मंगळवेढा पोलिस ठाणे हद्दीतील महादेव इरकर याच्याविरोधात जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्याकडे कारवाईचा प्रस्ताव दाखल होता. तदनंतर कारवाईसाठी शोध घेतला असता तो पिलीव ता.माळशिरस व माण जि.सातारा येथे येणार असल्याची गोपनीय माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांनूसार पोलिस पथकाने केलेल्या कारवाईत दि.१५ सप्टेंबर रोजी तो पोलिस पथकाच्या गराड्यात सापडला. त्याला ताब्यात घेवून मंगळवेढा पोलिस ठाण्यात हजर करून दि.१६ रोजी येरवडा कारागृहात स्थानबध्द केल्याचे पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी सांगितले.



### मोडनिंबमधील शिवशंभो गणेश मंडळाचे पावसासाठी साकडे

**मोडनिंब, दि. १७ सप्टेंबर -**

पावसाअभावी शेतकरी, पशुपालक तसेच व्यापारी वर्गावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. यंदा मुबलक पाऊस पडून परिसरातील दुष्काळाचे संकट दूर व्हावे, यासाठी मोडनिंब(ता. माढा) येथील शिवशंभो गणेश तरुण मंडळाच्या (गोलावरचा राजा) वतीने गुरुवारी (दि. १७) ग्रामदैवत श्री वेताळ देवस्थान, हनुमान मंदिर व महालिंगेश्वर मंदिर येथे पावसासाठी साकडे घालण्यात आले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी स्नान करून पाणी अर्पण करून वरुणराजाला मुबलक पावसासाठी प्रार्थना केली. यावेळी अध्यक्ष मुन्ना जाधव, उपाध्यक्ष महेश लादे, सचिव रोहन ढोबळे, तसेच मार्गदर्शक संपत महामुनी, अजय शिंदे, संतोष लादे, अनुप जाधव, प्रवीण लादे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

### वांगी शिवारातील पिके संकटात

**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर -**

मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) मधील वांगी शिवारातील खरीप पिके पावसाअभावी संकटात सापडली आहेत. ३८ दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. पावसाची कोणतीच चिन्हे दिसत नसल्याने रब्बी हंगामातील पेरण्या तरी होतील का नाही, अशी शंका निर्माण झाली आहे.



### दक्षिण सोलापूर पंचायत समितीत वृक्षारोपनाने सेवा संकल्प अभियानाची सुरुवात

**तभा, वृत्तसेवा,**
**द.सोलापूर दि. १७ सप्टेंबर -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीला २५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त १८ सप्टेंबर रोजी पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे सेवा संकल्प अभियानाचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास शिक्षण व आरोग्य समिती सभापती केदार सावंत, कृषि व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बाल कल्याण समिती अमृता वाघे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, प्रसाद मिरकले पंचायत समिती सदस्य विजय राठोड, बलवान गोतसुर्वे, सहायक गट विकास अधिकारी सनी चव्हाण, बाल विकास प्रकल्प अधिकारी विशाल भोसले, तालुका वैद्यकीय अधिकारी निलम घोगरे, उपअभियंता दत्तात्रय सोनवणे, उपअभियंता एजाज मुजावर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सेवा संकल्प अभियानात शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, लोकसहभाग वाढविणे, ग्रामस्तरावर लोकाभिमुख उपक्रम राबविणे तसेच विकास कामांना गती देणे बाबत सुचित केले. यावेळी सेवाज्योत बाइक रॅली काढण्यात आली.

कार्यक्रमासाठी गट विकास अधिकारी मनोज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनिषा वास्ते, कृषि अधिकारी उमेश काटे, विस्तार अधिकारी सुरेश राठोड, शिवानंद सोलापुरे, ज्योतीराम भोसले, सदाशिव कोळी, समीर शेख आदींनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### रामभाऊ देशमुख



**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर -**

ह.भ.प. रामभाऊ महाराज देशमुख वय (७३) रा राजेगाव ता. लोहारा जि. धाराशिव यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे, त्यांच्या पश्चात एक मुलगा,पत्नी, दोन मुली, दोन जावई, नातवंडे आहेत, त्यांचा अंत्यविधी गुरुवारी राजेगाव येथील स्मशानभूमीत करण्यात आला.

# साखर, इथेनॉलचे जास्तीत जास्त उत्पादन घ्या

## विभागीय संचालक गिरीराज अग्नीहोत्री यांचा सल्ला



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. १७ सप्टेंबर -**

येणारा हंगाम कमी दिवसाचा असून कारखान्याने साखर व इथेनॉलचे जास्तीत जास्त उत्पादन करावे, असा सल्ला राष्ट्रीय सहकारी विकास निगमचे विभागीय संचालक गिरीराज अग्नीहोत्री यांनी दिला.

गंगामाईनगर पिंपळनेर येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या २०२६-२७ या चालू २६ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ गुरुवारी सकाळी राष्ट्रीय विकास निगमचे विभागीय संचालक गिरीराज अग्निहोत्री यांच्या हस्ते व कारखान्याचे संचालक रणजितसिंह शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. यावेळी अग्निहोत्री बोलत होते.

पुढे बोलताना गिरीराज अग्निहोत्री म्हणाले की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना अत्यंत चांगल्या पद्धतीने शेतकऱ्यासाठी काम करीत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी केले. ते म्हणाले की,राष्ट्रीय विकास निगमने कारखान्याच्या विकासासाठी शासनाची हमी न घेता कारखान्याचा कारभार पाहून सातत्याने मदत केली आहे. दर दहा दिवसाला पेमेंट करणारा हा राज्यातील एकमेव कारखान आहे. त्यामुळे सभासदानी इतरत्र ऊस न देता विठ्ठलराव शिंदे कारखान्यास द्यावा.

प्रथम संचालक राजेंद्र खोत व त्यांच्या पत्नी शारदा खोत यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा झाली. उपाध्यक्ष पोपट गायकवाड यांच्या हस्ते विठ्ठलराव शिंदे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आभार संचालक सचिन देशमुख यांनी मानले.सुरेश पाठक यांनी पौरोहित्य केले. सूत्रसंचालन रविंद्र जाधव यांनी केले.

तुकाराम ढवळे, योगेश बोबडे, रमेश येवले-पाटील, नागनाथ वाघे, वेताळा जाधव, राजा थोरात, पांडुरंग घाडगे, अशोक मिस्कीन, दीपक पाटील आदींसह अधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

# कंदलगावात दोन घरफोडी; सहा लाखांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर दि.१७ सप्टेंबर**

गुरुवारी १७ सप्टेंबर रोजी रात्री १२/३० वाजण्याच्या सुमारास चार इसमांनी कंदलगावात केलेल्या घरफोडीत सहा लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.




महादेवी कोरे, रा.कंदलगाव यांच्या शेतातील वस्तीवर जाऊन जबरदस्तीने घराचा दरवाजा उघडून फिर्यादी व त्यांची आई भौरवा यांना काठीने व लाथा बुक्क्याने मारहाण केली. भौरवा यांना चाकूने मारहाण करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकूण दोन लाख ४८ हजार रुपयांचा ऐवज चोरला. तसेच रेवप्पा घोडके यांच्या घरामध्ये घुसून त्यांच्या घरातील लोकांना चाकूचा धाक दाखवून काठीने व सळईने मारहाण करून त्यांच्या घरातील सोने, चांदीचे दागिने व रोख रक्कम अशी एकूण तीन लाख ६२ हजार रुपयांचा ऐवज लांबवला. दोन घरात मिळून चार इसमांनी एकूण सहा लाख दहा हजार रुपयांची मुद्देमाल लांबवला. याप्रकरणी मंद्रूप पोलीस ठाण्यात चार अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महादेवी कोरे, वय ५० रा. गुंजेगाव रोड , कंदलगाव ता. दक्षिण सोलापूर यांनी फिर्याद दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे तपास करीत आहेत.

## कुत्रे आडवे आल्याने मोटारसायकलचा अपघात; तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १७ सप्टेंबर-**

दुचाकीसमोर अचानक कुत्रे आडवे आल्याने ब्रेक लावताना मोटारसायकल घसरुन झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

ही घटना ८ सप्टेंबर रोजी पहाटे दोनच्या सुमारास खांडवी ते उपळाई ठोंगे जाणाऱ्या रस्त्यावर लक्ष्मीआईच्या लहान मंदिराजवळ घडली. सुनिल जाधव (वय ३०, रा. उपळाई ठोंगे, ता. बार्शी) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात अनिल ढेरे (वय ३६, रा. उपळाई ठोंगे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अनिल ढेरे हा मोटारसायकल (क्र. एम एच-१३-एफई-५६९९) वरुन स्वतः तसेच सुनिल जाधवसह खांडवीहून उपळाई ठोंगेकडे जात होता. लक्ष्मीआई मंदिराजवळ रस्त्यावर अचानक कुत्रे आडवे आल्याने ब्रेक लावला.

यावेळी मोटारसायकल घसरुन दोघेही रस्त्यावर पडले. अपघातात सुनिल जाधव यांच्या पोटाला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान १० सप्टेंबर रोजी मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय भालेराव यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली.पुढील तपास दत्तात्रय पोलीस उपनिरीक्षक भालेराव करीत आहेत.

## बँक ऑफ इंडियातर्फे कटफळमध्ये मार्गदर्शन

**पिलीव दि. १७ सप्टेंबर**

कटफळ येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेच्या वतीने ग्राहक व ग्रामस्थांना ऑनलाईन फसवणूक व बँकांच्या विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. डिजीटल व सायबर फसवणुक याबाबत तसेच हॅकींग, फिशिंग, डिजीटल अरेस्ट, ओटीपी फसवणूक, याबाबत अतिशय सावध राहण्याच्या सूचना दिल्या. विमा योजना, मुदत ठेव, आवर्ती ठेव, आरोग्य विमा, म्युच्युअल फंड आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. किसान क्रेडिट कार्ड, किमान वाहन कर्ज, पशुपालन कर्ज, कृषी मुदत कर्ज आदी सुविधांची सविस्तर दिली. कार्यक्रमास कटफळ व परिसरातील ग्रामस्थ व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्शी नगरपरिषदेत नोकरीसाठी बनावट कागदपत्रे सादर; महिलेविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १७ सप्टेंबर-**

पतीच्या स्वेच्छानिवृत्तीनंतर त्यांच्या जागी नोकरी मिळविण्यासाठी बार्शी नगरपरिषदेकडे बनावट कागदपत्रांचा वापर केल्याप्रकरणी निता प्रकाश शिंदे ऊर्फ निता सुग्रीव बोकेफोडे (रा. भीमनगर, बार्शी) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. बार्शी नगरपरिषदेचे वरिष्ठ लिपिक रविंद्र गवळी यांनी फिर्याद दिली आहे.

निता शिंदे यांनी त्यांचे पती प्रकाश यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने त्यांच्या जागी नोकरी मिळावी, यासाठी नगरपरिषदेकडे अर्ज केला होता. अर्जासोबत आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, विवाह नोंदणीसंदर्भातील कागदपत्रे, रेशनकार्ड व जन्म प्रमाणपत्र आदी कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या होत्या.

नगरपरिषदेच्या रेकॉर्डची पडताळणी करताना निता सुग्रीव बोकेफोडे या नावाने यापूर्वी सादर कागदपत्रांमध्ये जन्म तारीख १ जून १९७८ असल्याचे निदर्शनास आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दुसरीकडे नोकरीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये जन्म तारीख १ जून १९९० असल्याचे आढळले.

या प्रकरणी नगरपरिषदेने संबंधित शाळा तसेच काटी, ता. तुळजापूर येथील ग्राम विकास अधिकाऱ्यांकडून मूळ अभिलेख मागवून १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीदरम्यान शाळेच्या मूळ नोंदींमध्ये जन्म तारीख १ जून १९७८ असल्याचे आढळले. तसेच १ जून १९९० रोजीचा ऑनलाइन जन्म दाखला रद्द केल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून पत्र दिल्याचेही नमूद आहे.

या पडताळणीनंतर निता शिंदे यांनी नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने जन्म दाखला बनावट स्वरुपात तयार सादर केल्याचा आरोप केला आहे. तपास सहाय्यक फौजदार अजित वरपे करीत आहेत.



## चार दिवसांनंतर आजोबा सुखरूप कुटुंबीयांना सुपूर्द

### सोशल मीडियाची मदत; सज्जन नागरिकांची माणुसकी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ सप्टेंबर -**

दि.११ सप्टेंबर रोजी अक्कलकोट शहरातील घाडगे दूध डेअरीसमोर रस्त्याच्या कडेला आढळलेल्या नामदेव ठाकरे (रा. कोरफळे, ता. बार्शी) यांची माहिती घाडगे दूध डेअरीचे मालक उत्तम घाटगे यांनी सामाजिक कार्यकर्त्यांना दिली. सामाजिक कार्यकर्त्यांनी आजोबांची ओळख पटवण्यासाठी सोशल मीडियावर पोस्ट टाकली. पोस्ट व्हायरल होताच अवघ्या अर्ध्या तासात त्यांच्या नातेवाईकांचा शोध लागला.

नातेवाईकांशी सातत्याने संपर्क साधण्यात आला. प्रतिसाद मिळण्यात विलंब होत असल्याने पोलीस कर्मचारी संजय ठेगळे, आसिफ शेख यांच्या माध्यमातून कुटुंबीय व गावातील पोलीस पाटील यांच्याशी संपर्क साधून आजोबांना घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यानच्या काळात चार दिवस आजोबांना आश्रय दिलेल्या परिसरातील नागरिकांनी माणुसकी जपत चार दिवस जेवण, बिस्किटे व पाण्याची व्यवस्था केली. दोन महिलांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता चारही दिवस त्यांच्यावर लक्ष ठेवले, त्यांना जेवण दिले आणि ते पडल्यास त्यांना उचलून सुरक्षित ठिकाणी बसवले. या दोन महिलांची निस्वार्थ माणुसकी या संपूर्ण घटनेतील अत्यंत महत्त्वाची बाजू ठरली.

अखेर दि.१५ सप्टेंबर रोजी अक्कलकोट पोलीस ठाण्यात आजोबांचे पुत्र व त्यांच्या मित्राला बोलावून घेतले. आणि नामदेव ठाकरे यांना त्यांच्या स्वाधीन केले. या कार्यात पोलीस निरीक्षक अविनाश पवार, पोलीस संजय ठेगळे, आसिफ शेख, सुतार, सामाजिक कार्यकर्ते रशीद खिस्तके, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, आलीम खिस्तके तसेच घाडगे दूध डेअरीचे मालक उत्तम घाडगे, त्या दोन महिला आणि परिसरातील नागरिकांचे सहकार्य लाभले.

## मंगळवेढा शहर परिसरात घरोघरी महालक्ष्मीचे आगमन

### लक्ष्मी आई आलीचा गजर; सुहासिनींचा उत्साह

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १७ सप्टेंबर -**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात गुरुवारी सायंकाळी घरोघरी सोनपावलांनी लक्ष्मीचे आगमन झाले. रात्री ज्वारीची भाकरी व शेपूची भाजी याचा नैवेद्य दाखवून कुटूंबियांनी श्री लक्ष्मीचे मनोभावे दर्शन घेतले.



महालक्ष्मी आगमनाच्या पार्श्वभूमीवर कुटूंबातील महिलांनी संपूर्ण घर व आंगण स्वच्छ करुन दारात रंगीबेरंगी रांगोळी काढली होती. सायंकाळी महालक्ष्मीचे आगमन असल्यामुळे अंगणापासून ते देव्हाऱ्यापर्यंत लक्ष्मीच्या पाऊलखुणा काढल्या होत्या. सायंकाळी गल्लीमधील ५ सुहासिनी बोलावून महालक्ष्मीचे आगमन मोठ्या उत्साहात करण्यात आले. रात्री महालक्ष्मीला ज्वारीची भाकरी व शेपूची भाजी नैवेद्य दाखविण्यात आला. दुसऱ्या दिवशी पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो.

गुरुवारी रात्री उशीरा घरोघरी महालक्ष्मी आडणीवर उभा करण्यात आल्या. यावेळी महालक्ष्मीच्या समोर विविध प्रकारचे फराळ,फळे,खेळणी ठेवली होती. घरोघरी महिला वर्गातून आनंद दिसून येत होता. मंगळवेढ्याच्या बाजारपेठेत दोन दिवसापुर्वी महालक्ष्मीचे मुखवटे व विविध साहित्य खरेदीसाठी महिलांनी गर्दी केल्याचे चित्र होते.

# सध्या पर्यावरणपूरक शेतीची नितांत गरज

पर्यावरणपूरक शेती म्हणजे नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम व विवेकी वापर करून, पर्यावरणीय संतुलन न बिघडवता, आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आणि सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह पद्धतीने कृषी उत्पादन घेण्याची प्रणाली.ही संकल्पना केवळ रासायनिक शेती विरुद्ध सेंद्रिय शेती या मर्यादित चौकटीत पाहणे योग्य नाही. पर्यावरणपूरक शेती ही व्यापक प्रणाली आहे. त्यामध्ये स्थानिक परिस्थिती, मातीचा प्रकार, हवामान, उपलब्ध पाणी, पीक पद्धती, शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता, बाजारपेठ आणि स्थानिक ज्ञान यांचा एकत्रित विचार केला जातो.

**एकात्मिक कीड व्यवस्थापन**

पर्यावरणपूरक शेतीमध्ये कीड नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशकांवर पूर्ण अवलंबित्व टाळून एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे महत्त्वाचे आहे.यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो. नियमित पीक निरीक्षण,




आर्थिक नुकसान पातळीचा विचार, फेरोमोन सापळे, चिकट सापळे, प्रकाश सापळे, जैविक नियंत्रण, मित्रकीटकांचे संवर्धन, योग्य पीक फेरपालट, प्रतिकारक्षम वाण, आवश्यकतेनुसार निवडक कीटकनाशकांचा शास्त्रीय वापर.

**जैविक आणि नैसर्गिक निविष्ठांचा विवेकी वापर**

जैवखते, जैविक कीडनियंत्रक, कंपोस्ट, गांडूळखत, हिरवळीची खते आणि स्थानिक जैविक संसाधने पर्यावरणपूरक शेतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. मात्र जैविक किंवा नैसर्गिक हा शब्द वापरला म्हणून प्रत्येक उत्पादन आपोआप परिणामकारक किंवा सुरक्षित असेलच असे नाही. त्याची गुणवत्ता, शिफारस, मात्रा, पिकाची अवस्था आणि स्थानिक परिस्थिती यांचा विचार करणे आवश्यक आहे.

**संवर्धन शेती**

संवर्धन शेतीमध्ये मातीची कमीतकमी मशागत, जमिनीवर कायमस्वरूपी किंवा शक्य तितके आच्छादन आणि पीक विविधीकरण यांसारख्या तत्त्वांना महत्त्व दिले जाते. या पद्धतीमुळे मृदा धूप कमी करणे, जमिनीतील ओलावा टिकवणे, मातीची रचना सुधारणे आणि उत्पादन खर्चातील काही घटक कमी करणे शक्य होऊ शकते.मात्र संवर्धन शेतीचा अवलंब करताना तण व्यवस्थापन, यंत्रसामग्री, पीक अवशेष व्यवस्थापन आणि स्थानिक हवामान यांचा वैज्ञानिक विचार आवश्यक आहे.

**कृषिवनीकरण : शेती आणि पर्यावरणाचा समन्वय**

कृषिवनीकरण म्हणजे शेती पिकांसोबत वृक्ष, फळझाडे, चारा किंवा इतर उपयुक्त वनस्पतींचे नियोजनबद्ध एकत्रीकरण.यामुळे खाली दिल्याप्रमाणे फायदे होऊ शकतात. यामुळे अतिरिक्त उत्पन्नाचे साधन मिळू शकते, मृदा धूप कमी होऊ शकते,जैवविविधता वाढू शकते, शेतातील सूक्ष्म हवामान सुधारण्यास मदत होऊ शकते, कार्बन साठवणुकीला हातभार लागू शकतो, पशुधनासाठी चारा उपलब्ध होऊ शकतो.

**एकात्मिक शेती प्रणाली**

शेती, पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, फळबाग, भाजीपाला आणि कृषिवनीकरण यांसारख्या विविध उपक्रमांना एकमेकांशी जोडून चालविण्याची पद्धत म्हणजे एकात्मिक शेती प्रणाली.या पद्धतीमध्ये एका घटकातून निर्माण होणारा उपपदार्थ दुसऱ्या घटकासाठी संसाधन म्हणून वापरता येतो. उदाहरणार्थ, जनावरांचे शेण कंपोस्टसाठी आणि शेतीतील काही अवशेष पशुखाद्यासाठी वापरता येतात.

**शेतीतील अवशेषांचे व्यवस्थापन**

पिकांची काढणी झाल्यानंतर उरलेले अवशेष जाळण्याची पद्धत पर्यावरणासाठी हानिकारक ठरू शकते. त्याऐवजी अवशेषांचे खालील प्रमाणे उपयोग केल्यास पोषकद्रव्यांचे पुनर्चक्रण होते आणि बाह्य निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करण्याची संधी मिळते. कंपोस्टिंग, मल्चिंग, जमिनीत पुनर्भरण, पशुखाद्य, जैविक पदार्थ निर्मिती, जैवऊर्जा निर्मिती......

-डॉ. नितीनकुमार रणशूर
सहयोगी संशोधन संचालक
विभागीय कृषी संशोधन केंद्र,
सोलापूर. मा.७८७५३१७६७३

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## सर्व समाजघटकांसाठी जागा दिल्या; आम्हालाच का नाही? -चितोड राजपूत समाजबांधवांचा सवाल

**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**
सोलापूर शहरात चितोड राजपूत समाजाची लोकसंख्या सुमारे १५ हजार इतकी आहे. सिध्देश्वर पेठेतील सिटी सर्व्हे क्रमांक ६०४३ ही जागा चितोड राजपूत लोहार घिसाडी समाजास सांस्कृतिक भवनासाठी देण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आला होता. मात्र, या विषयासंदर्भात अभ्यास आणि शहानिशा न करता विरोध करण्यात आला आहे. सर्व समाजघटकांना या ना त्या कारणासाठी महापालिकेच्या जागा दिल्या. मग, आम्हालाच का नाही? असा सवाल चितोड राजपूत लोहार घिसाडी समाजबांधवांनी पत्रपरिषदेत उपस्थित केला. शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे आणि एमआयएमचे नगरसेवक अजहर हुंडेकरी यांनी आक्षेप घेतल्यानंतर विषय तहकूब करण्यात आला. समाजाच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला एवढी मोठी जागा नाममात्र भाड्याने दिल्यास पालिकेचे आर्थिक नुकसान होईल, असा मुद्दा शिंदे व हुंडेकरी यांनी मांडला. आम्ही मतदार म्हणून चालतो तर आम्हाला जागा का देत नाहीत? असा संतप्त सवालही उपस्थित करण्यात आला. यावेळी कृष्णा सुरवसे, चेतन पडवळकर, बालाजी साळुंखे आदी उपस्थित होते.


## महापालिकेच्या ५० अधिकारी, कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**
आपली तक्रार/ माय सोलापूर ॲप व लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अर्ज मुदतीत निकाली न काढल्याप्रकरणी सोलापूर महापालिकेने ५० अधिकारी व कर्मचाऱ्यांना एकूण २८ हजार ६५० रुपयांचा दंड करण्यात आला आहे. सदर दंड वसूल करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त सोनाली यादव यांनी काढले आहेत. मुदतीत तक्रारी व अर्ज निकाली न काढणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. महापालिकेने नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी ऑनलाइन तक्रार प्रणाली सुरु करण्यात आली, असे सांगण्यात आले.

# ‘त्या’ शुभेच्छांमागे कोणताही राजकीय हेतू नाही

### शिखर पहारिया फाउंडेशनकडून सेवा सप्ताहाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद देण्याच्या अनुषंगाने शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने प्रसारमाध्यम आणि डजीटल फलकाद्वारे पंतप्रधान मोदी




यांना शुभेच्छा देण्यात आल्या. मात्र यामागे कोणताही राजकीय हेतू नाही, असे शिखर पहारिया फाउंडेशनचे राज सलगर यांनी स्पष्ट केले.

**राजकीय विचारधारा, भूमिका**

शिखर फाउंडेशनची सध्याची भूमिका सामाजिक कार्यापुरती मर्यादित नाही. कोणतीही राजकीय विचारधारा स्वीकारणे, राजकीय भूमिका घेणे अथवा आगामी काळात निवडणूक लढविण्याबाबत कोणतीही चर्चा किंवा विचार नाही. नागरिकांच्या प्रश्नांवर काम करणे आणि गरजेच्या वेळी त्यांना मदतीचा हात देणे; यालाच प्राधान्य आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

फाउंडेशनच्या शुभेच्छांचे बॅनर शहरात लागल्यानंतर पहारिया हे ‘भाजपा’मध्ये जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. याविषयी बोलताना राज सलगर यांनी सांगितले की, गरजू व्यक्तींच्या समस्या जाणून घेऊन त्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करुन देण्यावर भर दिला जात आहे. समाजातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, हा फाउंडेशनच्या कामाचा केंद्रबिंदू आहे. सामाजिक कार्याच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या समजून घेऊन गरजूंच्या अडचणींच्या काळात सर्वसामान्यजनांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका शिखर पहारीया फाउंडेशनने घेतली आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे नातू असलेले शिखर पहारिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त माध्यमातून शुभेच्छा दिल्या, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## वाचक पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**
समाजातील विविध प्रश्न आणि विषयांवर वृत्तपत्रांतून व्यक्त होणाऱ्या वाचक पत्रलेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचच्यावतीने वाचक पत्र लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, असे अध्यक्ष फैय्याज शेख यांनी सांगितले.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वाचकांनी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत निरनिराळ्या वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध झालेल्या, वेगवेगळ्या विषयांवरील आपल्या फक्त तीन वाचक पत्रांच्या झेरॉक्स प्रती पाठवणे आवश्यक आहे.

स्पर्धकांनी आपल्या पत्रांच्या झेरॉक्स प्रती दि.२० सप्टेंबर २०२६ पर्यंत अरुण बाबुराव धुमाळ, पारस ए. ४३०/४३१, आदित्य नगर, विजापूर रोड, सोलापूर-४१३००४ (संपर्क: ९८९०९०२९२३) या पत्त्यावर पाठवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.



सोलापूर : दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालयातील गणरायाची संध्याकाळची पूजा जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मुख्य समुह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, व्यवस्थापक विनायक पुला, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादक यशवंत गुरव, ॲड. प्रकाश जाधव, जगदीश माढेकर आदी.




सोलापूर : दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालयातील श्रींची पूजा गुरुवारी सकाळी हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश काबंळे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, पर्यवेक्षक अप्पासाहेब राऊत यांच्यासह मुख्य समुह संपादक दिलीप पेठे, व्यवस्थापक विनायक पुला, सिध्दाराम चिट्टे.

## पाणीवेस गणेश मंडळात आरोग्य योजनांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**
जिल्ह्यातील नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांची माहिती मिळावी आणि पात्र लाभार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, या उद्देशाने माहिती व जनसंपर्क विभागाच्या ‘लोकसंवाद २०२६’ उपक्रमांतर्गत सोलापूर शहरातील पाणीवेस गणेश मंडळ येथे विविध शासकीय योजनांची माहिती देण्याचा उपक्रम घेण्यात आला. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे सहाय्यक समन्वयक शाम टांकसाळ यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याबाबत सविस्तर माहिती दिली.



महाराष्ट्र शासनाने या दोन्ही योजना एकत्रितपणे राबविल्या असून, पात्र कुटुंबांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य उपचाराचा लाभ मिळतो. या योजनेत राज्यातील ४,५०० हून अधिक शासकीय व खासगी अंगीकृत रुग्णालयांचा समावेश असून २,३९९ उपचारांचा समावेश आहे. यात हृदयरोग शस्त्रक्रिया, मूत्रपिंड प्रत्यारोपण, कॅन्सर, बालरोग आदी आजारांचा समावेश आहे. या कार्यक्रमासाठी रमेश गायकवाड यांचे सहकार्य लाभले. जिल्हा माहिती कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक मिलिंद भिंगारे यांनी सूत्रसंचालन केले.

## साखर पेठेत साकारला उज्जैन महाकाल मंदिराचा देखावा



### श्री गणेश बाल तरुण मंडळाचा ५७ वर्षांचा गणेशोत्सवाचा वारसा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**
पूर्वविभागातील साखर पेठ येथील लखपती हनुमान मंदिराजवळील श्री गणेश बाल तरुण मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त उज्जैन येथील भगवान महाकाल मंदिराची व गाभाऱ्याची हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे. धार्मिक वातावरण, मंदिराची रचना आणि गाभाऱ्याची मांडणी यामुळे हा देखावा भाविकांचे विशेष आकर्षण ठरत असून, देखावा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

श्री गणेश बाल तरुण मंडळाची स्थापना १९६९ मध्ये झाली. तत्कालीन कार्यकर्ते प्रकाश बाबानगरे, राचप्पा व्हसकेरी, हरि कालाणी, श्रीकांत कालाणी, सतीश बिद्री, बुलबुले, राजू मरगूर आदींच्या पुढाकाराने सुरु झालेला हा गणेशोत्सवाचा प्रवास आज ५७ वर्षांनंतरही अखंडितपणे सुरु आहे. मंडळाच्या स्थापनेपासूनच दरवर्षी हलता देखावा सादर करण्याची परंपरा जपण्यात आली आहे.

यंदाच्या देखाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे उज्जैन येथील भगवान महाकाल मंदिराची हुबेहूब प्रतिकृती. ही प्रतिकृती साकारण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मागील वर्षभरात तब्बल १० ते १५ वेळा उज्जैनला भेट देऊन मंदिराची रचना, गाभारा आणि विविध बारकाव्यांची पाहणी केली. त्यानंतर त्याच धर्तीवर सोलापुरात देखावा उभारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



सोलापूर शहरातील तरटी नाका पोलीस चौकी समोरील दशभूजा गणेश उत्सव तरुण मंडळांनी नारळात गणपती देखावा उभा करण्यात आला आहे बारा फुटी नारळ उभे करण्यात आले आहे.

## बनावट नोटांची छपाई करून वितरण केल्याप्रकरणी दोघा आरोपींना सक्तमजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ सप्टेंबर-**
विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत बनावट चलनी नोटांची छपाई करून वितरण केल्याप्रकरणी सोलापूर सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांनी दोन आरोपींना दोषी ठरवून सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. विष्णू सिदराम गायधणकर (वय-३५, रा.भारत हाऊसिंग सोसायटी, सोलापूर), संजय धनू पवार (वय-३५, रा.कुंठा तांडा, उत्तर सोलापूर) असे त्यांची नावे आहेत.

दि.१ ऑक्टोबर २०२० रोजी विजापूर नाका पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाला आसरा चौक परिसरात बनावट नोटा चलनात आणल्या जात असल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांनी तातडीने सापळा रचून संजय पवार याला ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीत १०० रुपये दराच्या ४ बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. संजय पवारच्या कसून चौकशीनंतर मुख्य सूत्रधार विष्णू गायधणकर याच्या घरावर धाड टाकण्यात आली. तेथून पोलिसांनी ५०० रुपये दराच्या ५०० बनावट नोटा, १०० रुपये दराच्या ६१० बनावट नोटा, हायटेक प्रिंटर, पेपर कटर, विशेष शाईच्या बाटल्या आणि कागद असा मोठा मुद्देमाल जप्त केला होता.

तत्कालीन सहाय्यक पोलिस निरीक्षक कोल्हाळ व पोलीस शिपाई वाघमारे यांनी या गुन्ह्याचा सखोल तपास करून न्यायालयात सबळ पुरावे व दोषारोपपत्र सादर केले. नाशिक येथील ‘‘करन्सी नोट प्रेसचा तांत्रिक अहवाल या प्रकरणात निर्णायक पुरावा ठरला. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कविता बागल व शितल डोके यांनी प्रभावी युक्तिवाद केला. पोलीस आयुक्तालयाच्या दोषसिद्धी कक्षाच्या पाठपुराव्यामुळे आणि पोलिसांच्या अचूक तपासामुळे आरोपींना शिक्षा मिळवून देण्यात यश आले आहे.

# महिला सुरक्षेसाठी पोलिस यंत्रणा २४ तास सतर्क



### आपत्कालीन परिस्थितीत ‘११२’ क्रमांकावर संपर्क साधा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ सप्टेंबर-**
महिला, युवती आणि मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पोलीस प्रशासनाने सुरक्षा यंत्रणा अधिक बळकट केली आहे. कोणत्याही आपत्कालीन किंवा संकटाच्या प्रसंगी महिलांना तात्काळ मदत मिळावी, यासाठी ‘११२’ हा एकत्रित आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक २४ तास कार्यरत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने महिलांनी कोणतीही भीती न बाळगता या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी केले.

शासकीय योजनांची जनजागृती करण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने गणेश मंडळांच्या माध्यमातून ‘लोकसंवाद-२०२६’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील श्रीकृष्ण गणेश तरुण मंडळ येथे आयोजित कार्यक्रमात अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी महिला सुरक्षेसाठी शासन व पोलीस प्रशासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

महिलांवरील छेडछाड, अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार किंवा प्रवासादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही धोकादायक परिस्थितीत ‘११२’ क्रमांकावर संपर्क साधल्यास पोलीस नियंत्रण कक्षामार्फत तातडीने मदतकार्य सुरू केले जाते. जीपीएस प्रणालीच्या माध्यमातून संबंधित व्यक्तीचे लोकेशन निश्चित करून आवश्यकतेनुसार पोलीस गस्ती पथक किंवा स्थानिक पोलीस घटनास्थळी मदतीसाठी पोहोचतात.

गणेश मंडळांनी गणेश विसर्जनाच्या वेळी पारंपरिक वाद्यांचाच वापर करावा. डॉल्बी व लेझर सिस्टीमवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी मंडळांनी गावाच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवावी, गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चास मदत करावी, वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहनही अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी केले. प्रारंभी पंढरपूर उप माहिती कार्यालयाचे अविनाश गरगडे यांनी लोकसंवाद २०२६ उपक्रमाची माहिती व उद्देश सांगितला.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अणदूर येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ, योगासन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१७ सप्टेंबर -**

क्रीडा व युवक कल्याण संचालनालय, तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय तुळजापूर व श्री श्री गुरुकुल, अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने अणदूर येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ व योगासन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील २९ शाळांमधील २६० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. यातील १०८ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.



जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी स्वरूप मोकाशे, देवांश कुलकर्णी, श्रेयश गावित, आर्णा कानडे, राजवी माने, आराध्या घोडके, अर्णव कानडे, मल्लिनाथ आरबळे, निसर्गराजे मुळे, मयूर जाधव व श्रेयश मुळे यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे होते. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रामेश्वर सावंत यांनी केले. ज्ञानेश्वर बंडगर यांनी आभार मानले.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या शिक्षिकांचा बावची विद्यालयात सन्मान

**परंडा, दि.१७ सप्टेंबर -**

बावची विद्यालयातील पूजा रोडगे व मनीषा बनसोडे या शिक्षिकांची पवित्र पोर्टल प्रक्रियेद्वारे सोलापूर जिल्हा परिषद शाळेवर निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने भावपूर्ण सन्मान करण्यात आला. दोन्ही शिक्षिकांनी अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या संस्कार, शिस्त व व्यक्तिमत्त्व विकासासाठी योगदान दिले. विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे त्यांच्या बदलीची भावना विद्यार्थ्यांसाठी भावनिक ठरली. आवडत्या शिक्षिका उद्यापासून शाळेत नसणार असल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदासोबतच हुरहूरही दिसून आली. यावेळी संस्थाचालक विभीषण रोडगे, अनिता रोडगे, मुख्याध्यापक नारायण खैरे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### रुईभरच्या विद्यार्थ्यांची क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी

**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभरच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली. १५ सप्टेंबर रोजी तुळजाभवानी क्रीडा संकुल, धाराशिव येथे झालेल्या स्पर्धेत अनेक खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. १७ वर्षे मुलींच्या लांब उडीत कल्याणी गव्हाणे हिने प्रथम, तर प्रज्ञा कोळगे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. १९ वर्षे मुलांच्या ८०० मीटर धावण्यात कुणाल गव्हाणे याने प्रथम क्रमांक पटकावत ३००० मीटर जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. १९ वर्षे मुलांच्या ४÷१०० मीटर रिले संघाने प्रथम क्रमांक मिळविला. या संघात आरव आकाडे, ओंकार कोळगे, कुणाल गव्हाणे व आर्यन शिंदे यांचा समावेश आहे. मुलींच्या ४÷१०० मीटर रिले संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.



### तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत हायस्कूल लोहारा अव्वल

**लोहारा, दि.१७ सप्टेंबर -**

लोहारा शहरातील सप्तरंग मंगल कार्यालयात १२ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत हायस्कूल लोहारा येथील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली. बॅडमिंटनच्या १४ वर्षे वयोगटात चैतन्य वाघमारे व संघाने, तर १७ वर्षे मुलांच्या गटात मोहित पाटील व संघाने प्रथम क्रमांक मिळविला. १७ वर्षे मुलींच्या गटात सृष्टी पाटील व दीप्ती तिगाडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. बुद्धिबळ स्पर्धेत श्लोक माळी याने १४ वर्षे गटात, तर समर्थ पाटील व इम्रान खुटेपड यांनी १७ वर्षे गटात तिसरा क्रमांक मिळविला. या यशाबद्दल मुख्याध्यापक गोपाळ सुतार, क्रीडा शिक्षक वैजनाथ पाटील, मोहित मक्तेदार, शिक्षकवृंद व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### डी.टी.एस. परीक्षेत अदिरा दुबेचे सुवर्ण यश

**लोहारा, दि.१७ सप्टेंबर -**

धानुरी येथील विद्यामाता इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी अदिरा अशोक दुबे हिने डी.टी.एस. स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या यशाबद्दल सालेगावच्या केंद्रप्रमुख के. ए. नडगेरी आणि शाळेच्या प्राचार्या हिरा हावळे-सोलापुरे यांच्या हस्ते सुवर्णपदक व पारितोषिक देऊन तिचा गौरव करण्यात आला. अदिराच्या यशाबद्दल शेतकरी विकास संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अशोकराव जवळगे, सचिव किशोर साळुंके, ॲड. दीपक जवळगे, शिक्षक व पालकांनी अभिनंदन केले.

# शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही! : पालकमंत्री सरनाईक

**▸▸ पालकमंत्री सरनाईकांकडून खेडमध्ये पीक नुकसानीची पाहणी ▸▸ शेतातूनच उपमुख्यमंत्री शिंदेंना दाखविले नुकसान**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

पावसाच्या दीर्घ खंडामुळे हातातोंडाशी आलेल्या सोयाबीनसह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, या संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. राज्य शासन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. पीक नुकसानीबाबत शासन सकारात्मक असून, येत्या काही दिवसांत मदतीसाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

पालकमंत्री सरनाईक यांनी बुधवारी (दि. १७) धाराशिव तालुक्यातील खेड येथे प्रत्यक्ष शेतात जाऊन पावसाच्या दीर्घ खंडामुळे झालेल्या पीक नुकसानीची पाहणी केली. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांनी शेतकरी ज्ञानेश्वर टकले यांच्या शेताला भेट देऊन नुकसान झालेल्या सोयाबीन पिकाची पाहणी केली. यावेळी टकले यांनी जवळपास शंभर टक्के सोयाबीन पीक हातचे गेल्याची व्यथा मांडत शासनाने भरीव आर्थिक मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडूनही जिल्ह्यातील पीक नुकसानीची माहिती घेतली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरीव मदत द्यावी, अशी मागणी राजेनिंबाळकर यांनी केली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना जिल्ह्यातील पीक नुकसानीची पाहणी करून अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले.

शेतकऱ्यांच्या अडचणी आणि अपेक्षा जाणून घेत पालकमंत्री सरनाईक यांनी शासन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा पुनरुच्चार केला. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडले जाणार नाही.

नुकसानग्रस्तांना मदत देण्यासाठी शासन आवश्यक कार्यवाही करीत आहे, असा दिलासाही त्यांनी यावेळी दिला.

**बँकेत रक्कम भरण्याची गरज नाही सोयाबीनपाठोपाठ ऊसाचेही नुकसान**

पालकमंत्री सरनाईक यांनी खेड येथील ऊस उत्पादक शेतकरी वासुदेव मेटे यांच्या शेतालाही भेट देऊन नुकसान झालेल्या ऊस पिकाची पाहणी केली. यावेळी परिसरातील शेतकऱ्यांनी सोयाबीन, ऊस आणि अन्य पिकांचे पावसाच्या दीर्घ खंडामुळे झालेले नुकसान पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

**शेतातूनच उपमुख्यमंत्र्यांना दाखविले नुकसान...**

पीक नुकसानीचे गांभीर्य प्रत्यक्ष दाखविण्यासाठी पालकमंत्री सरनाईक यांनी शेतातूनच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. त्यांनी नुकसानग्रस्त सोयाबीन पीक उपमुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष दाखविले. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकरी ज्ञानेश्वर टकले यांच्याशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्य शासन भक्कमपणे उभे असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निश्चितपणे मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



## आंदोलकांना ताब्यात घेणे लोकशाहीचा अपमान

**आ. कैलास पाटील यांची पोलिसांच्या कारवाईवर टीका; 'आवाज दडपून लोकशाहीचा आवाज बंद करता येणार नाही'**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या युवकांना त्यांच्या घरी जाऊन ताब्यात घेणे तसेच त्यांना पोलीस ठाण्यात नजरकैदेत ठेवणे हा लोकशाहीचा अपमान असल्याची टीका आमदार कैलास पाटील यांनी केली. जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्या आंदोलकांचा आवाज दडपून लोकशाहीचा आवाज बंद करता येणार नाही, असे त्यांनी म्हटले.

धाराशिव येथील आनंदनगर पोलीस ठाण्यात मराठा आंदोलकांना ताब्यात घेतल्याच्या घटनेनंतर आमदार कैलास पाटील यांनी पोलीस ठाण्यात जाऊन आंदोलकांची भेट घेतली. आंदोलकांच्या सुटकेसाठी त्यांनी हस्तक्षेप केल्याचे वृत्त आहे.

आमदार पाटील म्हणाले की, मराठवाड्याच्या भूमीने रझाकारांच्या दडपशाहीविरुद्ध लढा दिला आहे. त्यामुळे याच भूमीत आपल्या हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्या नागरिकांविरोधात दडपशाहीची भाषा चालणार नाही. लोकशाही व्यवस्थेत आंदोलन करणे आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठविणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे.



आंदोलक महिला आणि युवकांना आनंदनगर पोलीस ठाण्यात नजरकैदेत ठेवण्यात आल्याची माहिती मिळताच आपण तातडीने हस्तक्षेप करून त्यांची सुटका केली, असा दावा आमदार पाटील यांनी केला. जनतेच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी लढणाऱ्या आंदोलकांच्या पाठीशी उभे राहणे ही आपली नैतिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर धाराशिवमध्ये आंदोलकांवरील कारवाईचा मुद्दा चर्चेत आला आहे. दरम्यान, १७ सप्टेंबरच्या शासकीय कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर धाराशिव शहरातील काही भागात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेशही लागू करण्यात आले होते.

आंदोलन हाताळताना प्रशासनाने नागरिकांच्या लोकशाही अधिकारांचा विचार करावा, अशी भूमिका आमदार कैलास पाटील यांनी मांडली.

## काँग्रेस भवनात मुक्तिसंग्राम दिनानिमित्त झेंडावंदन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त धाराशिव येथील काँग्रेस भवनात राष्ट्रध्वजाला मानवंदना देत झेंडावंदन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निजामशाहीच्या जुलमी राजवटीविरोधात स्वातंत्र्यासाठी लढलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, संघर्ष व बलिदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले. मुक्तिसंग्रामातील वीरांना अभिवादन करून स्वातंत्र्य, लोकशाही, संविधानिक मूल्ये व राष्ट्रनिष्ठा जपण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच देशाची एकात्मता, सामाजिक सलोखा आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी कार्यरत राहण्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, राजेंद्र शेरखाने, प्रशांत पाटील, धनंजय राऊत, विनोद वीर, शिवाजीराव गायकवाड, तनुजा हुड्डे, गोरोबा झेंडे, पोपट शिंदे, हरिदास शिंदे, विलास शाळू, शिवानंद तोडकर, ज्योतीराम निमसे, अशोक पेठे, प्रभाकर लोंढे, संजय गजधने, अशोक बनसोडे, सोपान वरवडे, करण कांबळे, बसवराज पाटील, अनिल चांदणे, इमाम शेख आदी उपस्थित होते.

### वनरक्षकावर काळा रंग ओतून शासकीय कामात अडथळा

**उमरगा, दि.१७ सप्टेंबर -**

उमरगा येथील सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपरिक्षेत्र कार्यालयात वनरक्षकावर काळा रंग ओतून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी संदीप अनुरथ गायकवाड व इतर दोन जणांविरुद्ध उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १६ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास वनरक्षक काका बापुराव मगर हे कार्यालयात लेबरच्या मस्टरचे काम करीत होते. त्यावेळी आरोपी कार्यालयात येऊन 'काका मगर कोण आहेत?' अशी विचारणा केली. त्यानंतर मगर यांच्या हाताला धरून बाटलीतील काळा रंग त्यांच्या डोक्यावर व कपड्यांवर ओतल्याचा आरोप आहे.

## रुईभर विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या हस्ते हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकाचे पूजन करण्यात आले. प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी गावातून प्रभातफेरी काढली.



यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. दहावी-बारावीतील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी तसेच पाचवी, सातवी व आठवीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. १०१ विद्यार्थ्यांना गणवेशांचे वाटप करण्यात आले. तसेच वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात आली.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना सुभाषदादा कोळगे यांनी मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्ष व बलिदानाची माहिती देत मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या तसेच देशाच्या विकासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी मुख्याध्यापक गौतम सुतार, सेवानिवृत्त शिक्षक रामेश्वर राऊत यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले, तर आभार गणेश शेटे यांनी मानले.

# सोयाबीन उत्पादकांना हेक्टरी लाखाची मदत द्या : डॉ. प्रतापसिंह पाटील

**▸▸ धानोरा येथे पीक नुकसानीची पाहणी; दुष्काळ जाहीर करण्याचीही मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

धानोरा (ता. धाराशिव) येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी शेतात जाऊन सोयाबीन पिकाची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांनी पिकाच्या नुकसानीची परिस्थिती जाणून घेतली.

पाहणीदरम्यान अनेक शेतांमध्ये सोयाबीनचे पीक उभे असले तरी शेंगा अत्यल्प लागल्या असून, काही ठिकाणी जवळपास पूर्ण नुकसान झाल्याचे चित्र दिसून आले. काही ठिकाणी थोड्याफार शेंगा लागल्या असल्या तरी त्यातील दाणे पूर्णपणे भरलेले नसून गुणवत्ता अत्यंत खराब असल्याचे शेतकऱ्यांनी डॉ. पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले. यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांनी मशागत, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. मात्र, पिकाची झालेली अवस्था पाहता वर्षभराच्या कष्टांवर पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष उत्पन्न किती उरणार, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या व्यथा आणि त्यांच्या डोळ्यातील वेदना पाहता परिस्थितीची भीषणता स्पष्ट होत असल्याचे नमूद करून डॉ. पाटील यांनी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली.

पंचनामे, कागदोपत्री अटी आणि प्रशासकीय विलंबात वेळ न घालवता शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट प्रति हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, धाराशिव जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा, जनावरांसाठी तातडीने चारा डेपो सुरू



करावेत, पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, पीक नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे जलदगतीने पूर्ण करून मदत वितरणाची प्रक्रिया सुरू करावी. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत न पाहता शासनाने त्यांच्या कष्टांचा आणि सध्याच्या संकटाचा गांभीर्याने विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी डॉ. पाटील यांनी केली.

# गुरुकृपात भव्य राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात पार

## 'पोस्टर'मधून दिसली भविष्यातील फार्मसीची दिशा!

**माजलगाव :** विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देत त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना राज्यस्तरीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव यांच्या वतीने आयोजित सहावी राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन ( भित्तीपत्रक सादरीकरण ) स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रा. प्रकाश राजेभोसले आणि सौ. नंदिनी राजेभोसले यांच्या शुभ आशीर्वादाने रिबीन कापून झाले. महाराष्ट्रातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थ्यांनी 94 संघाच्या माध्यमातून या स्पर्धेत सहभाग घेत विविध वैज्ञानिक व संशोधनात्मक विषयांवरील पोस्टर्स प्रभावीपणे सादर केली.

बक्षीस वितरण समारंभात फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अमित बिंदू यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. तसेच या कार्यक्रमास डॉ . रंगनाथ गोळेकर, पत्रकार श्री. पांडुरंग उगले यांची प्रमुख उपस्थित लाभली. गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी लोखंडे आणि शितल गोपाळघरे या विद्यार्थिनींनी केले व आभार प्रदर्शन प्रा. गणेश वाघमारे यांनी केले.




या स्पर्धेत बी.फार्मसी गटात के. टी. पाटील कॉलेज, धाराशिव येथील श्रद्धा साळगरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव येथील सानिया पठाण हिने द्वितीय क्रमांक मिळवून गौरव वाढविला. तर डीजेपीएस कॉलेज, पाथरी येथील वैष्णवी काळे व सोनाली वाघमारे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकास अनुक्रमे 7000, 5000, 3000 रुपये असा रोख धनादेश, प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. तसेच डी.फार्मसी गटात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथील शेख सानिया व शेख तस्मिया यांनी प्रथम क्रमांक मिळविला. चन्नबसवेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथील पटेल शिफा व वैभवी धनश्री यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच आदित्य डिप्लोमा फार्मसी कॉलेज, बीड येथील गजानन गोरे व लबासे भागवत यांनी तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकास अनुक्रमे 5000, 3000, 2000 रुपये असा रोख धनादेश, प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना संशोधन, वैज्ञानिक विचारसरणी, सादरीकरण कौशल्य आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ मिळाले. विशेषतः माजलगावसारख्या शहरात राज्यस्तरीय फार्मसी उपक्रमाचे आयोजन झाल्याने शैक्षणिक क्षेत्रातून गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फार्मसी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापकवर्ग व सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्वा. सावरकर महाविद्यालयात पानाचे पारंपारिक विडे करण्याची कार्यशाळा



बीड ( प्रतिनिधी) योग्य पद्धतीने तयार केलेले नागवेलीचे पान हे शरीरासाठी आरोग्यदायी आहे. महालक्ष्मी पूजनासाठी पानाचे पारंपारिक पद्धतीने दहा प्रकारचे खायचे वीडे तयार करण्याची कार्यशाळा स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात संपन्न झाली.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी कार्यशाळेच्या सुरुवातीला पानाचे आयुर्वेदिक महत्त्व आणी उपयोग समजून सांगितले. पाचन तंत्र, मधुमेह, भूक लागणे, डोकेदुखी मायग्रेन, अंग खाजवणे, चेहऱ्यावरचे डाग, निद्रानाश इत्यादी आजारावर पानाचा औषध म्हणून वापर करतात. महालक्ष्मी पूजनात पानाला महत्त्व आहे पानाचे विडे महालक्ष्मी साठी पारंपारिक पद्धतीने तयार केले जातात. हे विडे कसे तयार करायचे याचे मार्गदर्शन डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले आणी सहभागी प्रशिक्षकांना विडे कसे तयार करण्याचे हे शिकवले. साधा विडा, खन विडा, अधिक वीडा, वळकटी विडा, नारायण विडा, पट्टी विडा, गोविंद विडा, पुडी विडा, कुलूप किंवा पर्स विडा असे वेगवेगळे विडे त्यांनी तयार करून दाखवले. डॉ. रूपाली कुलकर्णी, प्रा. दीपा देशपांडे, प्रा.रुचिरा ढेरे, डॉ. अनुजा कास्तीकर, प्रा.स्वाती कुलकर्णी, मनीषा धारूरकर, अलका कुलकर्णी यांच्या सह महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक कार्यशाळेत सहभागी झाले होते.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन डॉ. बाबासाहेब ओबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न !

**बीड (प्रतिनिधी):-** येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या शुभहस्ते ॲड.व्ही.बी.मगर आणि संचालक राम शिंदे, लक्ष्मण शिंदे, व्ही. जी.आव्हाड, सेवानिवृत्त मुख्याधापक बी.ए. हावळे व नवनिर्वाचीत मुख्याधापक एस.बी.मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब. आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरात काढण्यात आली. या प्रसंगी शासनाच्या आदेशानुसार मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या अनुषंगाने वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्राथमिक गटातून 'बीड जिल्ह्याची मराठवाडा मुक्ती संग्रामात कामगीरी' व माध्यमिक गटातून 'बीड जिल्ह्यात सद्यास्थितीत असणारी आव्हाने आणि करावयाची कामगिरी' या विषयावर कु.आरुषी धुतालमल, कु.पुजा भागवत, कु.आरती भागवत, चि. प्रदुम्न घुले, या विद्यार्थ्यांनी वकृत्व केले. या प्रसंगी माजी मु.अ तथा संचालक व्हि.जी. आव्हाड यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा या विषयावर आपले विचार प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर. बी. घुले (स.शि.), श्रीमती एन.जी मुंडे, श्रीमती शिंदे एस.एस. यांनी प्रयत्न केले. तसेच या प्रसंगी आनंद छात्रालयाचे अधिक्षक डी.व्ही. खरसाडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन पवळ यु.बी. यांनी केले व प्रास्ताविक शाळेचे मु.अ.एस.बी. मेश्राम यांनी केले. आभार प्रदर्शन आर बी. घुले यांनी केले. या प्रसंगी शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## धरणाच्या उंचीवाढीविरोधात युवा शेतकरी संघर्ष समितीचे शेकडो शेतकऱ्यांसह धरणात उतरुन जलसमाधी आंदोलन

**माजलगाव, (प्रतिनिधी):-** माजलगाव धरणाची उंची वाढविण्याच्या निर्णयाविरोधात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली

आज १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी धरणग्रस्त शेतकऱ्यांनी धरणात उतरून जलसमाधी आंदोलन केले.

धरणाच्या उंचीवाढीमुळे २२ गावांतील शेतकरी व ग्रामस्थांच्या जमिनी, घरे आणि गावांवर नांगर फिरणार असल्याची युवा शेतकरी संघर्ष समितीचे फरताडे यांनी सांगितले

माजलगाव धरणाच्या

उंची वाढीमुळे बावीस गावच्या शेतकऱ्यांवर संक्रात

येण्याची शक्यता असल्याचा आरोप करत युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलकांनी शासनाच्या निर्णयाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. त्यामुळे धरणाच्या उंचीवाढीचा मुद्दा आता अधिक तीव्र बनला आहे.



युवा शेतकरी संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी शासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मराठवाडा मुक्ती दिनी माजलगाव धरणाच्या पाण्यात उतरून आंदोलन सुरू केले. पैठण धरणाच्या धर्तीवर माजलगाव धरणातील गाळ, दगड गोटे काढून पाणीसाठ्याची क्षमता वाढविण्याचा पर्याय असताना धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय का घेतला जात आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. धरणाच्या उंचीवाढीबाबत प्रशासनाच्या दोन पत्रांमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचा आरोप समितीने केला आहे. ९ सप्टेंबरच्या पत्रात उंचीवाढीमुळे जमिनी संपादित केल्या जाऊ शकतात, असे नमूद असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. उंचीवाढीमुळे २२ गावांतील नागरिकांवर विस्थापनाचे संकट ओढवू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. हा प्रश्न केवळ शेतजमिनीचा नाही. आमची घरे आणि गावेही पाण्यात जाण्याचा धोका आहे. २२ गावांतील ग्रामस्थ हा अन्याय कदापि सहन करणार नाहीत. अशी आक्रमक भूमिका युवा शेतकरी संघर्ष समितीने घेतली आहे. दरम्यान प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या बाजूने छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहनराव जगताप, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, भाजपाचे नितीन नाईकनवरे, माकपचे मोहन जाधव, आझाद क्रांती सेनेची राजेश घोडे, इत्यादींचं अनेकांनी आंदोलनात सहभागी होत युवा शेतकरी संघर्ष समितीची बाजूने भूमिका घेतली आहे.

लोकप्रतिनिधीच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला आहे. जलसमाधी आंदोलन सुरू झाल्याने माजलगाव धरण परिसरात वातावरण तणाव निर्माण झाला. दुपार नंतर प्रशासनाने ठोस आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

आंदोलन स्थळी काही अघटीत घटना घडू नये म्हणून एन.डी.आर.यफची टीम पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

**बीड, दि. १७ (प्रतिनिधी) :** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे गुरुवार (दि. १७) रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर, विशेष पाहुण्या अजिजपुरा क्लस्टरच्या क्लस्टर हेड शेख सलमा बेगम अब्दुल रशीद यांच्या हस्ते सकाळी ठीक ७.४५ वाजता शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. ध्वजवंदनानंतर राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीतांच्या जयघोषाने परिसर भारावून गेला.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करत उपस्थितांना मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करुन तातडीची मदत करा- रमेश भिसे



केज/प्रतिनिधी

मराठवाड्यात बीड जिल्हा हा सतत दुष्काळाच्या छायेत येतो इथले जीवनमान हे शेती वरती अवलंबून असून शेती ही निसर्गाच्या अवेळी पडणाऱ्या पावसाचा पाण्यावरती अवलंबून आहे शेतीव्यतिरिक्त उत्पन्नाचे व जगण्याचे काहीही साधन लोकांकडे उपलब्ध नाही त्यामुळे दरवर्षी 60 टक्के लोक ऊसतोड कामगार म्हणून स्थलांतरित होतात

मात्र खरिपाचे पीक संपूर्ण पदरात घेऊन लोक स्थलांतरित दरवर्षी होतात यावर्षी सुरुवातीला थोडासा पाऊस झाला आणि लोकांनी शंभर टक्के खरीपाची पेरणी ज्यामध्ये तूर मूग उडीद बाजरा हे पीक पेरली गेली दीड महिना अजिबात पाऊस नाही शास्त्रज्ञाचे व इतरांचे सर्व अंदाज फेल गेले त्यामुळे खरिपाची सर्व पीक उध्वस्त झाली वाया गेली जरी पाऊस थोडाफार झाला तरी रब्बी साठी शेती दुरुस्त करणे शेतकऱ्यांना शक्य नाही आणि पाऊस होण्याचेही चिन्ह दिसत नाहीत. गावागावातील नदी नाले विहिरी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत तलाव हे कोरडे ठाक असून अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे भयंकर संकट सध्या उभा राहिलेला आहे बीड जिल्ह्यात पाण्याची पातळी पाचशे फुटाच्या खाली गेलेली असून तिथेही पाणी लागण्याचे शाश्वती नाही

त्यामुळे शासनाने तातडीने मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील दुष्काळाच्या प्रश्नावर ती लक्ष घालून गावात पिण्याचे पाण्याची सोर्स उपलब्ध करून देणे तसेच जनावरांना चारा ज्यांच्या घरात खायला काही नाही त्यांना धान्य तसेच मनरेगाची काम गावात सुरू करावीत व भविष्यात दुष्काळाचा सामना करण्यासाठी पाण्याची पातळी वाढण्याच्या दृष्टिकोनातून नदी नाले खोलीकरण रुंदीकरण व सरळीकरण तसेच तलावातील गाळ काढून शेतीला देणे या पद्धतीची काम मोठ्या प्रमाणात हाती घेणे गरजेचे आहे .

## आश्वासनाची पूर्ती ; ना. पंकजाताई मुंडेंनी मानले केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे आभार

**बीड।दिनांक १६।:** परळी मतदारसंघातील बर्दापूर ते लोखंडी सावरगांव रस्ता रुंदीकरणाला आता गती येणार असून यासाठी १०४ कोटीची निविदा तरतूद आराखड्यात करण्यात आली आहे, या कामासाठी जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

निवडणुक प्रचाराच्या वेळी ना. पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभेत बर्दापुर ते लोखंडी सावरगाव रस्त्याचे रुंदीकरण करावे अशी मागणी केली होती, हा रस्ता अरूंद असल्याने यावर वारंवार अपघात झाले होते, त्यामुळे ही मागणी पुढे आली होती, यावर गडकरी यांनी रस्त्यासाठी लवकरच निधी देऊन काम सुरू करू असे आश्वासन दिलं होते. ना.पंकजाताईंनी या मागणीसाठी गडकरी यांची काही महिन्यापुर्वी दिल्ली येथे भेटही घेतली होती.

रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बर्दापूर ते लोखंडी सावरगांव या एकूण १८ किमी लांबीच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतपणे करण्यात आला होता. आता या कामासाठी १०४ कोटींची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे, त्यामुळे हया रस्त्याचे लवकरच रुंदीकरण होणार आहे, दरम्यान, जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल ना. पंकजाताईंनी गडकरींचे आभार मानले आहेत.

## बीड लोकसभा शिवसेनेचे संपर्कप्रमुख अशोकजी सकपाळ साहेब यांचा उपस्थितीत केज येथे बैठक संपन्न



**केज :** शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून सोमवार दिनांक 14-09-2026 रोजी बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा व केज विधानसभा पदाधिकारी बैठक शिवसेना नेते अंबादास दानवे साहेब उपनेते तथा मराठा वाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड लोकसभा संपर्कप्रमुख अशोक सकपाळ साहेब व मा . जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली सदरील बैठक ही नवनिर्वाचित बीड लोकसभा संपर्कप्रमुख अशोकजी सपकाळ साहेब यांचे मा. जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केज विधानसभा व परळी विधानसभा यांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. तालुका निहाय पदाधिकारी ची चर्चा नवीन शाखाप्रमुख नियुक्ती रिक्त पदाची नियुक्ती व बी एल ए ची नियुक्ती पडताळणी यांच्या आढावा घेण्यात आला तसेच तालुका निहाय शिवसेना महिला आघाडी युवा सेनेच्या सर्व पदाधिकारी सोबत पक्ष संघटना वाढीव बाबत अनमोल अशी चर्चा करण्यात आली तसेच पक्ष वाढीव करिता प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी आपली मांडणी करून येणाऱ्या काळात पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या हात बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकारी ग्राउंड वर काम करून आपल्या अहवाल बीड लोकसभा संपर्कप्रमुख यांच्याकडे सादर करणार आहेत.केज व परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व उपजिल्हा प्रमुख तालुका प्रमुख महिला आघाडी .शहर प्रमुख सर्व पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते....

## स्वातंत्र्य टिकवणे आणि संवर्धन करणे ही सर्वांची जबाबदारी : प्रा.डॉ. विजयकुमार बांदल

### तुलसी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा

**बीड, दि. १७ (प्रतिनिधी) :** जगण्यासाठी माणसाला जसा श्वास अत्यंत महत्त्वाचा असतो, तितकेच मानवी जीवनात स्वातंत्र्याचे मोल आहे. स्वातंत्र्य सहज किंवा सहजासहजी मिळालेले नाही, तर त्यामागे अनेक स्वातंत्र्यसैनिकांचा प्रदीर्घ संघर्ष, त्याग आणि मोठे बलिदान आहे. त्यामुळे अनेक हुतात्म्यांच्या बलिदानातून मिळालेले हे स्वातंत्र्य टिकवणे, त्याचे रक्षण करणे आणि त्याचे योग्य संवर्धन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले.

बीड येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित ७८ व्या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

सोहळ्याची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. त्यानंतर विशेष पाहुणे प्रशासकीय अधिकारी डी. डी. राऊत यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजवंदनानंतर राष्ट्रगीत, वंदे मातरम् आणि महाराष्ट्र गीताच्या जयघोषाने महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. नंदकुमार उघाडे यांनी मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त का करावा लागला, यामागील ऐतिहासिक घटनाक्रमाचा आढावा घेत या संघर्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला. तसेच डॉ. बाळासाहेब कटारे यांनी स्वातंत्र्याचा इतिहास आणि त्याचे मोल नव्या पिढीने सदैव जपले पाहिजे, असे आवाहन केले. प्रा. दीपक जमदाडे यांनी निजामाच्या जुलमी राजवटीविरोधातील लढा व मराठवाड्याच्या मुक्तीची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करत मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. निकाळजे यांनीही सर्वांना या ऐतिहासिक दिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## खो -खो स्पर्धेत समर्थ माध्यमिक विद्यालय तरनळी चा संघ तालुक्यात प्रथम

केज/प्रतिनिधी

क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयामार्फत आयोजित शैक्षणिक वर्ष 2026-2027क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.तालुका स्तरीय खोखो 17 वर्ष वयोगटातील 'समर्थ माध्यमिक विद्यालय तरनळी' मुलीच्या संघाने नेत्रदीपक कामगिरी केली. दिनांक 16/9/2026 रोजी आयोजित तालुका स्तरीय खोखो स्पर्धेत 17 वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला तसेच 14 वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने तालुक्यात उपविजेते मिळवले.तसेच तालुकास्तरीय 17 वर्ष वयोगट मुली बुद्धिबळ स्पर्धेत अदिती सरवदे व संघवी सरवदे यांनी बाजी मारत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला त्याचप्रमाणे बॅडमिंटन स्पर्धेत विद्यार्थिनींनी



उपविजेते पद मिळवले. या यशाबद्दल बीड जिल्ह्याचे खासदार मा.श्री बजरंग बप्पा सोनवणे साहेब यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या.संस्थेच्या अध्यक्षा माननीय सौ.सारिका ताई सोनवणे, संस्थेचे सचिव ॲड कांदे साहेब,तालुका क्रीडा अधिकारी सौ राखी मॅडम,गटशिक्षणाधिकारी साहेब,मुख्याध्यापक श्री कुलकर्णी सर,क्रीडा शिक्षक श्री जोगदंड सर,श्री सोनवणे सर,श्री काकडे सर श्री धायगुडे सर,श्री डाके सर श्री थळकरी सर,श्रीमती तरकसे मॅडम, श्रीमती काळे मॅडम,श्री अंजान सर,श्री सरवदे, श्री मंदे श्री सुरवसे तसेच गावातील पालक व प्रतिष्ठित नागरिक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## रणवीर बेद्रे याने जिल्हा स्तर बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक



गेवराई ,दि. १६( प्रतिनिधी)- राजारामबापू पाटील मिलिटरी स्कूल अँड स्पोर्ट्स अकॅडमी ईश्वरपूर यांच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या आंतरशालेय जिल्हास्तर एमॅच्युअर बॉक्सिंग स्पर्धेत गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते राजकुमार बेदरे यांचे चिरंजीव रणवीर यांनी सुवर्णपदक पटकावले आहे. जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धा ईश्वरपूर येथील सयाजीराव यादव बॉक्सिंग क्लब येथे नुकत्याच संपन्न झाल्या .या स्पर्धेतून 17 वर्षे वयोगटातील 80 किलो प्लस किलो वजन गटातील बॉक्सर रणवीर राजकुमार बेद्रे यांनी जोरदार फाईट करून सर्वाधिक गुण मिळवत जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले .त्यामुळे 24 व 25 सप्टेंबर 2026 दरम्यान सातारा येथे होणाऱ्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी रणवीर बेदरे याची निवड झाली आहे. या निवडीबद्दल राजारामबापू पाटील मिलिटरी स्कूल अँड स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक विनायकराव पाटील, सचिव मनीषाताई पाटील, प्राचार्य अशोक करे, प्रशिक्षक दीपक गिरासे यांनी अभिनंदन केले. राजकुमार बेद्रे यांचे चिरंजीव रणवीर बेद्रे यांच्या या यशाबद्दल बीड जिल्ह्यात अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## यमगरवाडीत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

एकलव्य विद्या संकुल, मंगरूळ यमगरवाडी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संकुलाचे माजी विद्यार्थी प्रवीण चौगुले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी प्रमुख वक्ते माधव पाटील यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास, रझाकारांचे अत्याचार आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थी पद्मराज चव्हाण यानेही भाषण केले. प्रवीण चौगुले यांनी संकुलात मिळालेल्या संस्कारांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

प्रियांका देवकाते, अस्मिता भोजने व अनिल घुगे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक अण्णासाहेब मगर यांनी केले. सूत्रसंचालन प्रियांका देवकाते व नंदिनी मारकड यांनी, तर आभार सृष्टी यमगर हिने मानले. यावेळी विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वातंत्र्याच्या लढ्यातून मिळालेली जिद्दच आजच्या संकटावर मात करण्याची ताकद देईल : पालकमंत्री सरनाईक

### धाराशिवकरांना दुष्काळाच्या संभाव्य संकटाला धैर्याने सामोरे जाण्याचे आवाहन...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांनी प्रतिकूल परिस्थितीत दाखविलेली जिद्द, त्याग आणि एकजुटीची प्रेरणा घेऊन आजच्या संभाव्य दुष्काळ व पाणीटंचाईच्या संकटावरही मात करूया. संकट कितीही मोठे असले तरी सरकार नागरिक आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशी ग्वाही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी पालकमंत्री सरनाईक यांनी स्मृतीस्तंभास पुष्प अर्पण करून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. पोलिसांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिल्यानंतर राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' झाले. त्यानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.

यावेळी स्वातंत्र्यसैनिक बुबासाहेब जाधव, भास्करराव नायगावकर, नागनाथ कुंभार, शेषराज बनसोडे, गोविंद नलावडे, मनाबाई घोडके, तात्यासाहेब शिंदे यांच्यासह खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार कैलास घाडगे-पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्याला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना'च्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांना दिलासा देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

कमी व्याजदरात कर्ज, नियमित कर्जफेडीस प्रोत्साहन, शेतीमालासाठी व्यापक बाजारपेठ, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यावर शासनाचा भर असल्याचे सरनाईक यांनी नमूद केले.



धाराशिव जिल्हा उद्योग आणि रोजगाराच्या नव्या पर्वाकडे वाटचाल करीत असल्याचे सांगत सरनाईक यांनी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत उद्योग घटकांशी झालेल्या सामंजस्य करारांचा उल्लेख केला.

या माध्यमातून गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. युवकांना रोजगाराच्या संधी आणि उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी 'रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' उपक्रमात जिल्ह्यातील उद्योगांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

तुळजाभवानी मातेचे तीर्थक्षेत्र, धाराशिव लेणी, नळदुर्ग, परंडा, संत गोरक्षनाथांचा वारसा आणि जागजीचे महालक्ष्मी मंदिर यांसारख्या ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थळांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या पर्यटनाला नवी ओळख मिळवून देण्यावर भर असल्याचे त्यांनी सांगितले.



'वारसा जपू, पर्यटन वाढवू आणि स्थानिकांच्या हाताला काम देऊ', ही जिल्ह्याच्या पर्यटन विकासाची दिशा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील आरोग्य सुविधांना बळकटी देण्यासाठी ५०० खाटांच्या नवीन जिल्हा रुग्णालयाला मंजुरी, जलसंधारणाच्या माध्यमातून भूजल सुरक्षा, गोदामांची धान्य साठवणूक क्षमता वाढविणे तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया अधिक गतिमान व पारदर्शक करण्याच्या उपाययोजनांचाही त्यांनी उल्लेख केला.

मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाची आजच्या आव्हानांशी सांगड घालताना पालकमंत्री म्हणाले की, त्या काळात आपल्या पूर्वजांकडे साधने कमी होती; मात्र जिद्द मोठी होती. आज आपल्याकडे साधने, तंत्रज्ञान, प्रशासन आणि विविध योजना आहेत. त्याला एकजुटीची ताकद जोडली तर कोणतेही संकट मोठे नाही.ज्या भूमीने निजामाच्या राजवटीविरुद्ध लढा दिला, स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले आणि संकटांवर मात करून विकासाची वाट धरली, तीच भूमी आज पाणीटंचाईच्या संकटावरही मात करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते तीन अनाथ बालकांना 'आपले सरकार सेवा केंद्र' मंजुरीची प्रमाणपत्रे देण्यात आली. सिद्धनाथ अनपट यांना तुळजापूर, आकाश जावळे यांना वाशी आणि साक्षी शिंदे यांना कळंब तहसील येथील सेवा केंद्र मंजूर करण्यात आले. या माध्यमातून संबंधितांना स्वावलंबी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच सामाजिक न्यायाच्या योजनेंतर्गत गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल व आर्थिक सहाय्य देण्यात आले. सात लाभार्थ्यांना प्रत्येकी एक स्टॉल आणि पाच हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य वितरित करण्यात आले.

कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, महिला, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत पडवळ यांनी केले.

**१३ महिने दोन दिवसांचा संघर्ष...**

पालकमंत्री सरनाईक यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्मे, स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला; मात्र निजामाच्या राजवटीतून मराठवाड्याला मुक्त होण्यासाठी आणखी १३ महिने दोन दिवस संघर्ष करावा लागला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा मुक्त झाला. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील या संघर्षात सामान्य जनतेनेही धैर्याने सहभाग घेतला. धाराशिव जिल्ह्यालाही या गौरवशाली इतिहासाचा वारसा लाभला असल्याचे त्यांनी नमूद केले.

**पाणीटंचाईवर सूक्ष्म नियोजन...**

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने आणि पावसात दीर्घ खंड पडल्याने जिल्ह्यासमोर संभाव्य पाणीटंचाईचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यासाठी तालुकानिहाय विशेष पाणीटंचाई आराखडे तयार करण्यात आले असून उपलब्ध जलसाठ्यांचे काटेकोर नियोजन केले जात आहे. नागरिक आणि पशुधनाला पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पर्यायी जलस्रोतांचा वापर, अनधिकृत पाणीउपसा रोखणे आणि जलस्रोतांचे नियोजन यावर भर देण्यात येत आहे.'पाणी अडवा, पाणी जिरवा आणि उपलब्ध पाणी जपून वापरा' हा संदेश लोकचळवळ बनविण्याचे आवाहनही त्यांनी केले. नाला बांध, बंधारे, पाझर तलाव, सूक्ष्म पाणलोट क्षेत्र विकास, शेततळी, सिमेंट नाला बांध आणि चेकडॅमच्या कामांना गती देऊन भूजलपातळी वाढविण्याचा दीर्घकालीन संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

## अणदूरमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१७ सप्टेंबर -**

जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अणदूर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ व प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर अणदूर विद्यानगरीतून प्रभातफेरी काढण्यात आली.

यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसेनानींच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. श्रीमंत मुळे यांनी अणदूरच्या मुक्तिसंग्रामातील योगदान, रझाकारांचा अत्याचार आणि नागरिकांनी केलेल्या प्रतिकाराच्या आठवणी सांगितल्या. अध्यक्षीय भाषणात रामचंद्र आलुरे यांनी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, सरदार वल्लभभाई पटेल व बाबासाहेब परांजपे यांच्या कार्याचा आढावा घेत हुतात्म्यांचे बलिदान व मुक्तिसंग्रामाचा इतिहास विसरू नये, असे आवाहन केले. कार्यक्रमास ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन रोहित मोरे यांनी केले, तर आभार मकरंद पाटील यांनी मानले.

## एकोंडी लो शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१७ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, एकोंडी (लो.) येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा तसेच मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नासा परीक्षा उत्तीर्ण इयत्ता सहावीतील विद्यार्थी रुद्र संदीपान सूर्यवंशी याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी जनरल नॉलेज परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच ३० पर्यंतचे पाढे पाठ केलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. प्रत्येक वर्गातील दोन आदर्श विद्यार्थ्यांची निवड करून त्यांचाही सत्कार करण्यात आला. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाषणे केली. या भाषण स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धा परीक्षांचे महत्त्व आणि त्यासाठी तयारी कशी करावी, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. शाळेतील शिक्षिका सुश्मिता मॅडम यांच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नोटबुक्स आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन व सदस्य, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवर, पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुश्मिता यांनी केले. सूर्यवंशी व्ही.आर. यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुडले पी.एस., श्रीमती येदले पी.के. आणि मुख्याध्यापक आयलाने डी. एन. यांनी सहकार्य केले.

**आलियाबाद पुलावर मुक्तिसंग्रामाच्या स्मृतींना उजाळा**

## आ. राणा पाटील यांच्या हस्ते शहीद बचित्तर सिंह यांच्या प्रतिमेचे पूजन; ऐतिहासिक पुलाचेही पूजन





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त नळदुर्ग येथील मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या जाज्वल्य इतिहासाचा मूक साक्षीदार असलेल्या ऐतिहासिक आलियाबाद पुलाचे दि. १७ सप्टेंबर रोजी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

माजी नगरसेवक विनायक अहंकारी हे गेल्या २८ वर्षांपासून या ऐतिहासिक पुलाच्या पूजन कार्यक्रमाचे आयोजन करीत आहेत. मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात आलियाबाद पुलाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. याच पुलावर निजामाचे सैनिक आणि भारतीय जवान यांच्यात संघर्ष झाला होता. या संघर्षात भारतीय जवान शहीद बचित्तर सिंह यांना वीरमरण आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते शहीद बचित्तर सिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर निजामाचे सैनिक, रझाकार आणि भारतीय जवान यांच्यात रक्तरंजित संघर्ष घडलेल्या ऐतिहासिक आलियाबाद पुलाचे पूजन करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जागीरदार, नगरसेवक दत्तात्रय दासकर, निरंजन राठोड, आकाश कुलकर्णी, तानाजी जाधव, नगरसेविका छमाबाई राठोड, दत्तात्रय कोरे, विलास येडगे, सुधीर हजारे, सुहास येडगे, संजय विठ्ठल जाधव, उत्तम बनजगोळे, राजेंद्र जाधव, पद्माकर घोडके, श्रमिक पोतदार, विशाल डुकरे, नंदकुमार जोशी, शिवाजी सुरवसे, दादा बनसोडे, धिमाजी घुगे, संतोष पुदाले, बंडप्पा कसेकर यांच्यासह शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिकांचे वारसदार आणि नागरिक उपस्थित होते.

# बिजनौरच्या सुतळी बॉम्ब प्रकरणाचे धाराशिव कनेक्शन?

### आरोपीच्या शोधासाठी तेरखेड्यात यूपी पोलिसांची एन्ट्री; स्थानिक पोलिसांची मदत, मात्र हाती लागला नाही...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ सप्टेंबर -**

उत्तर प्रदेशातील बिजनौर जिल्ह्यातील चौकपुरी येथील फटाका कारखान्यात सुतळी बॉम्बसह अवैधरीत्या काडतुसे तयार केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्याचे वृत्त समोर आले आहे. या तपासादरम्यान धाराशिव जिल्ह्यातील अमजद नावाच्या व्यक्तीचा उल्लेख झाल्याची माहिती असून, त्याच्या शोधासाठी उत्तर प्रदेश पोलिसांचे पथक तेरखेड्यात दाखल झाल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

बिजनौर जिल्ह्यातील चौकपुरी येथील फटाका कारखान्यावर पोलिस, महसूल व अग्निशमन विभागाच्या पथकाने संयुक्त कारवाई केली.

या कारवाईत स्फोटक साहित्य, तयार सुतळी बॉम्ब तसेच काडतुसे तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केल्याचे वृत्त आहे. या प्रकरणात मोहम्मद युसूफ आणि गुफरान अहमद अन्सारी यांना अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपींच्या चौकशीत महाराष्ट्रातील धाराशिव जिल्ह्यातील अमजदचा उल्लेख झाल्याचे सांगण्यात येत आहे.

अमजद कच्चा माल उपलब्ध करून देत असल्याचे तपासात समोर आल्याचे वृत्त असून, त्याच्या शोधासाठी उत्तर प्रदेश पोलिसांचे पथक महाराष्ट्रात रवाना झाल्याची माहिती आहे.


फटाका निर्मितीसाठी प्रसिद्ध असलेल्या तेरखेड्याला महाराष्ट्राची 'शिवकाशी' म्हणून ओळखले जाते. सुतळी बॉम्बसह विविध प्रकारच्या फटाक्यांच्या निर्मितीमुळे तेरखेड्याची राज्यभरात ओळख आहे. त्यामुळे बिजनौर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर यूपी पोलिसांचे पथक तेरखेड्यात दाखल झाल्याची बाब चर्चेचा विषय ठरली.

याबाबत येरमाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यशवंत घोडके यांनी सांगितले की, उत्तर प्रदेश पोलीस या ठिकाणी आले होते. आम्ही त्यांना मदत करत तेरखेड्यात आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; मात्र तो सापडला नाही.

बिजनौर प्रकरणातील अटक आरोपींच्या चौकशीत धाराशिव जिल्ह्यातील अमजदचा उल्लेख झाल्याचे वृत्त आणि त्याच्या शोधासाठी यूपी पोलिसांनी महाराष्ट्रात येणे, यामुळे या प्रकरणाची व्याप्ती चर्चेत आली आहे. अमजदची नेमकी भूमिका काय आहे, बिजनौर प्रकरणाशी त्याचा संबंध कितपत आहे आणि तेरखेड्यात त्याचा शोध का घेण्यात आला, याबाबत अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही.

तेरखेड्यात यूपी पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला; मात्र तो मिळून आला नाही, अशी माहिती स्थानिक पोलिसांनी दिली आहे.

त्यामुळे बिजनौर प्रकरणातील कथित धाराशिव कनेक्शन आणि तेरखेड्यातील पोलिसांची हालचाल यांचा नेमका संबंध काय, हे पुढील तपासातून स्पष्ट होणार आहे.





# शाश्वत कृषी क्षेत्रातील डिजिटल क्रांतीचा कणा

कृषी डिजिटल क्रांती


हवामान बदलाचे तीव्र संकट, भूजलाची खालावलेली पातळी, रासायनिक खतांच्या असंतुलित वापरामुळे मृदेचा घसरता पोत आणि वारंवार उद्भवणारा दुष्काळ यामुळे भारतीय शेती सध्या एका गंभीर संकटातून जात आहे. भारताची जवळपास ४५ टक्के पेक्षा अधिक शेती अजूनही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने, शेतीतील अचूकता आणि संसाधन व्यवस्थापन वाढवणे अन्नसुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत निकडीचे ठरले आहे. या पृष्ठभूमीवर उपग्रह तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा संगम घडवून आणणारे गुगल अर्थ इंजिन हे क्लाउड-बेस्ड जिओस्पेशिअल प्लॅटफॉर्म भारतीय शेतीसाठी एक शक्तिशाली आधारस्तंभ ठरत आहे. इस्रोच्या 'भुवन' पोर्टलच्या जोडीला जीईईच्या डिजिटल सॉईल मॅपिंग आराखडा समृद्ध केला आहे. याद्वारे मातीतील सेंद्रिय कार्बन आणि मातीचा पोत, मातीचा सामू यांचे गावपातळीवरील आणि तालुका पातळीवरील अचूक नकाशे तयार केले जात आहेत.

**मृदा धूप नियंत्रण :** 'रिव्हाइज्ड युनिव्हर्सल सॉईल लॉस इक्वेशन' मॉडेल थेट जीईईवर चालवून भारतातील चंबळ खोरे, पश्चिम घाट आणि कृष्णा नदी खोऱ्यांमधील जमिनीची धूप अभ्यासण्यात आली आहे. यामुळे पाणलोट क्षेत्र विकास आणि वृक्षारोपणाचे अचूक नियोजन करणे प्रशासनाला शक्य झाले आहे.

**सिंथेटिक अपर्चर रडारद्वारे ओलावा मापन :** सेंटिनेल-१ च्या सी-बँड मायक्रोवेव्ह रडार डेटाचा वापर करून जीईई ढगाळ हवामानात किंवा रात्रीच्या वेळीही जमिनीतील रूट-झोन ओलाव्याचे अचूक प्रमाण मोजू शकते. आगामी नासा-इस्रो 'निसार' उपग्रहाच्या डेटा इंटिग्रेशनमुळे हे ओलावा मापन आणखी सूक्ष्म आणि उच्च रिझोल्यूशन पातळीवर उपलब्ध होणार आहे.

**४. कृषी-अर्थव्यवस्था आणि विमा क्षेत्रातील पारदर्शकता :**

भारतातील 'पंतप्रधान पीक विमा योजना' आणि




पेटाबाईट-स्केल महासंगणकीय क्षमतेने भारतातील मृदा संशोधन, पीक विमा प्रणाली आणि शाश्वत शेती व्यवस्थापनात क्रांतिकारी बदल घडवून आणले आहेत.

**१. पेटॅबाईट डेटा आणि क्लाउड कॉम्प्युटिंग:**

गुगल अर्थ इंजिन हे केवळ सॅटेलाईट छायाचित्रे पाहण्याचे साधन नसून महासंगणकीय क्षमता असलेले एक जागतिक विश्लेषण व्यासपीठ आहे.

विशाल डेटा संग्रह : जीईईमध्ये नासाच्या ५० वर्षांहून अधिक कालावधीच्या मलँडसॅट', युरोपियन स्पेस एजन्सीच्या 'सेंटिनेल-१ आणि सेंटिनेल-२, 'मोडिस' सारख्या उपग्रहांचा तसेच इतर जागतिक डेटासेट सुमारे ५००० हून अधिक संख्येने आणि संशोधन हेतू विनामूल्य उपलब्ध आहे.

**२. इंडिया-फर्स्ट एआय मॉडेल्स:**

भारतातील शेतजमिनींचे सरासरी क्षेत्रफळ अत्यंत लहान (बहुतांश १ हेक्टरपेक्षा कमी) असल्याने पारंपरिक उपग्रह डेटाद्वारे बांध आणि शेतांच्या वैयक्तिक सीमा ओळखणे कठीण जायचे. या तांत्रिक अडचणीवर मात करण्यासाठी गुगल डीपमाईंडने विशेष एआय मॉडेल्स विकसित केली आहेत.

उच्च रिझोल्यूशन उपग्रह डेटावरून लहान शेतांच्या सीमा स्वतंत्रपणे रेखाटून, तुकडे झालेल्या लहान शेतजमिनींचे अचूक डिजिटल नकाशे बनवणे. टाईम-सिरीज डेटाच्या आधारे पिकांच्या वाढीचा टप्पा अर्थात लागवडीपासून ते काढणीपर्यंत आणि महत्त्वाच्या घटनांचा माग ठेवून पेरणीच्या तारखा, पिकांची वाढ, अचूक सिंचन, पिकांचे वर्गीकरण तसेच उत्पादकतेचा अंदाज यासारख्या टप्प्यांचे रिअल-टाईम ट्रॅकिंग करणे हे काम केले जाते.

**३. मृदा व्यवस्थापनात जीईईचा वापर:**

मृदा संवर्धनासाठी आवश्यक असलेली पारंपरिक शेतातील माती तपासणी ही अनेकदा खर्चिक आणि वेळखाऊ ठरते. जीईईने मोठ्या भौगोलिक क्षेत्रावरील मृदा विश्लेषणाला डिजिटल रूप दिले आहे.

डिजिटल सॉईल मॅपिंग : भारताच्या 'राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि भूमी उपयोग नियोजन ब्युरोने' जीईईच्या मल्टि-स्पेक्ट्रल डेटाचा वापर करून देशाचा

कृषी कर्ज वितरण प्रणालीमध्ये जीईईने मोठी पारदर्शकता आणि वेग आणला आहे.

जीईईमधील सॅटेलाईट टाईम-सिरीज डेटा आणि ऐतिहासिक उत्पादकता विश्लेषणाद्वारे हे काम आता काही दिवसांत अचूकतेने पूर्ण केले जात आहे.

अॅग्री-फिनटेक आणि डिजिटल कर्ज वितरण : अनेक अग्रगण्य भारतीय स्टार्टअप्सनी जीईई आणि अेएलयूएपीएलचा वापर करून १४ कोटी हेक्टरहून अधिक शेतजमिनींचे डिजिटल मॅपिंग केले आहे. यामुळे काही तासांत पीक कर्ज मंजूर करणे सुलभ झाले आहे.

**५. हवामान अनुकूल शेती :**

भातशेतीतील मिथेन घट आणि कार्बन क्रेडिट्स : भारतातील भातशेतीतून मोठ्या प्रमाणावर मिथेन वायूचे उत्सर्जन होते. 'कार्बनफार्म' सारख्या संस्था जीईई आणि जेमिनी अेआय च्या सहाय्याने शेतात 'अल्टरनेट वेटिंग अँड ड्रायिंग' पद्धतीचे सॅटेलाईटद्वारे अचूक प्रमाणीकरण करतात. यामुळे पाण्याची ३० टक्के ते ४० टक्के बचत होतेच, शिवाय शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक उत्पन्न मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

६. एआयचे जीईईशी एकात्मीकरण करणे ही काळाची गरज आहे. कारण, कमर्शियल डाटा समाविष्ट केलेला असूनही तो मोफत उपलब्ध होत नाही, थोडक्यात गुगल अर्थ इंजिन केवळ बिगर-व्यावसायिक वैज्ञानिक संशोधन, शैक्षणिक अभ्यास, स्वयंसेवी संस्थांचे सामाजिक कार्य आणि धोरणात्मक, अभ्यासपूर्ण सरकारी संशोधनासाठीच विनामूल्य उपलब्ध आहे.

●●●

**- धीरज कदम**
**- निशिगंधा चव्हाण**
आचार्य पदवी विद्यार्थी मृद विज्ञान विभाग
वनामकृवि, परभणी,
**- सुदर्शन भोयर**
डेक्कन स्पेशियल, संस्थापक, नागपूर.

# संत्रा/मोसंबी फळ पिकातील आंबिया व मृग बहार फळगळ व्यवस्थापन

कृषी व्यवस्थापन

सद्यस्थितीत आंबिया बहाराची फळे ही विकसनशील अवस्थेत आहेत; तर मृग बहाराची वाटाणा दाणे अवस्थेत आहेत. साधारणतः पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत केलेली लागवड, झाडातील संजीवकांचा फळाच्या शेवटच्या टोकापर्यंत होणारा पुरवठा, कर्ब-नत्राचे संतुलन, संतुलित पोषण यामुळे फळे झाडावर परिपक्व होईपर्यंत टिकण्यास मदत होते. मात्र, सतत पावसाने जमीन संपृक्त होणे व त्यानंतर उघाड होऊन वाढलेले तापमान, कमी पालवी व फळांची झाडावर अधिक संख्या, अपुरे पोषण अशा वातावरणात आंबिया बहारातील फळपिकांवर विपरीत परिणाम होतो.

**वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ**



पावसाळ्यात सतत पाणी साचून जमीन संपृक्त होते, झाडाच्या मुळ्या कुजतात, मुळ्यांना प्राणवायू अल्प किंवा मिळत नसल्याने श्वसनक्रिया बाधित होते. परिणामी विकसनशील फळांवर त्यांचा परिणाम होऊन ती पिवळी होऊन गळून पडतात.


**बुरशीजन्य फळगळ**

संत्रा फळ झाडांमध्ये बुरशीजन्य फळगळ प्रामुख्याने फायटोप्थोरा, कोलेटोट्रीकम, डिप्लोडिआव ऑलटरनेरिया या बुरशीमुळे होते.

**व्यवस्थापन**

वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ व्यवस्थापनाकरिता खालील उपाय योजना कराव्यात -

- बागेच्या उताराच्या बाजूने शेतातील पाणी बाहेर काढावे.
- सतत पावसाचे पाणी साचून राहल्यास बागेमध्ये तण नाशकाचा वापर टाळावा.
- झाडांवर गळून पडलेल्या फळांना खोल खड्ड्यात दाबून त्यांची विल्हेवाट लावावी. फळबागेत फळांचे ढीग कुठेही ठेवून नयेत कारण ते कीड व रोगाचे प्रसार करण्याचे काम करतात.



कोलेटोट्रीकमस्टेम एंडरॉट

आंबिया बहाराची वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ व्यवस्थापन करिता एनएए १ ग्रॅम (१०पिपीएम) किंवा २-४- डी १.५ ग्रॅम (१५ पिपीएम) किंवा जिब्रेलिक अॅसिड १.५ ग्रॅम (१५ पिपीएम) सह एन-एटीसीए (एन-अेसेटील थायझोलिडाईन -४- कार्बोक्सीलीन अॅसीड) (१०पिपीएम) १ग्रॅम + ब्रासिनोलाइड (४ पिपीएम) ०.४ ग्रॅम + फॉलिक अॅसिड (१०० पिपीएम) १० ग्रॅम + १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून १५ दिवसाच्या अंतराने अशा दोन फवारण्या कराव्यात.

मृग बहाराची फळे वाटाण्या एवढी असल्यास गळण संभवते. याकरिता एनएए (१ ग्रॅम) १० पिपीएम किंवा२-४-डी १.५ग्रॅम (१५ पिपीएम)+ युरिया १किलो(१%) + १००लिटर पाणी असे द्रावण करून फवारणी करावी.

संत्रा मृग बहारातील फळगळ कमी करण्याकरिता (चित्र क्र. ५) जिए-३ (१५ पिपीएम) सह सीपीपीयू (फोरच्लोफेणूरोन) १५ पिपीएम किवा ब्रासिनोलाईड ०२ पिपीएमची दुसरी फवारणी फळे वाटाण्याएवढी असताना करावी.

झाडावर पानांची संख्या कमी व पाने पिवळट हिरव्या रंगाची असल्यास कॅल्शियम अमोनियमनायट्रेट (१ किलो) + जिब्रेलिक अॅसिड १.५ ग्रॅम + १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

सूक्ष्म अन्न द्रव्ये झिंक सल्फेट ५ ग्रॅम, फेरस सल्फेट १ ग्रॅम व बोरॉन १ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन अंबिया फळांकरिता ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात तसेच मृगाच्या फळाकरिता ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये फवारणी करावी.

**बुरशीजन्य रोगापासून होणारी फळगळ व्यवस्थापनाकरिता खालील उपाययोजना कराव्यात-**

सर्वप्रथम खाली पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी. वाफा स्वछ ठेवावा.

बागेच्या उताराच्या बाजूने शेतातील पाणी बाहेर काढावे; कारण जिकडे पाणी साठून राहते, त्या भागात फायटोफ्थोरा बुरशीची लागण अधिक होते.

फायटोफ्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज 'ब्राऊनरॉट' चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फासिटील ए.एल. २.५ ग्रॅम किवां कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्लूपी ३ ग्रॅम प्रती लिटर पाणी घेऊन फवारणी करावी तसेच जमिनीमधील सक्रीय बीजाणू यांचा नायनाट होण्यासाठी मदत होईल. चांगले परिणाम मिळण्यासाठी या औषधामध्ये इतर कोणतेही तत्सम बुरशीनाशके, कीटकनाशके, विद्राव्य खते मिसळू नये.



फायटोप्थोरा बुरशी ग्रस्त फळे

बुरशी नाशकाचे द्रावण टाकल्यानंतर ५ दिवसांनी १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व १०० ग्रॅम सुडोमोनास १ किलो शेण खतात मिसळून प्रती झाड देण्यात यावे.

कोलेटोट्रीकम बुरशीजन्य फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी ३.० ग्रॅम किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

●●●

**- डॉ. योगेश वि. इंगळे**
**- डॉ. हितेंद्रसिंह बी. गोरमनगर**
**- डॉ. राजेंद्र स. वानखेडे**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

कृषी जैविक शेती

# शाश्वत शेतीकडे वाटचाल

आज जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, २०५० पर्यंत ती सुमारे ९ अब्जांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येसाठी पुरेसे अन्नधान्य उत्पादन करणे हे शेतीसमोरील मोठे आव्हान बनले आहे. गेल्या काही दशकांमध्ये रासायनिक खतांच्या वापरामुळे पीक उत्पादनात वाढ झाली असली, तरी त्यांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होणे, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण घटणे, उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या कमी होणे, पर्यावरणाचे प्रदूषण आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत जैविक खते ही शाश्वत शेतीसाठी प्रभावी आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरत आहेत.

जैविक खतांमध्ये उपयुक्त जीवाणू, बुरशी आणि इतर सूक्ष्मजीवांचा समावेश असतो. हे सूक्ष्मजीव वातावरणातील नत्र स्थिर करतात, जमिनीतील स्फुरद व पालाश यासारखी अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध करून देतात, वाढीस उपयुक्त पदार्थ तयार करतात आणि पिकांची रोग व प्रतिकूल हवामान सहन करण्याची क्षमता वाढवतात.

**जैविक खतांचे प्रमुख फायदे :** वातावरणातील नत्र स्थिर करून पिकांना उपलब्ध करून देतात. जमिनीतील स्फुरद, पालाश आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढवतात. मुळांची वाढ व अन्नद्रव्यांचे शोषण सुधारतात. पिकांची दुष्काळ, क्षारता आणि तापमानातील बदल सहन करण्याची क्षमता वाढवतात. काही उपयुक्त सूक्ष्मजीव रोगकारक सूक्ष्मजीवांची वाढ कमी करून पिकांचे संरक्षण करतात. रासायनिक खतांची गरज कमी करून उत्पादन खर्चात बचत करण्यास मदत करतात.

**जैविक खतांचे प्रकार आणि भूमिका**

**१. नत्र स्थिर करणारी जैविक खते :** रायझोबियम हे कडधान्य पिकांसाठी महत्त्वाचे जैविक खत आहे. हे जीवाणू मूग, उडीद, हरभरा, तूर, सोयाबीन, वाटाणा आणि चवळी यासारख्या पिकांच्या मुळांवर गाठी तयार करून वातावरणातील नत्र स्थिर करतात. त्यामुळे पिकांना नत्राचा काही भाग नैसर्गिकरीत्या उपलब्ध होतो. यामुळे मुळांची वाढ आणि अन्नद्रव्यांचे शोषण सुधारण्यास मदत होते.

**अझोस्पिरिलम-** हे भात, मका, ज्वारी, बाजरी आणि गहू यासारख्या तृणधान्य पिकांसाठी उपयुक्त आहे. हे जीवाणू मुळांच्या परिसरात वाढून मुळांच्या वाढीस उपयुक्त पदार्थ तयार करतात. त्यामुळे मुळांची संख्या व लांबी वाढते आणि पाणी व अन्नद्रव्यांचे शोषण सुधारते.

**अझोटोबॅक्टर-** हे मुक्तजीवी नत्र स्थिर करणारे जीवाणू आहेत. भाजीपाला, फळबागा आणि इतर बिगर-कडधान्य पिकांसाठी त्यांचा वापर करता येतो. यामुळे मुळांची आणि पिकांची वाढ जोमदार होण्यास मदत होते.

**अझोला- ही पाण्यावर तरंगणारी वनस्पती असून,** तिच्यात ॲनाबिअेना हा नत्र स्थिर करणारा सूक्ष्मजीव आढळतो.

**२. स्फुरदयुक्त जैविक खते :** स्फुरद विरघळविणारे जीवाणू जमिनीतील पिकांना सहज उपलब्ध नसलेला स्फुरद उपलब्ध करून देतात. हे जीवाणू सेंद्रिय आम्ले तयार करून स्फुरदाचे उपलब्ध स्वरूपात रूपांतर करतात. त्यामुळे मुळांची वाढ, फुलधारणा आणि दाणे भरण्यास मदत होते.

व्हेसिक्युलर आर्बस्क्युलर मायकोरायझा- ही उपयुक्त बुरशी असून, ती मुळांशी सहजीवी संबंध निर्माण करते. तिच्या सूक्ष्म तंतूंमुळे मुळांची पोहोच वाढते आणि पिकांना पाणी, स्फुरद व सूक्ष्म अन्नद्रव्ये अधिक कार्यक्षमतेने मिळतात. गहू, मका, कापूस, सोयाबीन, भाजीपाला आणि फळपिकांमध्ये तिचा उपयोग होतो.

**३. पालाशयुक्त जैविक खते :** पालाश विरघळविणारे जीवाणू (केएसबी) जमिनीतील उपलब्ध नसलेला पालाश पिकांना घेता येईल, अशा स्वरूपात आणण्यास मदत करतात. त्यामुळे धान, गहू, मका, ज्वारी, बाजरी, ऊस, कापूस, सोयाबीन, कडधान्ये, भाजीपाला तसेच विविध फळपिकांमध्ये त्यांचा वापर करता येतो.

**प्रतिकूल हवामान व्यवस्थापन :** जैविक खतांचे काम केवळ अन्नद्रव्ये उपलब्ध करून देण्यापुरते मर्यादित नाही. उपयुक्त सूक्ष्मजीव मुळांच्या परिसरात वाढून रोगकारक सूक्ष्मजीवांची वाढ कमी करण्यास मदत करतात. त्यामुळे पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

**जमिनीचे आरोग्य सुधारण्यात भूमिका :** जैविक खतांच्या वापरामुळे जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. हे सूक्ष्मजीव सेंद्रिय पदार्थांचे विघटन करून अन्नद्रव्यांचे पुनर्चक्रण करतात. त्यामुळे जमिनीची भुसभुशीत रचना, पाणी धरून ठेवण्याची क्षमता आणि अन्नद्रव्यांची उपलब्धता सुधारते. सेंद्रिय

| अ.क्र | विवरण | पिके | मात्रा |
|---|---|---|---|
| नत्र स्थिर करणारे | रायझोबियम (Rhizobium) | मूग, उडीद, हरभरा, तूर, सोयाबीन, वाटाणा, चवळी | [illegible] |
| | अझोस्पिरिलम (Azospirillum) | भात, मका, ज्वारी, बाजरी, गहू | [illegible] |
| | अझोटोबॅक्टर (Azotobacter) | भाजीपाला, फळबागा आणि इतर बिगर कडधान्य | [illegible] |
| | अझोला (Azolla) | [illegible] | [illegible] |
| स्फुरदयुक्त जैविक खते | स्फुरद विरघळणारे जीवाणू (PSB) | [illegible] | [illegible] |
| | व्हेसिक्युलर आर्बस्क्युलर मायकोरायझा (VAM) | [illegible] | [illegible] |
| पालाशयुक्त जैविक खते | पालाश विरघळविणारे जीवाणू (KSB) | [illegible] | [illegible] |

कर्ब वाढल्यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते.

**जैविक खतांचा वापर कसा करावा?**


बियाणे प्रक्रियेसाठी जैविक खताची योग्य मात्रा घेऊन स्वच्छ पाण्यात मिसळावे आणि बियाणांना समान लेप द्यावा. त्यानंतर बियाणे सावलीत वाळवून पेरणी करावी. रोपांची लागवड करताना मुळांची जैविक खताच्या द्रावणातून प्रक्रिया करता येते. फळझाडांसाठी जैविक खत मुळांच्या परिसरात द्यावे.

जैविक खते वापरताना ती थेट उन्हात ठेवू नयेत. पॅकेटवरील अंतिम वापराची तारीख तपासावी. बुरशीनाशक किंवा इतर रासायनिक औषधांसोबत जैविक खते एकाच वेळी वापरणे टाळावे. जैविक खत वापरल्यानंतर जमिनीत योग्य ओलावा ठेवणे आवश्यक आहे. रासायनिक खतांचा संतुलित वापर आणि जैविक खतांचा योग्य पद्धतीने समावेश ही शाश्वत शेतीची महत्त्वाची दिशा आहे. जमिनीचे आरोग्य, सेंद्रिय कर्ब, उपयुक्त सूक्ष्मजीव आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारल्यामुळे दीर्घकाळ जमिनीची उत्पादन क्षमता टिकवून ठेवता येते. त्यामुळे पिकाची गरज, जमिनीची स्थिती आणि माती परीक्षण यांचा विचार करून योग्य जैविक खतांचा वापर करणे आवश्यक आहे. ●●●

**- अंजली राजेश आरज**
**- डॉ सीमा नेमाडे**
**- डॉ. अनिता चौरे**
कृषी विद्या विभाग, डॉ. पीडीकेव्ही, अकोला

हवामान

# मान्सून माघारी फिरतोय



**भौगोलिक घडामोडी :** येणाऱ्या १९ सप्टेंबरच्या सुमारास पश्चिम राजस्थानच्या काही भागांतून नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या माघारीसाठी परिस्थिती अनुकूल होत आहे.

आग्नेय राजस्थान आणि लगतच्या उत्तर गुजरातवरील कमी दाबाचे क्षेत्र आज उंचीनुसार दक्षिणेकडे झुकलेले आहे.

**ट्रफ :** आग्नेय राजस्थान आणि लगतच्या उत्तर गुजरात ते झारखंड, मध्यप्रदेश आणि उत्तर छत्तीसगडवरील कमी दाबाच्या क्षेत्राशी संबंधित चक्रीय वाऱ्यांच्या प्रवाहामुळे तयार झालेला द्रोणी (ट्रफ) समुद्र सपाटीपासून ३.१ किमी उंचीपर्यंत पसरलेला आहे.

वायव्य बंगालच्या उपसागरावर आणि लगतच्या उत्तर ओडिशा व पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर, समुद्रसपाटीपासून १.५ ते ५.८ किमी उंचीवर असलेले आणि उंचीनुसार नैऋत्येकडे झुकणारे वरच्या हवेतील चक्रीय अभिसरण कायम आहे.

सध्याची वातावरण प्रणाली बघता राज्यात विशेष पावसाची शक्यता संपली आहे. दुपारनंतर स्थानिक वातावरण मधेच मध्यम पाऊस होतील. तापमान वाढणार आहे आणि धुई धुके सुद्धा पडण्याची शक्यता आहे.

पुढील कमी दाब २० सप्टेंबर रोजी बंगालच्या उपसागरामध्ये बनल्यावर त्याच्या मार्गानुसार परतीचा पाऊस चांगला होण्याची दाट शक्यता आहे.

●●●

**- अभिषेक खेरडे,**
हवामान अभ्यासक, अचलपूर

कृषी तंत्रज्ञान

# मूलभूत विज्ञानापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत



भारतीय शेती ही केवळ अन्ननिर्मितीची व्यवस्था नसून, देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण जीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. पावसातील अनिश्चितता, पाण्याची मर्यादित उपलब्धता, वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता, जमिनीच्या गुणवत्तेतील बदल आणि काढणीनंतर होणारे नुकसान यामुळे पारंपरिक पद्धतीने शेती करणे दिवसेंदिवस अधिक आव्हानात्मक होत आहे. या आव्हानांवर तांत्रिक उपाय शोधण्याचे आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतीला अधिक कार्यक्षम, किफायतशीर व शाश्वत बनविण्याचे काम कृषी अभियांत्रिकी करते.

१५ सप्टेंबर हा भारतात अभियंता दिन म्हणून साजरा केला गेला. या निमित्ताने विविध अभियांत्रिकी शाखांच्या योगदानाची चर्चा होते, त्यामध्ये कृषी अभियांत्रिकीचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. कारण, ही एकमेव अभियांत्रिकी शाखा आहे जी सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि एनर्जी इंजिनीअरिंग या सर्व मूलभूत शाखांतील ज्ञान एकत्र आणून प्रत्यक्ष शेतात व शेतकऱ्याच्या दैनंदिन आयुष्यात उतरवते. कृषी अभियंता हा केवळ यंत्रे बनवणारा तंत्रज्ञ नसून पाणी, माती, ऊर्जा, यंत्रसामग्री, अन्नप्रक्रिया आणि डिजिटल तंत्रज्ञान यांचा शेतीशी प्रभावी मेळ घालणारा बहुशाखीय तज्ज्ञ आहे. त्यामुळे कृषी अभियंत्याच्या ज्ञानाचा परिणाम थेट शेतकऱ्याच्या उत्पन्नावर, कष्टावर आणि जीवनमानावर होताना दिसतो.

**सर्व अभियांत्रिकी शाखांचा संगम**

कृषी अभियांत्रिकीचा पाया समजून घ्यायचा झाल्यास, सिव्हिल इंजिनीअरिंगमधील माती, जलविज्ञान आणि संरचना अभियांत्रिकीच्या तत्त्वांचा उपयोग शेततळे, बांधबंदिस्ती, कालवे, हरितगृह आणि पॉलीहाऊस सारख्या संरचनांची मजबूत व किफायतशीर रचना करण्यासाठी होतो.

सर्व मूलभूत अभियांत्रिकी ज्ञानाच्या पायावरच पुढे रिमोट सेन्सिंग, जीआयएस, रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारखे प्रगत तंत्रज्ञान उभे राहते, जे आजच्या स्मार्ट शेतीचा गाभा बनले आहे.

**जलसंधारण व यांत्रिकीकरण**

पाण्याचे व्यवस्थापन हा शेतीतील सर्वात कळीचा मुद्दा आहे. सिव्हिल अभियांत्रिकीच्या साहायाने शेततळे, समतल चर आणि कंटूर बांध उभारून पावसाचे पाणी अडवले जाते, तर मेकॅनिकल अभियांत्रिकीतून विकसित झालेल्या ठिबक व तुषार सिंचन प्रणाली, स्वयंचलित झडपा आणि ओलावा सेन्सरमुळे पिकाच्या नेमक्या गरजेनुसार पाणी दिले जाते. त्याचबरोबर सीड-कम-फर्टिलायझर ड्रिल, प्लांटर, यांत्रिक तणनियंत्रक आणि कापणी-मळणी यंत्रांमुळे मजुरांची कमतरता असतानाही वेळेवर शेतीकामे पूर्ण होतात.

**ऊर्जा अभियांत्रिकी**

सिंचन, प्रक्रिया, वाळवण आणि साठवणूक यासारख्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात ऊर्जा लागते. पारंपरिक, महाग व प्रदूषणकारी ऊर्जास्त्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कृषी अभियंते सौरपंप, सौर वाळवण यंत्रे, बायोगॅस प्रकल्प, बायोडिझेल आणि कृषी अवशेषांपासून तयार होणारे बायोइंधन यासारख्या अक्षय ऊर्जा तंत्रज्ञानाचा वापर वाढवत आहेत. उसाच्या चिपाडापासून, भाताच्या तुसापासून किंवा शेतातील काडीकचऱ्यापासून बायोमास ऊर्जा, बायोगॅस किंवा बायोडिझेल तयार करण्याचे तंत्रज्ञान यामुळे कृषी अवशेष हे केवळ कचरा न राहता उत्पन्नाचे अतिरिक्त साधन बनू शकतात. सौरऊर्जेवर चालणारी शीतगृहे, सौर वाळवण यंत्रे आणि सौर कुंपण यामुळे वीजटंचाई असलेल्या दुर्गम भागातही शेतमालावर प्रक्रिया करणे व शेताचे संरक्षण करणे शक्य होते.

**अन्नप्रक्रिया, साठवणूक व मूल्यवर्धन**

शेतमाल बाजारात पोहोचेपर्यंत त्याची गुणवत्ता टिकवणे तितकेच महत्त्वाचे आहे. स्वच्छता, वर्गीकरण, प्रतवारी, पॅकेजिंग, शीतसाखळी, गोदाम व्यवस्थापन आणि नियंत्रित वातावरणातील वखार यामध्ये कृषी अभियांत्रिकीचा वापर करून काढणी पश्चात होणारे नुकसान लक्षणीयरीत्या कमी करता येते.

**डिजिटल शेती**

आजची कृषी अभियांत्रिकी डिजिटल तंत्रज्ञानाशीही तितकीच जोडली गेली आहे. ड्रोनच्या साहाय्याने पिकांची पाहणी, फवारणी आणि खत व्यवस्थापन अधिक अचूक व वेगाने करता येते. यासाठी केंद्र सरकारच्या नमो ड्रोन दीदी योजनेअंतर्गत महिला बचत गटांना ड्रोन खरेदीसाठी अनुदान दिले जात असून, या ड्रोनद्वारे शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर सेवा पुरवली जाते. त्याचबरोबर मातीतील ओलावा, तापमान व पोषणद्रव्ये मोजणारे खेढ सेन्सर, उपग्रह प्रतिमा आणि जीआयएस यांच्या माध्यमातून सतत गोळा होणार्या मोठ्या माहितीसंचाचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर वेगाने वाढत आहे. ●●●

**- डॉ. सुयोग खोसे,**
**इंजि. मंगेश मांडगे, काजल ढोकळे**
विषयतज्ञ - कृषी अभियांत्रिकी विभाग
कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव, पुणे-२

❍ संयोजक : **निखिल रमेश यादव,** कृषी पदव्युत्तर - ८४०८९१२७०६ ❍